रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २६१। पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

B.com Receptionst
पाहिजे. वयाची अट नाही.
अर्जासह समक्ष भेटा.
साई-इन हॉटेल चोंढी,
अलिबाग-रेवस रोड अलिबाग

रायगड, शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

रिसॉर्टमध्ये कामासाठी एका
जोडप्याची किंवा मुलाची
आवश्यकता आहे.
ठिकाण : सासवणे
संपर्क: +91 9607102357

## वेधक

### पुढील पाच दिवस बँका बंद

**नवी दिल्ली :** मार्च महिन्यात बँकांना खूप सुट्ट्या असणार आहेत. याची सुरुवात फेब्रुवारी महिन्याच्या शेवटापासून झाली आहे. २८ फेब्रुवारीपासून सलग पाच दिवस बँका बंद राहतील. आरबीआयने मार्च महिन्यातील बँकांच्या सुट्ट्यांची यादी जाहीर केली आहे. होळी आणि आठवड्याच्या शेवटी देशाच्या विविध भागात बँका बंद राहतील, असे आरबीआयने स्पष्ट केले आहे. उद्या महिन्याचा चौथा शनिवार आहे, त्यामुळे देशभरातील बँका बंद राहतील. त्यानंतर मार्चचा पहिला दिवस, १ मार्च रोजी रविवारची सुट्टी आहे, त्यामुळे त्या दिवशीही बँका बंद राहतील. यानंतर, होळी सणामुळे २ मार्चपासून विविध राज्यांमध्ये बँकांना सुट्ट्या सुरू होतील. आरबीआयच्या सुट्टीच्या यादीत २, ३ आणि ४ मार्च रोजी होळीच्या सुट्ट्यांची यादी आहे.

### कृत्रिम प्लास्टिक फुलांवर येणार बंदी

**मुंबई :** प्लास्टिकपासून बनवलेल्या कृत्रिम फुलांच्या वापरावर राज्य सरकार लवकरच निर्बंध आणणार आहे. विधानसभेत घोषणा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैसर्गिक फुलांच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी जीआर जारी करण्यात येणार असल्याचे सांगितले. कृत्रिम फुले वापरणाऱ्या विवाह सभागृहे व सजावट व्यवसायांवरही कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.जयंत पाटील यांनी कृत्रिम फुलांच्या वाढत्या वापरामुळे कोल्हापूरसह राज्यातील नैसर्गिक फुल उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. प्लास्टिक फुले जैविकरीत्या विघटित होत नसल्याने पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचेही सरकारने नमूद केले.

### ‘प्रभाग पद्धती रद्द करा’

**मुंबई :** महापालिका निवडणुकीत प्रभाग पद्धत ही अनेकांसाठी अडचणीची ठरली. विशेषतः छोट्या पक्षांवर या नवीन पद्धतीने गंडातर आले. मोठ्या प्रभागात प्रचारासाठी आणि खर्चासाठी त्यांची चांगलीच दमछाक झाली. इतके करूनही अनेक ठिकाणी छोट्या पक्षांना आणि अपक्षांना यश खेचून आणता आले नाही. तर काही ठिकाणी लहान पक्षाच्या उमेदवारांनी मोठ्या पक्षांवर निवडणूकीत पैसे वाटपाचे आणि मतदार पळवल्याचे आरोप केले. त्याचवेळी आता प्रभाग पद्धती रद्द करा, अशी मागणी करत रिपाई नेते रामदास आठवले यांनी आपल्याच सरकारला घरचा आहेर दिला आहे.

# जिल्ह्यात उभारणार 5000 होळ्या

## 120 ठिकाणी मिरवणुका

प्रमोद जाधव
। रायगड ।

**होळी व धुलिवंदन सण अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला असून, जिल्हाभर तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. यंदा २ मार्च रोजी होळी, तर ३ मार्चला धुळीवंदन साजरे होणार आहे. त्यानिमित्ताने जिल्ह्यात एकूण ५,०६० ठिकाणी होळ्या उभारल्या जाणार असून, विधीवत पूजनानंतर त्यांचे दहन केले जाईल. होलिकोत्सवानिमित्त १२० ठिकाणी मिरवणुका काढण्यात येणार आहेत. विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जिल्हाभर उत्सवाचा जल्लोष अनुभवायला मिळणार आहे.**

कोकणात होळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण तसेच शहरी भागात पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा केला जातो. होळी उभारण्यासाठी केळी, सावरी, पोफळी तसेच काही ठिकाणी सुपारी, आंबा आदी झाडांचा वापर केला जातो. दक्षिण रायगडात काही भागांत होळीचा सण तब्बल १५ दिवस साजरा करण्याची परंपरा आहे. समुद्रालगतच्या गावांमध्ये व कोळीवाड्यांमध्येही होळी उत्साहात साजरी होते. पारंपरिक पेहरावात होळीची पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला जातो आणि रात्री होळीचे दहन केले जाते. जिल्ह्यातील ३,९४० सार्वजनिक, तर १,१२० खासगी होळ्या उभारल्या जाणार आहेत. धुलिवंदनाच्या दिवशी रंगांची उधळण करत मिरवणुका काढल्या जातील. अलिबाग समुद्रकिनारी धुलिवंदनानिमित्त पारंपरिक बैलगाडी शर्यतींचे आयोजन करण्यात येणार आहे.

**पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त**

उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हा पोलिसांनी व्यापक बंदोबस्ताची आखणी केली आहे. होळी व धुलिवंदनाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सार्वजनिक उपक्रमांच्या ठिकाणी पोलीस तैनात राहणार आहेत. जिल्ह्यात एकूण •> पान २ वर

### अवैध वृक्षतोडीवर कारवाईचा इशारा

शहरी विस्तारामुळे वाढती वृक्षतोड पर्यावरणासाठी धोकादायक ठरत आहे. होळीच्या पार्श्वभूमीवर अवैध वृक्षतोड आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. अनधिकृत वृक्षतोड महागात पडू शकते.

### पर्यावरणपूरक होळीचे आवाहन

होळीच्या निमित्ताने लाकूड मिळवण्यासाठी अवैध वृक्षतोड होण्याची शक्यता आहे. अनधिकृत वृक्षतोड व वन्यप्राण्यांची शिकार यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडू शकतो. म्हणूनच सार्वजनिकरित्या एकत्रित होळी साजरी करून वृक्षतोड टाळावी, पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करावा, असे आवाहन उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केले आहे.





### चाकरमान्यांसाठी एसटीची विशेष व्यवस्था

गावाकडे होळी साजरी करण्यासाठी मुंबई, पुणे व इतर शहरांतून चाकरमानी मोठ्या संख्येने रवाना होत आहेत. काहीजण खासगी वाहनांनी, तर काहीजण एसटी बसने प्रवास करणार आहेत. प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन राज्य परिवहन महामंडळाने अतिरिक्त बसेसची व्यवस्था केली आहे. विनाथांबा फेऱ्याही गरजेनुसार वाढवण्यात येणार असून, प्रवास सुरक्षित व आरामदायी व्हावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

### होळीसाठी १८६ विशेष गाड्या

होळी व शिमगोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. १ ते ८ मार्चदरम्यान दिवाचिपळूण अनारक्षित मेमू स्पेशल धावणार असून, ती दिवा येथून रात्री ११.२५ वाजता सुटून सकाळी ६.३० वाजता चिपळूणला पोहोचेल. परतीला चिपळूणहून दुपारी ३.३० वाजता सुटून रात्री ११.१० वाजता दिवा येथे आगमन होईल.याशिवाय मडगाव-लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) आरक्षित स्पेशल १ ते ८ मार्चदरम्यान धावणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सावंतवाडी आणि एलटीटी-सावंतवाडी होळी स्पेशल सेवाही सुरू करण्यात आल्या आहेत.एकूण १८६ विशेष गाड्या देशभरात धावणार असून, त्यापैकी ९४ गाड्या होळीसाठी विशेष असतील. तिकिट बुकिंगला सुरुवात झाली असून, या निर्णयामुळे कोकणातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### पर्यायी मार्गांची व्यवस्था


होळीसह धुलिवंदनानिमित्त कोकणात व रायगड जिल्ह्यात जाणाऱ्या पर्यटक व नागरिकांच्या सेवेसाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे. मुंबई-गोवा महामार्ग, वडखळ ते अलिबाग-रेवदंडा-मुरूड तसेच कर्जत-खोपोली व इतर मार्गांवर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. रेवदंडा व मुरूडकडे जाणाऱ्या पर्यटकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून नागोठणेमार्गे भिसेखिंड-रोहा-चणेरामार्गे रेवदंडा-मुरूड. कोलाड-रोहा-चणेरामार्गे रेवदंडा-मुरूड या मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. वडखळ, नागोठणे, कोलाड, रोहा, रेवदंडा व मुरूड येथे फलक लावण्यात येणार आहेत. मुंबई-गोवा महामार्ग हा इंदापूर-माणगाव, अलिबाग-कुरुळ-सहाण बायपास-रेवदंडा, खोपोली-पाली-निजामपूर-माणगाव-महाड पर्यायी मार्ग असल्याचे पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

# अध्यक्षपद निवडीला मार्चचा मुहूर्त!

## जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेत सत्तास्थापनेचा खेळ रंगला असताना तब्बल वीस दिवस प्रशासन गप्प बसल्याने राजकीय वर्तुळात संताप उसळला आहे. अखेर दबाव वाढल्यानंतर रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी १२ मार्चला निवडणूक घेण्याची घोषणा केली असली तरी इतका विलंब का झाला, यावर प्रशासनाकडे उत्तर नाही.



रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी पार पडलेल्या निवडणुकीत ७ फेब्रुवारीला मतदान, तर ९ फेब्रुवारीला मतमोजणी झाली. निकालात भाजपचे १५, राष्ट्रवादीचे १६, शिंदे गट शिवसेनेचे २१, ठाकरे गट शिवसेनेचे ५ आणि काँग्रेसचा १ सदस्य निवडून आला. स्पष्ट बहुमत कोणालाही नसल्याने सत्तास्थापनेसाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू आहेत. विशेष म्हणजे, सर्वाधिक २१ जागा जिंकूनही शिंदे गटाला सत्तेपासून दूर ठेवण्याचे डावपेच रचले जात असल्याची चर्चा रंगली आहे.

भाजप आणि राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला असून, शिंदे गटाला विरोधी बाकावर बसवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. निवडणुकीचा निकाल लागून तीन आठवडे उलटले तरी सत्तास्थापनेबाबत कोणतीही ठोस हालचाल न झाल्याने प्रशासनावर निष्क्रियतेचे आरोप होत आहेत. जनतेच्या मतांचा कौल मिळूनही सत्ता स्थापन लांबणीवर टाकली जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, १२ मार्च रोजी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात विशेष बैठक बोलावण्यात आली आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत उमेदवारी अर्ज दाखल केले जातील. दुपारी २ वाजता अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू होईल. अर्ज छाननी, माघार आणि आवश्यक असल्यास मतदान अशी संपूर्ण प्रक्रिया पार पडणार आहे. अध्यक्षपदासाठी भाजपसह शिंदे गटाकडून इच्छुकांची संख्या मोठी आहे. •> पान २ वर

### लाचखोर सुरक्षा पर्यवेक्षकाला अटक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सुरक्षा रक्षक मंडळातील काम सुरळीत होण्यासाठी सुरक्षा रक्षकाकडे लाच मागणे महागात पडले. नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि.२७) छापा टाकून सुरक्षा पर्यवेक्षकाला लाच घेताना रंगेहाथ पकडले. या कारवाईने लाचखोरला दणका मिळाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निलेश तुकाराम बढे असे या आरोपीचे नाव आहे. सुरक्षा रक्षकमंडळामध्येसुपरवायझर अर्थात सुरक्षा पर्यवेक्षक म्हणून आहेत. एम एसईडीसीएल कोपरखैरणे येथील पर्यवेक्षक (सुपरवायझर) निलेश तुकाराम बढे हे सुरक्षा रक्षकांना ड्युटी लावणे, त्यांचे पॉईंट चेक करणे, त्यांची हजेरी ठेवणे हे काम करतात. काम सुरळीत होण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे प्रतिमहिना शंभर रुपयांची मागणी •> पान २ वर

# द्रुतगती मार्गावर टायर फुटून ट्रकचा अपघात




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ट्रकचे सलग तीन टायर फुटल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन चालक जखमी झाले असून, काही काळ पुण्याकडील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. ट्रकमधील पत्र्याचे जड ब्लॉक थेट पुणे लेनवर आणि शेजारील दुसऱ्या ट्रकवर कोसळल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक जीजे १० टीएक्स ८६२१ हा माल घेऊन पुण्याकडून मुंबईकडे जात होता. चालक लाखा इकबाल (वय ३८, रा. जामनगर, गुजरात) हा ट्रक चालवत होता. बोरघाट पोलीस चौकीजवळ आल्यानंतर अचानक ट्रकच्या उजव्या बाजूचे दोन आणि डाव्या •> पान २ वर

# अखेर प्रशासनाला जाग

## अलिबाग मार्गांवर जड-अवजड वाहनांना मेअखेरपर्यंत बंदी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग परिसरात सुरू असलेल्या रस्ते, मोरी व पुलांच्या कामांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न तीव्र बनला असताना, अखेर प्रशासनाने हस्तक्षेप केला आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अलिबाग-सहाण बायपास तसेच अलिबाग-रेवदंडा मार्गावर सर्व प्रकारच्या जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीवर अटी-शर्तींसह बंदी घालणारी अधिसूचना जारी केली आहे. ही बंदी सकाळी ९ ते दुपारी १२ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ३१ मेपर्यंत लागू राहणार आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील अलिबाग-सुडकोली तसेच अलिबाग-मुरूड मार्गावरील अलिबाग-रेवदंडा हे दोन्ही रस्ते कायमच वर्दळीचे मानले जातात. नोकरी-व्यवसाय, शासकीय कामे, शाळा-महाविद्यालयीन शिक्षण तसेच पर्यटनासाठी दररोज हजारो नागरिक या मार्गांचा वापर करतात. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ या मार्गांवर वाहनांची प्रचंड गर्दी होते. सध्या अलिबाग-कुरुळ-बेलकडे-सहाण बायपास-नागाव-रेवदंडा तसेच अलिबाग-कुरुळ-नवेदर बेली-आक्षी-नागाव-रेवदंडा या मार्गांवर सिमेंट काँक्रिटीकरण, मोरी बांधकाम, पुलांची दुरुस्ती व नव्याने उभारणीची कामे वेगाने सुरू आहेत. विविध ठिकाणी खोदकाम करण्यात आल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. परिणामी, मोठ्या वाहनांना वळणे घेणे कठीण होत असून, •> पान २ वर

### कोणाला सूट?

जिल्हाधिकाऱ्यांकडून जारी आदेशानुसार नमूद दोन्ही मार्गांवर सकाळी ९ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी राहील. मात्र दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

# उमटे धरणात ५० टक्केच जलसाठा शिल्लक

## एक दिवसाआड पाणीपुरवठ्याची वेळ



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात यंदा पावसाने समाधानकारक हजेरी लावली असली तरी उन्हाळा सुरू होताच पाण्याचा प्रश्न डोके वर काढू लागला आहे. अलिबाग तालुक्यातील उमटे येथील धरणात सध्या केवळ ५० टक्के जलसाठा शिल्लक राहिला असून, सुमारे ४० हजार नागरिकांना एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे. मे महिन्यात तीव्र टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी ही उपाययोजना करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

उमटे धरण हे रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अखत्यारितयेते. रामराज विभागातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीत १९७८-७९ दरम्यान या धरणाची उभारणी करण्यात आली. या प्रकल्पातून रामराज, सुडकोली, बोरघर, चिंचोटी, बेलोशी, खानाव, बामणगाव, वरंडे, आक्षी, नागाव, रेवदंडा आणि चौल या ग्रामपंचायत क्षेत्रांतील तब्बल ६५ गावे व ३३ वाड्यांतील नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, नागरीकरणाचा वेग आणि पाण्याचा वाढता वापर यामुळे धरणावरील ताण वाढत चालला आहे.

धरणाची एकूण साठवण क्षमता सुमारे ४० दशलक्ष घनफूट आहे. यापूर्वी ५६.४० मीटरपर्यंत जलसाठा उपलब्ध होता. मात्र, सध्या पातळी झपाट्याने घसरत असून, केवळ अर्धा साठा उरला आहे. वाढते तापमान आणि बाष्पीभवनामुळे पाण्याची घट अधिक वेगाने होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. एप्रिल-मे महिन्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासूनच पाणी कपात लागू करण्यात आली आहे.

या निर्णयानुसार संबंधित गावांमध्ये एक •> पान २ वर

> सध्या धरणात ५० टक्के जलसाठा उपलब्ध आहे. मात्र, तापमान वाढत असल्याने साठ्यात घट होण्याचा वेग वाढू शकतो. मे महिन्यात टंचाई तीव्र होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला आहे. ही तात्पुरती उपाययोजना असून, नागरिकांनी पाण्याचा जबाबदारीने आणि जपून वापर करणे अत्यावश्यक आहे. सर्वांनी सहकार्य केल्यास उन्हाळा मोठ्या अडचणीशिवाय पार करता येईल.
>
> – साहिल आचरेकर, कनिष्ठ अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**जिल्हा परिषद आवारात गाड्या धूळ खात** | **लिलाव रखडल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

# भंगार गाड्यांना लिलावाची प्रतीक्षा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या विविध विभागांसाठी वापरात असलेल्या आणि सध्या पूर्णपणे निकामी झालेल्या शासकीय गाड्या अनेक महिन्यांपासून आवारात धूळ खात पडून आहेत. मुदत संपलेल्या आणि रस्त्यावर धावण्यास अयोग्य ठरलेल्या या वाहनांचा लिलाव रखडल्याने त्या भंगार अवस्थेतच उभ्या आहेत. परिणामी, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषदेची मुख्य इमारत सध्या कुंटेबाग येथे असून, येथे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासह समाजकल्याण, कृषी, सामान्य प्रशासन, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा प्रकल्प संचालक आदी महत्त्वाची विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. या अधिकाऱ्यांच्या वापरासाठी शासनाने विविध कालावधीत शासकीय वाहने उपलब्ध करून दिली होती.



कालांतराने काही वाहने पूर्णपणे निकामी झाली, त्यांची अधिकृत मुदत संपली आणि दुरुस्ती आर्थिकदृष्ट्या अशक्य ठरली. त्यामुळे ती वापरातून बाद करण्यात आली.

मात्र, वापरातून बाद झाल्यानंतरही या गाड्यांचा लिलाव वेळेत न झाल्याने त्या जिल्हा परिषद इमारतीच्या मागील बाजूस तसेच कॅन्टीनसमोर उभ्या आहेत. सध्या पाचहून अधिक वाहने जीर्ण अवस्थेत पडून असून, त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. काही वाहनांची काच फुटलेली, टायर निकामी तर आतील भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला दिसून येतो. •> पान २ वर

> मागील वर्षी एप्रिलमध्ये सहा वाहनांचा लिलाव करण्यात आला होता. त्यानंतर अलीकडेच पाच वाहनांसाठी पुन्हा जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यापैकी दोन वाहनांची विक्री झाली; मात्र उर्वरित वाहनांसाठी मिळालेल्या बोली शासनाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा कमी होत्या. त्यामुळे प्रक्रिया पूर्ण करता आली नाही. आता वाहनांचे पुनर्मूल्यांकन करून सुधारित अटींसह पुन्हा लिलाव प्रक्रिया राबविण्यात येईल. शक्य तितक्या लवकर ही भंगार वाहने आवारातून हटविण्याचे नियोजन आहे.
>
> – जालिंदर पाठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी

# स्वच्छतागृहातील नळ चोरीला

## अलिबाग आगारातील मालमत्ता सुरक्षेवर प्रश्नचिन्ह



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील एसटी बस आगारात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी प्रत्यक्षात सुरक्षेची यंत्रणा किती सक्षम आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आगारातील स्वच्छतागृहामधील वॉश बेसिनचे चारही नळ गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे आगारातील मालमत्ता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असल्याने येथील एसटी आगाराला मोठे महत्त्व आहे. आगारात ७५ हून अधिक एसटी बस कार्यरत असून, सुमारे २७० कर्मचारी येथे कार्यरत आहेत. शासकीय कामकाज, •> पान २ वर

### अरविंद केजरीवाल, सिसोदियांची मुक्तता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीतील कथित अबकारी धोरण घोटाळाप्रकरणी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना राऊस ॲव्हेन्यू कोर्टाने निर्दोष मुक्त केले आहे. पुराव्याअभावी त्यांच्यावरील आरोप सिद्ध होत नसल्याचे कोर्टाने स्पष्ट केले. कोर्टाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, आरोपपत्रात अनेक त्रुटी होत्या आणि कोणताही साक्षीदार किंवा जबाब सिद्ध होत नाही. सीबीआय सिसोदिया यांच्याविरोधात गुन्हा सिद्ध करू शकली नाही. केजरीवाल यांचे नाव कोणताही ठोस पुरावा नसताना जोडले गेले होते. मात्र, सूत्रांनुसार, सीबीआय या निर्णयाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान देण्याची तयारी करत आहे.

# रस्ता अडवतोय कोण?

## जिल्हाधिकाऱ्यांचा थेट सवाल; मुंगोशी बौद्धवाडीप्रकरणी कडक कारवाईचे आदेश

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या देशात आजही एका वाडीला हक्काचा रस्ता नाही, ही वस्तुस्थिती उघड होताच रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रशासनाला धारेवर धरले. ''मुंगोशी बौद्धवाडीचा रस्ता अडवतोय कोण? तात्काळ पाहणी करा, जाणीवपूर्वक अडथळे आणणाऱ्यांवर कडक कारवाई करा,'' असे स्पष्ट आदेश त्यांनी पेणचे प्रांताधिकारी प्रवीण पवार यांना दूरध्वनीवर दिले.

पेण तालुक्यातील जयभीम नगर, मुंगोशी बौद्धवाडी येथील ग्रामस्थांनी बहुजन विद्यार्थी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल वाणी यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत रस्त्याच्या मागणीचे निवेदन सादर केले. वर्षानुवर्षे पाठपुरावा, आंदोलने, आमरण उपोषण, पत्रव्यवहार करूनही रस्ता मार्गी लागलेला नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.


(छायाचित्र : धम्मशील सावंत)

रस्त्याअभावी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी गाव सोडावे लागत आहे. गर्भवती महिला, रुग्ण व वयोवृद्धांना काट्याकुट्यातून खडतर वाट तुडवत मुख्य गावात यावे लागते. पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होते. काही वेळा रुग्णांना झोळीतून नेण्याची वेळ येते, अशी व्यथा ग्रामस्थांनी मांडली.

जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी स्पष्ट शब्दांत सांगितले की, रस्ता हा ग्रामस्थांचा मूलभूत आणि संविधानिक अधिकार आहे. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी. आवश्यक असल्यास ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हे दाखल करा. प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी तातडीने गावाला भेट देऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

भूमी अभिलेख विभागाने जागेची मोजणी केली असून, निधीही मंजूर झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले; मात्र काही जणांकडून जाणीवपूर्वक अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला. रस्ता तात्काळ पूर्ण न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी अनिल वाणी, रायगड जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे पेण अध्यक्ष चंद्रकांत सोनावणे, महाराष्ट्र परिवर्तनवादी पत्रकार संघाचे अध्यक्ष धम्मशील सावंत, रमेश जाधव, राहुल कांबळे तसेच जगदीश भोजने, प्रज्ञाताई भोजने, प्रमोद भोजने, नितीन भोजने, रोशन भोजने, मनोहर ओव्हाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# ६.४१ लाखांचे अंमली पदार्थ जप्त

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा औद्योगिक परिसरात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने कारवाई करत अफूसदृश्य अंमली पदार्थांचा साठा जप्त केला. या कारवाईत सुमारे ४२.७३५ किलो अफूसदृश्य पावडर हस्तगत करण्यात आली असून, तिची अंदाजे किंमत ६ लाख ४१ हजार ०२६ रुपये इतकी आहे.

कैरे गाव हद्दीतील वाशिवली–पाताळगंगा मार्गावर, बॉम्बे डाईंग कंपनीसमोर उभ्या असलेल्या अशोक लेलँड कंपनीच्या (क्र. पीबी १० ईएच ७५९७) ट्रकमध्ये अंमली पदार्थ असल्याची खात्रीलायक माहिती सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून वाहनाची तपासणी केली. तपासादरम्यान प्लास्टिकच्या गोण्यांमध्ये अफूसदृश्य पावडर आढळून आली. याप्रकरणी प्रेमसिंग हरदमसिंग (६४) व जैस्वाल जयराम सिंग (७२), दोघे रा. पंजाब, यांना ताब्यात घेण्यात आले आहे. कारवाईदरम्यान सुमारे ८ लाखांचा ट्रक जप्त करण्यात आला असून, एकूण १४ लाख ४१ हजार ०२६ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड आणि वरिष्ठ पोनि. मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# तीन लाख ८० हजारांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कंपनीचे एमडी असल्याचे भासवून तीन लाख ८० हजार रुपये किमतीचे ॲप्पल कंपनीचे कुपन मेझॉनवरून ऑनलाईन खरेदी करण्यास सांगून ती व्हॉट्सॲपवर पाठवण्यास सांगितले आणि तीन लाख ८० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चैतन्य सागर भोकरे हे लोढा पलावा, खोणी डोंबिवली येथे राहात असून, त्यांना व्हॉट्सॲप नंबरवरून मेसेज आला आणि त्या डीपीवर त्यांच्या कंपनीचे एमडी व्होरा यांचा फोटो होता.

## पान १ वरून

### अध्यक्षपद निवडीला मार्चचा मुहूर्त

त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार हे निश्चित आहे. मात्र, सर्वात मोठा प्रश्न असा की, सत्तेचा तिढा सुटणार की पुन्हा राजकीय खेळींचा नवा अंक रंगणार? आता संपूर्ण रायगडचे लक्ष १२ मार्चकडे लागले आहे. सत्ता कोणाच्या हाती जाणार आणि प्रशासनाची विलंबाची भूमिका यावर पुढील काही दिवसांतच पडदा पडणार आहे.

### द्रुतगती मार्गावर टायर फुटून ट्रकचा अपघात

बाजूचा एक अशा एकूण तीन टायरचा स्फोट झाला. वेगात असलेला ट्रक नियंत्रणाबाहेर जाऊन समोरील सुरक्षा कठड्याला जोरदार धडकला.धडकेनंतर ट्रकमधील पत्र्याचे ब्लॉक रस्त्यावर विखुरले गेले. काही ब्लॉक पुण्याकडील लेनवर पडले, तर काही मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकवर कोसळले. त्यामुळे अपघाताची तीव्रता वाढली. घटनेनंतर पुण्याकडील वाहतूक काही काळ पूर्णपणे थांबविण्यात आली. अपघातात दोन्ही ट्रकचे चालक जखमी झाले. त्यांना तातडीने बाहेर काढून लोणावळा येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातानंतर जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावर पडलेले पत्र्याचे ब्लॉक हटविण्यात आले. त्यानंतर वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली.

या अपघातामुळे काही काळ द्रुतगती मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली तरी टायर फुटल्याने होणाऱ्या अपघातांचा धोका पुन्हा अधोरेखित झाला आहे.

### उमटे धरणावर ५० टक्केच जलसाठा शिल्लक

दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. परिणामी, हजारो कुटुंबांना पाणी साठवून वापरण्याची कसरत करावी लागत आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच कपात लागू झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करणे, गळती रोखणे आणि अनावश्यक वापर टाळणे आवश्यक असल्याचे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

### स्वच्छतागृहातील नळ चोरीला

खासगी उद्योगधंदे, शैक्षणिक कारणे आणि दैनंदिन प्रवासासाठी हजारो प्रवासी या स्थानकाचा वापर करतात. दिवसाभरात मोठ्या प्रमाणावर प्रवासी वर्दळ असतानाही आगारातील सुरक्षेची स्थिती समाधानकारक नसल्याचे या प्रकारातून स्पष्ट होत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आगार परिसरात आणि स्थानकाच्या विविध भागांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, तरीदेखील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांवरील नळ तसेच स्वच्छतागृहातील वॉश बेसिनचे नळ चोरीला जात असल्याची चर्चा आहे. सामाजिक बांधिलकीतून उभारण्यात आलेल्या सुसज्ज स्वच्छतागृहात हात धुण्यासाठी चार वॉश बेसिन बसविण्यात आले होते. सर्व बेसिनला नळजोडणी करण्यात आली होती; परंतु हे नळच अज्ञात व्यक्तींनी लंपास केल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकारामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. स्वच्छतागृहाचा वापर करताना मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. भुरट्या चोरांचा वावर वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात असून, आगार प्रशासनाने सुरक्षा अधिक कडक करण्याची मागणी प्रवासी करत आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत आहे का, चोरी नेमकी कधी झाली, संबंधित फुटेज तपासले गेले का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी बसविलेले काही नळ चोरीला गेल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. ही बाब गांभीर्याने घेतली असून, संबंधित कंत्राटदाराला तातडीने नवीन नळ बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला जात आहे. प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी देखरेख अधिक कडक करण्यात येईल. **– राकेश देवरे, अलिबाग आगार व्यवस्थापक**

### अखेर प्रशासनाला जाग

वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. काही किरकोळ अपघातांच्या घटनाही घडल्या आहेत. वाहतूक कोंडीमुळे स्थानिक नागरिक, रुग्णवाहिका, शालेय विद्यार्थी, पर्यटक आणि दैनंदिन प्रवासी यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः आपत्कालीन सेवांना अडथळे निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनावर कारवाईची मागणी होत होती. अखेर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या प्रस्तावाचा विचार करून जिल्हाधिकाऱ्यांनी जड व अवजड वाहनांवर वेळेच्या मर्यादेत निर्बंध लागू केले आहेत.

जारी आदेशानुसार नमूद दोन्ही मार्गांवर सकाळी ९ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना प्रवेशबंदी राहील. मात्र दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मेअखेरपर्यंत हे निर्बंध लागू राहणार असल्याने वाहतूक कोंडीवर काही प्रमाणात नियंत्रण येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत प्रभावी ठरते आणि कामे नियोजित वेळेत पूर्ण होतात का, याकडे आता स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

### भंगार गाड्यांना लिलावाची प्रतीक्षा

या भंगार वाहनांमुळे केवळ परिसराचे सौंदर्य बिघडत नाही, तर सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. जीर्ण वाहनांमध्ये साप, उंदीर किंवा इतर दंश करणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद कार्यालयात विविध कामांसाठी दररोज नागरिकांची मोठी वर्दळ असते. कॅन्टीन परिसरातही कर्मचारी व नागरिकांची सतत ये–जा सुरू असते. अशा वर्दळीच्या ठिकाणी भंगार वाहनांचा ढिगारा धोकादायक ठरू शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे. दरम्यान, या वाहनांच्या लिलावासाठी प्रशासनाने काही वेळा प्रक्रिया राबविली आहे. मात्र, अपेक्षित किंमत आणि प्रत्यक्ष बोली यामध्ये तफावत राहिल्याने लिलाव पूर्णत्वास जाऊ शकलेला नाही. परिणामी, ही वाहने अद्यापही आवारातच पडून आहेत. नागरिकांनी या गाड्या तातडीने हटवून परिसर मोकळा करण्याची मागणी केली आहे.

### जिल्ह्यात उभारणार ५००० होळ्या

७४३ पोलीस अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामध्ये ८९ अधिकारी, ६१४ अंमलदार आणि ४० वाहतूक पोलीस यांचा समावेश आहे. याशिवाय ८ स्ट्रायकिंग फोर्स, ३ आरसीपी पथके आणि १ अतिशीघ्र दल सज्ज ठेवण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली.

### लाचखोर सुरक्षा पर्यवेक्षकाला अटक

आरोपी करीत होते. या रक्कमेपैकी तक्रारदार व त्यांचे इतर दोन सहकारी यांचे एक हजार ९०० रुपये बाकी होते. ते दिले नाही तर गैरसोईच्या ठिकाणी बदली करणे,कामावरून काढणे, मंडळाच्या प्रतिक्षा यादीमध्ये टाकणे हा प्रकार आरोपींकडून केला जाणार असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. कामे सुरळीत करण्यासाठी मागण्यात आलेल्या लाचप्रकरणी तक्रारदार यांनी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार केली. पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी घटनेचे गांभीर्य ओळखले. शुक्रवारी (दि. २७) पडताळणी केल्यावर लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. अखेर सापळा रचून दुपारी लाच स्विकारताना निलेश बढे यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

# महिलांसाठी खास धुळवड उत्सवाचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महिलांना एकत्र आणत उत्साहात होळी साजरी करण्यासाठी क्रांतीज्योती महिला विकास फाऊंडेशनतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही महिलांसाठी खास धुळवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम मंगळवार, दि. ३ मार्च रोजी फाऊंडेशनच्या कार्यालयात, सेक्टर १६, नवीन पनवेल, पिल्लई कॉलेजजवळ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी फक्त महिलांनाच प्रवेश दिला जाणार असून, महिला स्पेशल धुळवड म्हणून हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

कार्यक्रमात डीजे म्युझिक, विविध मनोरंजनात्मक उपक्रम (फन ॲक्टिव्हिटीज) तसेच स्वादिष्ट नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली आहे. होळीचा आनंद सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात महिलांनी मनमुराद लुटावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमाच्या आयोजक सौ. रुपालीताई शिंदे (अध्यक्ष, क्रांतीज्योती महिला विकास फाउंडेशन), तसेच 'आपला सत्यवार्ता' आणि 'पनवेल न्यूज चॅनल'च्या संपादिका म्हणून कार्यरत आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क : ८६५२४१४३४३ महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धुळवडीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# तरुणांच्या रोजगारासाठी महापालिकेचा पुढाकार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल परिसरातील युवक–युवतींसाठी निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन पनवेल महापालिकेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे. विमानतळ तसेच विमानतळाशी सलग्न उद्योगांमध्ये स्थानिक तरुणांना नोकरी मिळावी, यासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण मोफत देण्याच्या उद्देशाने महापालिकेने प्रशिक्षण व रोजगार देणाऱ्या संस्थांसाठी स्वारस्य निविदा जाहीर केली आहे.

त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील युवकांना रोजगाराच्या दृष्टीने नवी दिशा मिळेल. विशेष म्हणजे, महापालिका क्षेत्रात राहणाऱ्या तरूणांना रोजगारासाठी कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देणारी पनवेल ही पहिली महापालिका असेल. महापालिकेने सुमारे ३ हजार उमेदवारांना विविध कौशल्य कुशलतेचे प्रशिक्षणासाठी ७ ते ८ कोटी रूपये खर्च करण्याची तयारी दर्शविली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे पनवेल महापालिका क्षेत्रालगत उभारण्यात आल्याने येथे शेकडो रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. ही संधी स्थानिक तरुणांनीच मिळवावी, या हेतूने महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी पुढाकार घेतला आहे. मागील वर्षी एप्रिल महिन्यात आयोजित भव्य रोजगार मेळाव्याला सुमारे तीन हजार युवक–युवतींनी नोंदणी केली होती. यापैकी ८७२ उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्तीपत्रे देण्यात आली होती.

त्यानंतर आयुक्तांनी विमानतळाचे संचलन करणाऱ्या अदानीउद्योगसमूहाच्याप्रतिनिधींशी चर्चा करून विमानतळात उपलब्ध होणाऱ्या रोजगारांची माहिती घेतली.या चर्चेनंतर विमानतळ व सलग्न उद्योगांमध्ये तब्बल १४ प्रकारच्या कामांसाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासणार असल्याचे स्पष्ट झाले.

> **"मागील वर्षी भव्य रोजगार मेळाव्यातील उमेदवारांच्या प्रतिसादानंतर महापालिका क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ असावे यासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांकडून स्वारस्य निविदा मागविल्या आहेत.**
> **– मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका"**

त्यानुसार या कामांसाठी आवश्यक अद्ययावत कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची निवड करण्यासाठी बुधवारी स्वारस्य निविदा जाहीर करण्यात आली आहे.महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांच्या अखत्यारीत असणा–या समाज विकास विभागामार्फत बुधवारी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेनुसार, पनवेल महापालिका क्षेत्रातील स्थानिक युवक–युवतींना विमानतळाशी संबंधित मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE /2026-27**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | RFx No. | Tender no. | E-Tender No. & Description | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender | Tender Fee & EMD | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000039050 | Ten-01/ 2026-2027 | E-tender for Hiring of Swift Dzire or equivalent Car for Executive Engineer PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027. | Download and submission of tender Documents Date Dt. 28.02.2026, 11:00 Hrs to Dt. 16.03.2026,10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 16.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 16.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 2 | 7000039053 | Ten-02/ 2026-2027 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Protection unit 1 under PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027. | Download and submission of tender Documents Date Dt. 28.02.2026, 11:00 Hrs to Dt. 16.03.2026,10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 16.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 16.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 3 | 7000039057 | Ten-03/ 2026-2027 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Protection unit 2 under PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027 | Download and submission of tender Documents Date Dt. 28.02.2026, 11:00 Hrs to Dt. 16.03.2026,10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 16.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 16.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 4 | 7000039058 | Ten-04/ 2026-2027 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Automation Unit under PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027. | Download and submission of tender Documents Date Dt. 28.02.2026, 11:00 Hrs to Dt. 16.03.2026,10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 16.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 16.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 5 | 7000039059 | Ten-05/ 2026-2027 | Hiring of XLYO or equivalent vehicle for Communication Unit under PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027. | Download and submission of tender Documents Date Dt. 28.02.2026, 11:00 Hrs to Dt. 16.03.2026,10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 16.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 16.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |

Contact Person: -The Dy. Executive Engineer, Phone No. (022) 27457302
Sd/-
**(I/C) Executive Engineer, PAC Division Panvel**

## PUBLIC NOTICE

This is to notify that Govt. of India Ministry of Environment, forest and Climate Change, No. FC-I/MH-383/2024-NGP/12994/Dated-15.03.2024 and Govt. of India Ministry of Environment, forest and Climate Change, No. FC-I/MH-383/2024-NGP/14308/Dated-04.06.2025 accorded respectively In-principle (i.e. Stage-I) and Final (i.e. Stage-II) approvals for Diversion of 0.0081 Ha. (0.0216 ha.) Reserved Forest Land in Favour of Dinesh Patel for Approach road to private land in survey No. 10 (New Gut. No. 25) to Private land Gut. No. 32/3 of Village Karade Khurd, Taluka - Panvel, Dist. Raigad, Maharashtra. FP/MH/Approach/152907/2022. Further, Government of Maharashtra (Revenue and Forest Department) vide Government Order No.FLD-1324/ C.R.19/F-10, Mantralaya Mumbai Dated 13/02/2026 granted permission for Diversion of 0.0081 Ha. (0.0216 ha.) Reserved Forest Land in Favour of Dinesh Patel for Approach road to private land in survey No. 10 (New Gut. No. 25) to Private land Gut. No. 32/3 of Village Karade Khurd, Taluka Panvel, Dist. Raigad,

Maharashtra. This permission is granted subject fulfilment of the following terms/ conditions-

As per the above GOI letter dated 15/03/2024 & dated 24/06/2025

**1. In-Principle/Stage-I 15/03/2024 condition**

I. The legal status of forest land shall remain unchanged
II. The demarcation of the proposed forest area shall be carried out at suitable places as per the direction of the DCF concerned at the cost of the User Agency
III. The State Government shall realize cost towards raising and maintenance of 100 trees from the User Agency
IV. The State Government shall charge the Net Present Value of the diverted forest land measuring 0.0081 ha from the User Agency as per the orders of the Hon'ble Supreme Court dated 28.03.2008 and 09.05.2008 in IA Nos.826 in 566 with related IA's in Writ Petition (Civil) No.202/1995 and Ministry's guideline.
V. Additional amount of the Net Present Value (NPV) of the diverted forest land if any, becoming due after revision of the same by the Hon'ble Supreme Court of India in future, shall be charged by the State Government from the User Agency. The User Agency shall furnish an undertaking to this effect
VI. All the funds received from the User Agency under the projectshall be transferred deposited to CAMPA fund only through portal (https://parivesh.nic.in/)
VII. No tree felling shall be carried out in the forest area.
VIII.The State/UA shall ensure all other approvals/permission under relevant rules/regulation, if any required prior to commencement of the project work.
IX. Proper labour camps shall be constructed in the non-forest area and in any case, labour camp shall not be made within the RF area;
X. After ensuring settlement of rights under the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006 (2 of 2007) and compliance to all such conditions, the State Government shall issue order for diversion
XI. User Agency shall obtain Environmental Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act. 1986, if applicable;
XII. Sufficient firewood, preferably the alternate fuel, shall be provided by the User Agency to the laborers after purchasing the same from the State Forest Department or the Forest Development Corporation or any other legal source of alternate fuel
XIII. No additional or new path will be constructed inside the forest area for the transportation of construction materials for execution of the project work
XIV. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred or sublet to any other agencies, department or person without prior approval of Govt. of India.
XV. The total forest area utilized for the project shall not exceed0.0081 ha (width of road shall not exceed 4.5 mtr) and the forest area diverted shall not be used for any purpose other than those shown in the diversion proposal. The User Agency shall furnish an undertaking to this effect;
XVI. The User Agency and the State Government shall ensure compliance to the all acts, rules, regulation and guidelines of the Ministry, for the time being in force, as applicable to the subject project.
XVII. The User Agency and the State Government shall ensure compliance to the all acts, rules, regulation and guidelines of the Ministry, for the time being in force, as applicable to the subject project.
XVIII. Any other condition that the Regional Office, Nagpur may impose from time to time in the interest of afforestation, conservation and management of flora and fauna in the area shall be complied by the User Agency
XIX. The State Government shall process and submit compliance report on the above conditions through online (https://parivesh.nic.in/).

**2. Final Approval (04.06.2025) Condition**

I. The legal status of forest land shall remain unchanged3
II. The demarcation of the proposed forest area shall be carried out at suitable places as per the direction of the DCF concerned at the cost of the User Agency
III. The State Government shall realize cost towards raising and maintenance of 100 trees from the User Agency
IV. Additional amount of the Net Present Value (NPV) of the diverted forest land if any, becoming due after revision of the same by the Hon'ble Supreme Court of India in future, shall be charged by the State Government from the User Agency. The User Agency shall furnish an undertaking to this effect.
V.No tree felling shall be carried out in the forest area.
VI. The State/UA shall ensure all other approvals/permission under relevant rules/regulation, if any required prior to commencement of the project work.
VII. Proper labour camps shall be constructed in the non-forest area and in any case, labour camp shall not be made within the RF area
VIII. After ensuring settlement of rights under the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act,2006 (2 of 2007) and compliance to all such conditions, the State Government shall issue order for diversion
IX. User Agency shall obtain Environmental Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act. 1986, if applicable
X. Sufficient firewood, preferably the alternate fuel, shall be provided by the User Agency to the laborers after purchasing the same from the State Forest Department or the Forest Development Corporation or any other legal source of alternate fuel
XI. No additional or new path will be constructed inside the forest area for the transportation of construction materials for execution of the project work
XII. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred or sublet to any other agencies, department or person without prior approval of Govt. of India
XIII. The total forest area utilized for the project shall not exceed0.0081 ha (width of road shall not exceed 4.5 mtr) and the forest area diverted shall not be used for any purpose other than those shown in the diversion proposal.
XIV. The User Agency and the State Government shall ensure compliance to the all acts, rules, regulation and guidelines of the Ministry, for the time being in force, as applicable to the subject project.
XV. Any other condition that the Regional Office, Nagpur may impose from time to time in the interest of afforestation, conservation and management of flora and fauna in the area shall be complied by the User Agency
XVI. In the event of failure to comply with any of the above conditions the User Agency is liable for penal action as per the rules guidelines issued under Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980.

The above cited letter of In-principle & Final approval on central Government website www.parivesh.nic.in and government of Maharashtra Order is available on Government of Maharashtra's website www.maharashtra.gov.in with Reference No. 202602131247445519

Date : / / 2026
Place Karade Khurd Panvel
Sd/-
**Dinesh Patel**
At Karade Khurd Panvel District Raigad

## निवडक

### तळा येथे शिमगोत्सवाची धामधूम

**तळा :** शिमगोत्सव म्हटला की शहरातील चाकरमान्यांची पाऊले आपोआप कोकणात आपल्या गावाकडे वळली जातात. ऐतिहासिक महत्त्व प्राप्त असलेल्या तळा शहरातील शिमगोत्सवाची सध्या तळा शहरात धामधूम असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.भक्त प्रल्हादाला हिरण्यकश्यपूने जाळण्याचा प्रयत्न केला त्यावेळी होलिकेने त्याला मांडीवर घेऊन रक्षण केल्याची आख्यायिका आहे.त्यामुळे होळी सणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असल्याने दरवर्षी शिमगोत्सवाला आवर्जून चाकरमानी आपल्या गावी परततात.तळा शहरातील शिमगोत्सवाला जुनी परंपरा लाभली आहे.तळा शहरात बारा वाड्यांच्या होळ्या म्हणजे चाकरमान्यांसाठी विशेष पर्वणीच असते.होळीच्या एक दिवस अगोदर साजरी करण्यात येणारी चोर हळकुंड आणि धवचोळ प्रसिध्द आहे.या दिवशी गावकरी जंगलात जाऊन होळीसाठी लाकडे तोडून आणतात. परगण्यातील प्रत्येक गावाचा तमाशा तळा बाजारपेठेत दाखल होतो.यावेळी प्रत्येक घरोघरी जाऊन तमाशा मागितला जातो. गोमुची भूमिका एक पुरुष करतो.गोमू कशी सजली आहे,साडीचा रंग, केसांची रचना, तोंडाची रंगरंगोटी, नकली दागदागिने या सर्वच गोष्टींचे कुतूहल असते.यांशिवाय शंकासुरांची सलामी देखील आकर्षणाचा विषय असतो.तळा शहराची ग्रामदेवता चंडिका देवीचे मूळ स्थान तळेगावच्या कोंडीवर असल्यामुळे तळेगावचा शंकासुर जोगवाडीच्या शंकासुरच्या भेटीस होळीच्या एक दिवस आधी येतो यावेळी दोन्ही शंकासुरांची सलामी पाहण्यासाठी प्रचंड प्रमाणात गर्दी होते.दुसऱ्या दिवशी होळीला जोगवाडी येथे मोठी गर्दी असते. होळीला केले असलेले नवस फेडून झाल्यावर होळी पेटविण्यात येते.जोगवाडी ची होळी लागल्यानंतर बारावाड्यांतील प्रत्येक होळी लागते ही पूर्वपार चालत आलेली प्रथा आजही कायम आहे.

### बालरुग्ण आरोग्य शिबीर संपन्न

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ.राजेश पाचारकर मित्र फाउंडेशन व जहरा हसनत चॅरिटेबल ट्रस्ट ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वर्षांखालील बालकांसाठी सुपर स्पेशालिस्ट मोफत आरोग्य तपासणी शिबिराचं आयोजन करण्यात आले. सन २०१८ पासून आरोग्य, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात गरजूंसाठी सातत्याने कार्यरत असलेले श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील सेवाभावी व्यक्तिमत्त्व डॉ.राजेश पाचारकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात बाल शल्य चिकित्सक डॉ. अपूर्व कुलकर्णी,बाल अस्थिरोग तज्ञ डॉ.रोहित जैन,बाल नेत्ररोग तज्ञ डॉ.अंकिता पाटील,बाल मेंदू व मज्जासंस्था तज्ञ डॉ.काव्या राजारामन, बाल मेंदू व मज्जासंस्था पुनर्वसन तज्ञ डॉ. मिनाक्षी फेरवाणी तसेच व भाषा उपचारतज्ञ डॉ.प्रियांका मोरे यांनी जन्मजात विकार, अस्थिरोग, नेत्ररोग, मेंदू व मज्जासंस्थेचे विकार तसेच भाषा विकासाशी संबंधित समस्यांवर सखोल तपासणी करून पालकांना पुढील उपचार, योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ.संतोष नारायणकर, डॉ.कौस्तुभ केळस्कर, डॉ.अक्षय पोवार, डॉ.फरहा जलाल, डॉ.जहराबतुल जमादार, किशोर नागे, किशोर गोरटे, शंकर मयेकर, सलीम ढालाईत, प्राचार्य बाबासाहेब येळमंते,आदी उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या संचालिका जहरा कुतुबुद्दीन, साहीर मोतीवाला आणि ट्रस्टचे विविध पदाधिकारी, डॉ. प्रतिक गवई, डॉ.किशोर कोठुळे आदींचे डॉ.पाचारकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

### नेरळ रेल्वे फाटक सहा दिवस बंद



**नेरळ :** मध्य रेल्वेच्या मेन लाइन वरील नेरळ रेल्वे गेट क्रमांक २१ रेल्वेच्या तांत्रिक आणि अभियांत्रिकी कामासाठी सलग सहा दिवस रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे.२६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपासून ३ मार्च २०२६ रोजी रात्री ०८ वाजेपर्यंत सलग सहा दिवस हे फाटक बंद राहणार आहे. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आणि वाहनचालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नेरळ येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम रखडलेले आहे. वारंवार रेल्वे गेटमध्ये होणारे तांत्रिक बिघाड आणि आता थेट सहा दिवस बंद असल्यामुळे नेरळकरांच्या सहनशीलतेचा अंत होत आहे. रेल्वे प्रशासनाने हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे आणि रखडलेल्या उड्डाणपुलाबाबत ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. दहावी ची परीक्षा सुरू असताना हे फाटक बंद राहणार असल्याने वाहनांना काही किलोमीटर अंतरावरून वाहतूक करावी लागणार आहे. दरम्यान वाहतुकीचा खोळंबा आणि पर्यायी रस्त्यांची स्थिती अत्यंत बिकट आहे.वाहनचालकांना आता दामत रेल्वे गेट ते आंबिवली रेल्वे गेट असा वळसा घालून प्रवास करावा लागणार आहे.



### माथेरानमध्ये झाड कोसळले

**नेरळ :** माथेरान शहरात येणारे पर्यटक हे वाहनाने आल्यावर दस्तुरी येथे वाहने लावल्या जाणाऱ्या पार्किंग प्रवेशद्वारावर सुकलेले झाड कोसळले. काही वेळ ते झाड रस्त्यातून बाजूला करण्यासाठी लागली. परिणामी साधारण तासभर माथेरान दस्तुरी नाका येथे वाहने अडकून पडली. माथेरान येथे वाहने घेऊन पर्यटक येत असतात आणि पर्यटक वाहन तळाकडे जात असतात. त्या प्रवेशद्वारावर जुने झाड कोसळले. त्या प्रवेशद्वरातून माथेरान वन चौकी येथे असलेले जुन्या झाडाच्या सुकलेल्या फांद्या अचानक कोसळल्या. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ सुरु असते. झाडाच्या मोठ्या फांद्या तुटल्या त्यावेळी कोणतेही वाहन रस्त्याने वाहतूक करीत नव्हते आणि त्यामुळे मोठा अपघात टळला आहे.त्याचवेळी हा सर्व प्रकार तेथील सीसीटीव्ही कॅमेरे यांच्यात कैद झाला असून झाडाच्या फांद्या कोसळत असताना तेथून एखादे वाहन जात असते तर मोठ्या प्रमाणात नुकसान त्या वाहनाला झाले असते. झाडाच्या फांद्या कोसळल्या त्यावेळी कोणताही वाहन तेथून जात नव्हते. विशेष म्हणजे झाड कोसळलेल्या ठिकाणी वन विभागाचे कार्यालय आहे.

# एनसीएमसीमुळे लालपरी होणार ‘स्मार्ट’!

## ।। एसटीचे डिजीटल इंडियाच्या दिशेने पाऊल, पारदर्शक, सुलभ प्रवासासाठी वन नेशन, वन कार्ड

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपल्या सेवांचे आधुनिकीकरण करत रोख व्यवहार कमी करण्याच्या दिशेने पाऊल उचलले आहे. प्रवास अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने संपूर्ण राज्यात नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड एनसीएमसी प्रणाली लागू करण्यात येत आहे.



विविध सवलतींचा लाभ घेणाऱ्या सर्व प्रवाशांसाठी हे स्मार्ट कार्ड बाळगणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. वन नेशन, वन कार्ड या संकल्पनेवर आधारित असलेले नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड एनसीएमसी केवळ एसटी प्रवासापुरते मर्यादित नसून, भविष्यात मेट्रो, रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक सेवांमध्येही एकाच कार्डद्वारे व्यवहार करण्याची सुविधा उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे प्रवाशांना वेगवेगळ्या तिकिट किंवा सुट्ट्या पैशांची गरज भासणार नाही. एनसीएमसीमुळे एसटीचा प्रवास सुरक्षित, पारदर्शक होणार असला, तरी प्रारंभीच्या टप्प्यात नागरिकांना काही प्रक्रियात्मक व तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

### पारदर्शकता वाढविणे

या नव्या प्रणालीमुळे सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविहीत व्यवहार शक्य होणार आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महामंडळाने एबिक्स टेक्नॉलॉजीस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक आणि यांच्याशी करार केला आहे.

### कार्ड कुठे मिळणार?

सध्या विभागीय कार्यालयांमध्ये नोंदणी प्रक्रिया सुरू असून, प्रत्येक आगारात आवश्यक कागदपत्रे आणि शुल्क भरून हे स्मार्ट कार्ड मिळू शकते. सवलतधारकांनी लवकरात लवकर अर्ज करून कार्ड प्राप्त करावे, असे आवाहन एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### नागरिकांना काय त्रास?

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कडून लागू करण्यात येत असलेल्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) प्रणालीमुळे प्रवास अधिक पारदर्शक व डिजिटल होणार असला, तरी सुरुवातीच्या टप्प्यात काही अडचणींना सामोरे जावे लागू शकते. या नव्याने निर्माण झालेल्या प्रणालीमुळे नागरिक व सवलत धारकांतून उलट सुलट चर्चा सुरू आहे.

### कोणाला कार्ड अनिवार्य?

सवलतधारक प्रवाशांना एनसीएमसी कार्ड घेणे बंधनकारक राहील. शालेय व तांत्रिक शिक्षण घेणारे विद्यार्थी सरल क्रमांकाशी संलग्न कार्ड अमृत ज्येष्ठ नागरिक व सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आधार संलग्न कार्ड, महिला प्रवासी आधार संलग्न सुविधा दिव्यांग प्रवासी यूडीआयडी क्रमांक जोडलेले विशेष कार्ड, स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार व राज्यस्तरीय पुरस्कार विजेते मुख्यालय, विभागीय कार्यालय व आगारामार्फत वितरण यामुळे सवलतींची पडताळणी तत्काळ होऊन तिकीट वितरण प्रक्रिया अधिक जलद व पारदर्शक होणार आहे.

### संभाव्य अडचणी

नोंदणी प्रक्रियेत विलंब संबंधित आगार व विभागीय कार्यालयात मोठी गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ग्रामीण व दुर दुरून आलेल्या प्रवासी नागरिकांना तासनतास या कामासाठी अडकून बसावे लागणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे जेणेकरून त्यांचा वेळ व पैसा वाचेल, तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांना वारंवार फेऱ्या माराव्या लागणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. कागदपत्रांची अडचण आधार संलग्नता, सरल क्रमांक, यूडीआयडी पडताळणी यासाठी आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असल्यास अर्ज रखडू शकतो.

## किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

**| चिरनेर | प्रतिनिधी|**

खारपाडा येथील हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यामंदिरात किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी मैत्री, प्रेम आणि आकर्षण या अत्यंत संवेदनशील व समकालीन विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पेण यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी मार्गदर्शक जगदीश डंगर व योगिता डंगर यांनी विद्यार्थ्यांशी संवादात्मक पद्धतीने संवाद साधून चर्चा केली. त्यांनी मैत्री, आकर्षण आणि प्रेम यातील सूक्ष्म भेद सोप्या, प्रभावी आणि समजण्यासारख्या उदाहरणांद्वारे स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंका मोकळेपणाने मांडल्या. रमाकांत घरत तसेच शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मजागरूकता वाढीस लागून योग्य निर्णयक्षमतेची जाणीव निर्माण झाली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरला, असे मतही उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## लक्ष्मीबाई कांबळे यांचे निधन



**बोर्लीपंचतन :** कापोली येथील वृत्तपत्र विक्रेते व पत्रकार विजय कांबळे यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई कांबळे यांचे बुधवारी (दि.२५) निधन झाले. काही दिवसापासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. कापोली येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अंगणवाडी केंद्राचा सातासमुद्रापलीकडे झेंडा

**| भाकरवड | प्रतिनिधी |**

अंगणवाडी केंद्र भाकरवड येथे नॅशनल लेव्हल इ आकार रॉकेट लर्निंग कमिटी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी भेट दिली.



यावेळी नॅशनल लेव्हल इ आकार रॉकेट लर्निंग हून मिस्टर लुकेन, मिस रुबेका, मिस सुप्रिया, बालविकास प्रकल्प अधिकारी अलिबाग शर्मिला पाटील (पिंगळे), परिक्षिका सामिया पेरेकर, शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ अरुण राऊत, अंगणवाडी सेविका वैशाली पाटील, समिता पाटील यांच्या सह विद्यार्थी पालक, ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

या सर्वांचे स्वागत शाळेच्या वतीने अंगणवाडी सेविका, शिक्षण तज्ञ, यांच्या हस्ते करण्यात आले. इ आकार अभ्यासक्रमाद्वारे मुलांना कशा पद्धतीने शिकवले जाते. दोन ते अडीच तास अंगणवाडीतील कृतीचे निरीक्षण करून, मुलांसोबत प्रत्यक्ष कृती करून अंगणवाडी सेविका, मदतनीस पालक यांच्याशी संवाद साधला. मुलांच्या इ आकार अभ्यासक्रमाच्या कृती मुलांचा वहीवरील अभ्यास, पेपर, भाषणे, बडबडगीते पाहून त्यांनी मुलांना शुभेच्छा दिल्या. मुलांच्या पालकांशी संवाद साधून शिक्षण मातृभाषेतून असणे गरजेचे आहे याचे महत्व सांगितले.

## पी.एन.पी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयातील मराठी भाषा विभागातर्फे २७ फेब्रुवारी रोजी ‘मराठी भाषा गौरव दिना’चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पी.एन.पी. माध्यमिक शाळा, वेश्वीचे मुख्याध्यापक निलेश मगर, दै. कृषीवलचे सहयोगी संपादक सुयोग आंग्रे, महाविद्यालयाचे प्रशासकीय सल्लागार, गबाजी गीते, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे आदी मान्यवर उपस्थित होते.




सदर कार्यक्रमाची सुरुवात मराठी अभिमान गीताने करण्यात आली. तसेच महाविद्यालयातील एफ. वाय. बी. ए. ची विद्यार्थिनी सृष्टी पाटील हिने मराठी गौरव गीत सादर केले. यानंतर कला व मराठी विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेमध्ये महाविद्यालयातील मराठी विभागाचा थोडक्यात आढावा घेऊन मराठी भाषेविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

विशेष म्हणजे मराठी विभागाच्या माझं गाव या विशेषंकाचे अनावरण प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले, तसेच या विशेषांकामध्ये ज्या ज्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी लेख लिहिले त्या सर्वांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमामध्ये मराठी भाषेप्रती आपली भूमिका मांडताना ईशा पाटील, रिया मुळीक, हर्तिका पाटील, श्वेता शिवलकर, सृष्टी पाटील, विशाल कुशवाल, सार्थक नागावकर, या सर्व विद्यार्थ्यांनी मराठी भाषेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शिक्षक वृंदामध्ये डॉ. रसिका म्हात्रे, प्रा. पूजा म्हात्रे, प्रा. वृषाली घरत, प्रा. जयश्री ठाकूर, प्रा. साईनाथ पाटील यांनी मराठी भाषा आणि बोली संवर्धन याविषयी आपली भूमिका व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी निलेश मगर यांनी मराठी भाषेची थोरवी व्यक्त केली. मराठीच्या इतिहास आणि परंपरेचा त्यांनी आधुनिक युगाशी सहसंबध व्यक्त करत विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. दैनिक कृषीवलचे सहयोगी संपादक व महाविद्यालयातील मराठी विभागाचे माजी विद्यार्थी सुयोग आंग्रे यांनी मराठी भाषेबद्दल विद्यार्थ्यांप्रती असणारा स्वाभिमान जागृत होण्याच्या दृष्टिकोनातून एकंदरीतच मराठी भाषेच्या इतिहासावर लक्ष केंद्रित केले. तसेच मराठीच्या भूतकाळाचा मागोवा घेत वर्तमान काळातील संदर्भ घेऊन भविष्यातील मराठी भाषेविषयी असलेली आपली जबाबदारीची जाणीव व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या वक्तव्याचे कौतुक केले. महाविद्यालायचा मराठी विभाग हा कायमच मराठी बोली आणि भाषेचे संवर्धन करीत दरवर्षी असे अभिजात उपक्रम राबवत असतो असे आपले मत प्रतिपादन केले. मराठी भाषा विषयक ‘माझी मराठी’ ही कविता सादर केली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मराठी विभागातील प्रा. रूपाली पाटील यांनी व्यक्त केले. विद्यार्थीच्या पारंपरिक पेहरावाने कार्यक्रमाच्या उत्साहात अधिकच भर पडली. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील कला वाणिज्य व विज्ञान विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## त्वचारोग तपासणी शिबीर संपन्न

**रायगड :** समता फांऊडेशन मुंबई या सामाजिक संस्थेमार्फत सामाजिक बांधीलकी जपत अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग जिल्हा कारागृहात त्वचारोग तपासणी शिबीर कार्यक्रम संपन्न झाला. या आरोग्य शिबीरात डॉ.सुयश विरकर यांनी बंदी बांधवांना त्वचारोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

## ‘मुरूड स्वच्छ अन सुंदर करणे सर्वांची जबाबदारी’

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

स्वच्छता मोहिमेत शहरातील प्रत्येक नागरिकांनी भाग घेऊन स्वच्छतेचे महत्त्व जाणले पाहिजे स्वच्छता ही निरंतर चालणारी प्रक्रिया असुन त्यामध्ये सातत्य असणे आजच्या काळाची गरज आहे. स्वच्छता हीच सेवा आपले शहर स्वच्छ व सुंदर कसे राहील यांची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे, असे प्रतिपादन मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले.

यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी हातात खराटा घेऊन एकदरा पुलाजवळील परिसरात स्वच्छतेला सुरुवात केली. यावेळी शेकडो हात स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, सतेज निमकर, मनोहर बैले, मंगेश पाटील, मोहन करंदेकर, दिपक मयेकर, रुपेश पाटील, आदेश दांडेकर, प्रमिला माळी, अनिकेत भोसले, अनिकेत वाजे आदी मोहिमेत उपस्थित होते.

## रायगडात स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियान

**| महाड | प्रतिनिधी |**

संत निरंकारी मिशनच्या वतीने प्रोजेक्ट अमृत अंतर्गत स्वच्छ जल, स्वच्छ मन या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन सतगुरु माता सुदीक्षा यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत रायगड जिल्ह्यातील नद्यांसह शहरातील विविध तलाव, विहिरी अशा एकूण २२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली.

रायगड जिल्ह्यामध्ये खोपोली, सावरोली, मार्केवाडी, तिवरे, पेण, बोर्वे, रोहा, कोंडगाव, अलिबाग, पोयनाड, सारळ, भिलजी, खरसई, भरडखोल, श्रीवर्धन, वडवली, खरवली, कडापे, चोरवली, महाड, बिरवाडी तसेच रावतळी या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

महाड तालुक्यातील नडगाव तर्फे बिरवाडी येथील सावित्री आणि काळ नदी संगमच्या परिसरात तसेच केतकीचा कोंड (भवानी नगर) वाळण बु. येथील विहीरीसह परिसरामध्ये आणि पारदुलेवाडी येथे तलावाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य व प्रेरणादायी आयोजन सतगुरु माता सुदीक्षा व निरंकारी राजपिता रमित यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १ हजार ६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीपणे पार पडले. या अभियानात सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला अशी माहिती संत निरंकारी मंडळाचे खरसईचे झोनल इंचार्ज प्रकाश म्हात्रे यांनी दिली.

संत निरंकारी चॅरीटेबल फाउंडेशनच्या सचिवांनी अभियानाविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, या उपक्रमाची सुरुवात सेवादलाच्या प्रार्थनेने झाली. त्यामुळे संपूर्ण वातावरण आध्यात्मिक उर्जेने भारावून गेले. देशभर प्रसारित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून सुरक्षा, शिस्त आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. आयोजनाची सुसूत्र आणि संस्कारित कार्यपद्धती यामुळे अधोरेखित झाली.

**बोटीच्या स्वागतासाठी जय्यत तयारी** | **वेताळ देवाला मासळीसाठी घालणार साकडे**

# किनाऱ्यावर होळी सणासाठी सजलेल्या बोटी परतल्या

**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

मुरुड-मागील चार महिन्यांपासून वातावरणातील बदलल्यामुळे मासे फार अल्प प्रमाणात मिळत आहेत. त्यामुळे प्रमुख आर्थिक स्रोतावर गंभीर संकट असून सुद्धा होळी सणात याचे कुठेही सावट दिसत नाही. होळी सण साजरा करण्यासाठी असंख्य बोटी किनाऱ्यावर येत आहेत. मुरुड परिसरात होळी सण मोठ्या उत्साहात साजरा होते.



होळीच्या ७ दिवस आधी मासेमारीसाठी गेलेल्या बोटी होळीसाठी परतात तेव्हा किनाऱ्यावर येण्याआधी आपली बोट समुद्रात असतानाच फुलांनी सजवतात. भगवे झेंडे, पिवळे झेंडे, बोटीवर डिझे स्पीकर लावून घरी परताना कोळी गाणी वाजवत, नाचत गुलाल उधळत मुरुड किनाऱ्यावर येतात. फटाके वाजवत येणाऱ्या बोटींना पाहण्यासाठी मुरुडकर एकदरा पुलावर गर्दी करतात. आपली सजलेली बोट जेटीवर येताना तिचे स्वागत घराचे लहान मुले, महिला पूजन करवून करतात. हा आगळावेगळा सोहळा मुरुडच्या किनाऱ्यावर सुरु झाला.

किनारपट्टी भागात मासेमारी या प्रमुख व्यवसायावर समस्त कोळी बांधवांचे जीवन अवलंबून आहे. खोल समुद्रात मासळी पकडून ती मुंबई येथील ससून डॉक येथे विकून तो आपल्या कुटुंबाचे पोषण करतो. कोळी समाज हा भावनिक व श्रद्धाळूसुद्धा आहे. कोकणातील समस्त कोळी समाजाचा आवडता सण म्हणजे होळी. होळी सुरू होण्याअगोदर खोल समुद्रात सापडलेली मासळी मुंबईत विकून आनंदात होड्या आपल्या मायभूमीत येत असतात. सध्या असंख्य होड्या मुरूड तालुक्यातील नांदगाव, राजपुरी, एकदर, आगरदांडा, दिघी येथे येत असून, होळीसाठी मुंबईतून समस्त कोळी बांधव येत आहेत. मुंबईतून निघताना बोटी विविध रंगबिरंगी कापडाच्या झुलीने सजविल्या जातात. विविध फुले, विविध रंगाच्या पताका, रंगबिरंगी झेंडे व कोळी लोक पारंपरिक वेशभूषा परिधान करून खंदेरी येथे वेताळ देवाचे दर्शन घेऊन त्याची पूजा करून येणाऱ्या दिवसात चांगली मासळी मिळावी व समुद्र देवतेपासून आपले सदैव रक्षण व्हावे, अशी वेताळ देवापुढे प्रार्थना करतात.

### आनंदाची उधळण

कोळी बांधव होळी हा सण मोठ्या आनंदाने साजरा करीत असतात. आपल्या वर्षभरातील आपापसातील सर्व वैमनस्य विसरून गुण्यागोविंदाने हा सण साजरा करीत असतात. या होळीमध्ये तरुण व वृद्ध स्त्री-पुरुष सर्व उपक्रमांमध्ये आवर्जून सहभागी होतात. विशेष म्हणजे, इतर जातींपेक्षा कोळी समाजाचा होळी सण हा प्रकर्षाने साजरा केल्याचे जाणवते. सर्व दु:ख विसरून आनंद उधळणार हा सण म्हणून समस्त कोळी समाज होळी सणाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहात असतो.

## राज्याची हालहवाल

नाटक-तमाशातले राजांचा दरबारातला एक प्रश्न ठरलेला असतो. प्रधानजी आमच्या राज्याची हालहवाल कशी आहे हा तो प्रश्न. त्यावर सर्व काही उत्तम आहे असे पहिल्या वाक्यात सांगून नंतर राज्यातल्या भानगडींबाबत हळूच प्रधानजींनी बोलावे हेही ठरलेले असते. लोकशाहीतले खरे राजे म्हणजे जनता. तिला आपल्या प्रधानजींना थेट प्रश्न विचारण्याची काही संधी नाही. म्हणून मग प्रधानजी अर्थात, राज्याचे मुख्यमंत्री किंवा देशाचे पंतप्रधान कधीतरी विधिमंडळ वा संसदेत येऊन राज्यात सर्व कशी आबादीआबाद आहे ते सांगत असतात. गुरुवारी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलरची होण्याच्या मार्गावर आहे असा भरवसा दिला. राज्यात परदेशांमधून प्रचंड गुंतवणूक येते आहे, लाखो लोकांना रोजगार मिळत आहेत, आम्ही चोवीस तास जनतेच्या सेवेसाठी झटत आहोत असेच जणू देवेंद्र सांगत होते. महाराष्ट्राची स्पर्धा आता गुजरात किंवा तमिळनाडूसोबत नसून युरोपातल्या बेल्जियम सारख्या देशांसोबत आहे असेही काल त्यांनी सुचवून टाकले. अशा अनेक छोट्या देशांच्या अर्थव्यवस्थादेखील लाख कोटी डॉलर्स म्हणजे सुमारे १०० किंवा २०० लाख कोटी रुपयांच्या आकारमानाच्या नाहीत असे त्यांचे म्हणणे होते. आकड्यांच्या दृष्टीने ही माहिती खोटी नसली तरी ही तुलनाच मुळात चुकीची आहे हे मात्र त्यांनी दडवून ठेवले. ज्या बेल्जियमचे त्यांनी उदाहरण दिले त्या देशाचे सकल उत्पादन किंवा जीडीपी आहे ७१ हजार कोटी डॉलर म्हणजे सुमारे ६५ लाख कोटी रुपये. महाराष्ट्राचे उत्पादन सध्या ५१ लाख कोटी रुपये आहे. म्हणजे ते बेल्जियमच्या जवळपास वाटते. पण महाराष्ट्राची लोकसंख्या तेरा कोटी आहे तर बेल्जियमची अवघी दोन कोटी. उघडच तो देश अतिश्रीमंत म्हणून गणला जातो. तर महाराष्ट्रात फक्त लोढा, अदानी, अंबानी किंवा भाजपशी संबंधित राजकारणी हेच केवळ अतिश्रीमंतांमध्ये मोडतात. बाकीची बहुसंख्य जनता अतिगरीब किंवा जेमतेम गुजारा करणारी आहे.

### कुपोषणाचे ३४ हजार बळी

काल मुख्यमंत्री अर्थव्यवस्थेविषयी बोलत असताना त्यांच्याच महिला व बाल विभागाने विधान परिषदेत लेखी उत्तरामध्ये दिलेली माहिती उल्लेखनीय आहे. कुपोषणामुळे राज्यात गेल्या अडीच वर्षात तब्बल ३४ हजार बालकांचा मृत्यू झाल्याची कबुली या उत्तरात सरकारने दिली. ही अधिकृत नोंद झालेली मृत्यूंची संख्या आहे. यापलिकडे कुपोषणाचे मृत्यू म्हणून दखल न घेतलेले आणखी कितीतरी असू शकतील. मुख्य म्हणजे ही मुले पाच वर्षांखालील असून मुंबई व पुण्यासारख्या शहरांमध्येही काही हजार मुले कुपोषणाने मरण पावली आहेत. मुंबईतले उड्डाणपूल किंवा मेट्रोचे प्रकल्प म्हणजे विकास अशी सध्याच्या राज्यकर्त्यांची कल्पना झाली आहे. जनतेनेही तीच मान्य करावी अशी त्यांची इच्छा असते. अर्थात, लोकांना प्रत्यक्ष जगताना विकासाचा काहीही अनुभव आला नाही किंवा जीणे कितीही अवघड झाले तरी त्यांच्या आवाजाला फार किंमत नाही. सध्याच्या काळात भाजप व त्याच्यासारखे पक्ष आपल्या प्रचारामध्ये हा आवाज दडपून टाकत असतात. विधिमंडळाचे नियम आहेत व अजूनही काही सजग सदस्य आहेत म्हणून कुपोषणासारखी माहिती किमान जनतेसमोर येते. मात्र या माहितीला मिडियामध्ये फार स्थान मिळू नये व त्याची विशेष चर्चा होऊ नये असा बंदोबस्त झालेला आहे. त्याचमुळे महाराष्ट्र एक लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था होणार याचे ढोल सतत जोरजोरात वाजवले जात असतात. यातही भाजपवाले नेहमी ट्रिलियनच्या भाषेत बोलतात. त्याचा अर्थ बऱ्याच लोकांना कळत नाही. हे काहीतरी प्रचंड मोठे आहे इतकेच कळते. ते मोठे आहेच. एक ट्रिलियन म्हणजे एक लाख कोटी. पण या लाख कोटींचा आपल्या रोजच्या अडचणींमध्ये फार उपयोग नाही हे अनेकांच्या लक्षात येत नाही. राज्याची अर्थव्यवस्था तीन वर्षात एक लाख कोटी रुपये करायची हे उद्दिष्टच बनावट आह. पूर्वीचे राज्यकर्ते गरिबी कमी करू, अमुक इतके रोजगार देऊ अशी भाषा करीत असत. आता अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरची होणार असे सांगून भुलवले जाते. अर्थव्यवस्था वाढली की आपोआप सर्वांचे उत्पन्न वाढणार आहे असा त्यातला भाव असतो. भाजपच्या भक्तांना तो खरा वाटतो. पण प्रत्यक्षात तो तसा नाही.

### दिवसाला तीन आत्महत्या

राज्यात दिवसाला सरासरी तीन शेतकरी आत्महत्या करीत असल्याची आणखी एक कबुली काल विधानसभेत या सरकारला द्यावी लागली. वर्षभरात सुमारे १९८७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. कर्जबाजारीपणा, सततची नापिकी, शेतीमालाला भाव न मिळणे अशी याची कारणे असल्याचे सरकारला मान्य आहे. यावर उपाय योजणे चालू आहे असे सरकार म्हणते. अर्थव्यवस्था लाखो कोटींची झाली म्हणून याची उत्तरे आपोआप मिळत नाहीत. आता येत्या चार महिन्यात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर होईल. त्यातही बरेच पणपरंतु असतीलच. तरीही तो अनेक शेतकऱ्यांसाठी तो दिलासा असेल. त्यामुळे ही माफी गरजेचीच आहे. पण शेतीच्या प्रश्नावर हा कायम स्वरुपी उपाय नाही. आज कापूस, सोयाबीन या प्रमुख नगदी पिकांचे भाव कोसळले आहेत. पण सरकार शांतपणे ते पाहत आहे. साखरेचे भाव पडल्याने कारखाने अडचणीत असून ऊस शेतकऱ्यांची थकबाकी वाढत चालली आहे. कोकणात आंबा पिकाचे चक्र बिघडत चालले आहे. यंदाही अनेक ठिकाणी मोहोर काळा पडणे व गळणे अशा समस्या असून उत्पादन उशिरा येण्याची शक्यता आहे. आंब्याचा खेळ तर जेमतेम तीन-चार आठवड्यांचा झाला आहे. एप्रिलच्या त्या विशिष्ट काळात आंबा बाजारात आणता आला तरच शेतकऱ्यांना थोडाफार फायदा होऊ शकतो. अन्यथा नंतर दर कोसळतात हा नेहमीचा अनुभव झाला आहे. हा शेतकरी आंदोलने करीत नाही. त्याम ुळे त्याची सरकार दरबारी काही दखलही घेतली जात नाही. याहून खालचे शेतमजूर, कारागीर, शहरांमधले रोजंदारीवरचे लोक यांची स्थिती तर अजूनच बिकट आहे. अर्थव्यवस्था वाढत गेल्यानंतर घडते ते इतकेच की, हातपाय हलवले तर तुम्हाला किमान खायला काही मिळू शकते. त्यातच तुमच्याकडे गरिबांचे रेशनकार्ड असेल तर तुम्हाला धान्य फुकट मिळते. पण बाकी औषधपाणी, शिक्षण इत्यादींची चिंता संपत नाही. शिवाय शाश्वत उत्पन्न नसल्याने वयाची सत्तरी उलटली तरी बायाबापड्यांना काही ना काही काम करीत राहावे लागते. देवेंद्रांच्या गोडगुलाबी स्वप्नामध्ये या प्रश्नांचा उल्लेख नसतो. देशात सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात येत असल्याचा दावा फडणवीसांनी काल केला. ही गुंतवणूक सध्या मुख्यतः आयटी कंपन्यांमध्ये आहे. त्यातले रोजगार ठराविक वर्गापुरते मर्यादित आहेत. शिवाय एकूण नोकऱ्या कमीच होत आहेत. शिवाय फडणवीसांनीच मान्य केल्यानुसार, सामंजस्याचे करार अनेक होतात पण त्यातले निम्मेच करार प्रत्यक्षात येत असतात. त्यामुळे त्या स्वप्नातही बरेच भ्रम आहेत.

---

विचार

# बांगलादेशशी संबंध सुधारणार, की...

**बांगलादेशमधील निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी)'चा विजय झाला. शेख हसीना यांचे सरकार घालवणारे मूलतत्त्ववादी आणि बांगलादेशला पाकिस्तानच्या दावणीला उभे करणाऱ्या पक्षांना देशातील जनतेने नाकारले. या निवडणुकीत पाश्चात्यांसह अमेरिकेने घेतलेल्या भूमिकेचाही पराभव झाला. 'बीएनपी' सत्तेत येणे हे भारताच्या दृष्टीने 'दगडापेक्षा वीट मऊ' असल्याचे म्हटले जात आहे.**



प्रा. जयसिंग यादव

बांगलादेशाच्या जनतेने निवडणुकीचा कौल दिला आहे. भारताला बांगलादेशच्या निवडणुकीत काय होणार, याचा अगोदरच अंदाज आला असावा. भारत मित्र हसीना शेख यांच्या अवामी लीग पक्षावर निवडणूक लढवण्यास बंदी घातल्याने तो निवडणुकीच्या रिंगणात असणार नाही, हे स्पष्ट झाल्यानंतर तिथला प्रमुख विरोधी पक्ष 'बीएनपी' अन्य पक्षांपेक्षा बरा असे वाटणे स्वाभाविक होते. बांगलादेशच्या निर्मितीनंतरचा लष्करशहांच्या सत्तेचा अपवाद वगळता उर्वरित काळ या दोन पक्षांची आलटून पालटून सत्ता होती. खालिदा झिया यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात शेख हसीना यांच्या काळापेक्षा बांगलादेशचे भारताशी संबंध तितकेसे चांगले नव्हते, तरीही आताच्या युनूस सरकारच्या काळाइतके वाईट नव्हते. युनूस सरकार पाकिस्तानच्या कच्छपि लागले होते. मूलतत्त्ववाद्यांच्या दबावाखाली काम करत होते. पाकिस्तानच्या अतिरेक्यांचा बांगलादेशमार्गे धोका वाढला होता.

युनूस तर 'चिकन नेक' परिसरात चीनला द्वार खुले करून द्यायला निघाले होते. अशा परिस्थितीत तिथल्या 'जमात-ए-इस्लामी'च्या हाती सत्ता गेली असती, तर भारताला परवडणार नव्हते. अमेरिकेसह अन्य देशांनी 'जमात-ए-इस्लामी' ला पाठिंबा दिला होता. 'बीएनपी'चे बहुतांश नेते वृद्ध आणि त्यातही बरेचसे तुरुंगात. त्यामुळे 'बीएनपी'ला सत्ता मिळते की नाही, याबाबत सुरुवातीला साशंकता होती. हंगामी सरकारच्या काळात 'बीएनपी'च्या नेत्यांवरचे गुन्हे मागे घेतले, त्यांची सुटका करण्यात आली, तरीही सुरुवातीला कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही, असा अंदाज होता. ताज्या निकालांनंतर हा मुद्दा निकाली निघाला असून पुढील आव्हानांची चर्चा सुरु आहे.

१७ वर्षांनंतर ब्रिटनमधून परतल्यानंतर खालिदा झिया यांचे चिरंजीव तारिक रहमान यांचे ढाक्यात झालेले स्वागत पाहता तेच पक्षाला ऊर्जितावस्थेत नेतील, हा विश्वास सार्थ ठरला. बांगलादेशच्या जनतेने दिलेला निकाल केवळ बांगलादेशी राजकारणासाठीच नाही, तर भारतासाठीही महत्त्वाचा आहे. भारत 'बीएनपी'च्या विजयाला संकट किंवा उत्सवाचे कारण मानणार नाही. एका प्रकारे ही भारतासाठी एक परीक्षा असेल. भारतासाठी, सुरक्षा सहकार्य, परराष्ट्र धोरण संतुलन आणि आर्थिक भागीदारी हे बांगलादेशच्या नवीन सरकारशी त्याचे संबंध कोणत्या दिशेने जातात हे ठरवेल. गेल्या काही दिवसांमधील 'बीएनपी'ची भारताबाबत बदललेली भूमिका आणि प्रतिसाद लक्षात घेऊन भारत बांगलादेशशी सहकार्य वाढवेल. भारत आपल्या पर्यायांचा विचार करेल आणि व्यावहारिक पद्धतीने पुढील निर्णय घेईल. भारताने नेहमीच जनादेशाचा आदर केला. या वेळीही तेच केले आहे. तारिक यांचे अभिनंदन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले, की बांगलादेशमधील संसदीय निवडणुकीत 'बीएनपी'ला निर्णायक विजय मिळवून दिल्याबद्दल मी तारिक रहमान यांचे मनापासून अभिनंदन करतो. हा विजय बांगलादेशमधील जनतेचा तुमच्या नेतृत्वावरील विश्वास दर्शवतो. भारत लोकशाही, प्रगतीशील आणि समावेशक बांगलादेशच्या समर्थनात उभा राहील. आमचे बहुआयामी संबंध मजबूत करण्यासाठी आणि आमची सामान्य विकास उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी मी तुमच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे. मोदी यांची ही भाषा भारताची बांगलादेशप्रती असलेली भूमिका विषद करते.

भारताला 'जमात-ए-इस्लामी' या पाकिस्तानधार्जिण्या पक्षाला मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल चिंता होती. हा पक्ष पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय'च्या प्रभावाखाली असल्याचे मानले जाते. या निवडणुकीमध्ये जमात पक्ष सत्ता जिंकण्यासाठी पूर्णपणे तयार होता. त्याने ११ पक्षांशी युतीही केली होती. 'बीएनपी' आणि भारत यांच्यातील संबंध बरेच अस्वस्थतेचे होते, तरी सध्याच्या परिस्थितीत भारताने त्याकडे तुलनेने मध्यम आणि लोकशाहीवादी पर्याय म्हणून पाहण्यास सुरुवात केली. या परिस्थितीत भारताकडे मर्यादित पर्याय होते आणि त्यांना दोन कठीण पर्यायांमधून कमीत कमी हानिकारक मार्ग निवडावा लागला. दुसरीकडे, पाकिस्तानची विचारसरणी पूर्णपणे उलट आहे. त्यांनी अनेकदा भारतविरोधी पर्यायाचे समर्थन केले आहे. शेख हसीना यांच्या कारकिर्दीत बांगलादेशने पाकिस्तानपासून अंतर राखले होते; परंतु त्यांच्या पदच्युतीनंतर युनूस यांच्या नेतृत्वाखाली धोरणात अचानक बदल दिसून आला. त्याद्वारे पाकिस्तानशी संबंध मजबूत करण्यावर भर देण्यात आला होता, तर बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या भारतापासून स्वतःला दूर ठेवण्यावर भर देण्यात आला होता. 'जमात-ए-तैयबा' सत्तेत आली, तर ही जवळीक आणखी वाढेल अशी भीती होती. सत्तेत आल्यानंतर 'बीएनपी' चीन आणि पाकिस्तानशी किती जवळीक वाढवते याकडे भारताचे लक्ष आहे. 'जमात'सारख्या कट्टरपंथी पक्षाच्या आव्हानाला तोंड देत असताना 'बीएनपी'चा विजय बांगलादेशी हिंदूंना काही प्रमाणात दिलासा देणारा ठरेल. 'बीएनपी'ने 'जमात'च्या आधारे निवडणुका लढवल्या नाहीत. इक्बाल मंचचे नेते उस्मान हदी यांच्या हत्येनंतर बांगलादेशमध्ये झालेल्या अलिकडच्या हिंसाचारावर 'बीएनपी'ने टीका केली आहे. त्यात एका हिंदू तरुणाची लिंचिंग आणि हत्या यांचा समावेश आहे. 'जमात'कडून अशा प्रकारची कृती अपेक्षित नव्हती. बांगलादेशी हिंदूंना निश्चितच एक आशा आहे, की नवीन सरकारच्या काळात त्यांची परिस्थिती सुधारेल. बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी'ला थेट अमेरिकेचा पाठिंबा होता. तिला दारुण पराभव पत्करावा लागला. 'जमात'ला विद्यार्थी नेत्यांचा पाठिंबा होता आणि मोहम्मद युनूस यांच्या यंत्रणेचा पूर्ण पाठिंबा होता, तरीही निवडणुकीत कट्टरपंथी पक्षाला ५० जागा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. 'जमात'चा पराभव आणि 'बीएनपी'चा विजय दर्शवतो की देशाने कट्टरपंथी विचारसरणी नाकारली आहे आणि लोक मुख्य प्रवाहातील पक्षाला देशाचे भविष्य मानत आहेत. याचा अर्थ असा, की शेख हसीना यांना बांगलादेशमध्ये पुन्हा सत्तेत येण्याची संधी आहे. त्यामुळे भविष्यात अवामी लीग मुख्य प्रवाहात परत येऊ शकते. ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर 'जमात-ए-इस्लामी'ने जोरदार संघर्ष केला. दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप असलेल्या अनेक प्रमुख 'जमात' नेत्यांना मोहम्मद युनूस यांनी तुरुंगातून मुक्त केले. अमेरिकन अधिकाऱ्यांनी उघडपणे 'जमात' नेत्यांची भेट घेतली आणि 'मुस्लिम उम्मा'ने परदेशातून 'जमात'ला निधीही पुरवला, तरीही 'जमात'चा पराभव झाला. 'अवामी लीग'ला निवडणूक लढवण्याची परवानगी नव्हती. अशा परिस्थितीत बीएनपी हा प्रवाहातील एकमेव मुख्य पक्ष होता.

'बीएनपी'चा प्रचंड विजय दर्शवतो, की लोकांचा मुख्य प्रवाहातील पक्षावर विश्वास आहे. देशाचा मध्यमार्गी विचारसरणीवर विश्वास आहे. बांगलादेशच्या महिला मतदारांनी उघडपणे 'जमात-ए-इस्लामी'च्या विरोधात मतदान केले आहे. बांगलादेश निवडणुकीत पाश्चात्य सरकारे आणि आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था गट खूप सक्रिय होते. त्यांच्या प्रयत्नांना न जुमानता, मुहम्मद युनूस आता अप्रासंगिक बनले आहेत. त्यांच्या 'जुलै चार्टर जनमत'ला किती पाठिंबा मिळाला हे अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी युनूस आणि 'जमात'वर अमेरिका-ब्रिटन युतीने दिलेल्या पूर्ण पाठिंब्याचा फारसा परिणाम झाला नाही. आता भारताने तारिक रहमानशी प्राथमिक चर्चा केली आहे.

त्यांच्या आई बेगम खालिदा झिया यांच्या निधनानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ढाका येथे भेट दिली आणि पंतप्रधान मोदींनीही खालिदा झिया यांच्याबद्दल ट्विट केले. यामुळे भारताचे बांगलादेश सरकारशी स्थिर संबंध निर्माण होऊ शकतात. किमान कामकाजाचे संबंध प्रस्थापित होतील. शेख हसीना यांचा अवामी लीग पक्ष निवडणुकीतून बाहेर पडला होता. त्यामुळे ही लढत थेट 'जमात-ए-इस्लामी' आणि 'बीएनपी' यांच्यात झाली. 'जमात'ने हुशारीने प्रचार केला आणि स्वतःला एकसंघ, सुधारणावादी पक्ष म्हणून प्रस्तुत केले. तथापि, ते बांगलादेशच्या एका महत्त्वपूर्ण भागाला आकर्षित करण्यात अपयशी ठरले. तरी त्यांनी लक्षणीय जागा जिंकल्या, हे महत्वाचे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

चर्चा आजची

# पर्यावरणाचा समतोल बिघडतोय





प्रमोद जाधव

आजही असंख्य पर्यटक पर्यटनासाठी रायगड जिल्ह्याला पसंती दर्शवितात. जिल्ह्यातील सुंदर असे समुद्रकिनारे, झाडा फुलांनी नटलेली गावे पर्यटकांनी भूरळ घालतात. सतत गाडयांसह कंपनीतील धुरांनी त्रस्त झालेले पर्यटक रायगड जिल्ह्यात एक मोकळा श्वास घेण्यासाठी येतात. तिच उर्जा घेऊन पुन्हा आपल्या परतीच्या ामर्गावर जातात. मात्र जिल्ह्यात सिमेंटची जंगले मोठ्या प्रमाणात उभी राहवू लागली आहे. कारखान्यांमधील प्रदुषण वाढत आहे. याकडे प्रशासन व संबंधित विभागाकडून पाहणी, कारवाई होते. मात्र त्याची अंमलबजावणी ठोस होत नाही, अशी चर्चा कायमच नागरिकांकडून केली जाते. पर्यावरणाचा समतोल बिघडतोय. त्यामुळे प्रशासनासह अनेकांनी भविष्याचा विचार करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

रायगड जिल्ह्याला ग्रामीण जिल्हा म्हणून ओळखले जाते. भातशेतीसह, वाल पावटा, मुग हरभरा अशा पिकांसह पांढरा कांदा, वांगी, व इतर भाज्यांची लागवड जिल्हयात मोठ्या प्रमाणात केली जाते. याशिवाय नारळ, सुपारी, काजू तसेच आंबा या पिकांची लागवडही केली जात आहे. असंख्य तरुण मंडळी आंबा उत्पादनावर अधिक भर देत आहेत. कोरोना काळात नोकरी गेल्यावर असंख्य तरुणांनी शेतीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. काहींन आंबा, तर काहींनी कलिंगड सारख्या पिकांची लागवड करून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविण्याकडे लक्ष दिले आहे. पुर्वी शेतीकडे तरुणांचे लक्ष फारसे नव्हते. उत्पन्न कमी आणि खर्च अधिक या प्रकारामुळे अनेकांनी भातशेती लागवडीकडे पाठ फिरवली होती. परंतू शासनामार्फत राबविण्यात आलेल्या वेगवेगळ्या योजना, मिळालेले मार्गदर्शन यामुळे भातशेतीबरोबरच आंबा, कलिंगड व इतर पीक लागवड ठिकठिकाणी केली जाते. त्यामुळे पुर्वी रायगड जिल्हयाला भाताचे कोठार म्हणून ओळखले जाऊ लागले होते. सध्या जिल्हयाची ओळख पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची ठरत आहे. शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी तसेच अन्य सुट्टीच्या दिवशी पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल होऊन निसर्गरम्य अशा पर्यटन स्थळी भेटी देतात. नारळी पोफळीच्या बागा, सुंदर असा समुद्रकिनारा, सुरुची बने पर्यटकांसाठी कायमच आकर्षण ठरत आली आहे. मुंबई, पुणे येथील असंख्य पर्यटक त्यांच्या धगधगीच्या जिवनातून सुटकेचा श्वास घेण्यासाठी आणि मोकळी हवेचा आनंद घेण्यासाठी रायगड जिल्ह्यात येत आहेत. परंतु ही मोकळी आणि प्रदुषण मुक्त हवा आता प्रदुषीत होण्याच्या वाटेवर आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याचे चित्र आहे.

जिल्ह्यात गेल्या काही वर्षापासून झपाट्याने औद्योगिकरण वाढू लागले. त्यामुळे नागरिकीकरणातही वाढ झाली. त्याचा परिणाम जमीनीला महत्व प्राप्त झाले. वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी जमीनी संपादीत करण्यात आल्या. सध्या डांबरी रस्त्याची जागा सिमेंट काँक्रीटीकरणने घेतली आहे. रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे खुलेआमपणे तोडली जात आहेत. ठिकठिकाणी सिमेंटची जंगले उभी राहू लागली आहेत. त्यामुळे हवेत आता तापमानात वाढ होत आहे. दुपारच्यावेळी उन्हाचा तडाखा गेल्या काही वर्षात वाढू लागला आहे.

काही कंपन्यांमधील धुरांचे लोंढे त्रासदायक ठरत आहेत. सकाळच्या वेळेला बाहेर पडणेदेखील कठीण झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यात मुंबई महानगर प्रादेशिक विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळामार्फत रस्त्यांची कामे सुरु झाली आहेत. हा विकास समाधानकारक असला, तरी या विकासाचा फटका भविष्यातील पिढीला बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे. निसर्ग रम्य असलेला जिल्हा आता सिमेंटच्या जंगलाने भरू लागला आहे. अनेक गावांमध्ये सिमेंटची बांधकामे वाढली आहेत. वन विभागाच्या जागेतही सिमेंटचे बांधकाम केले जात आहे. त्याचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याची चिंता अनेकजण व्यक्त करीत आहेत.

दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. उन्हाळ्याच्या हंगामात पाऊस पडत आहे. त्यामुळे सतत वातावरणात प्रचंड बदल होत आहे. वातावरणाच्या बदलामुळे वेगवेगळे आजार उद्‌भवण्याची भिती निर्माण झाली आहे. विकास करण्यासाठी झाडांची कत्तल करीत असताना त्या जागी आणखी वेगळी झाडांची लागवड करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

रायगड जिल्ह्याला पर्यटनातून रोजगार मिळत आहे. जिल्ह्यात आरोग्याच्या दृष्टीने वातावरण चांगले असल्याने या ठिकाणी पर्यटक येतात. भविष्यात या वातावरणात बदल झाल्यास पर्यटकांचा ओघ कमी होण्यास वेळ लागणार नाही. त्याचा पर्यटन वाढीवर परिणाम नक्की होण्याची चिंता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

---

लोकसंसद

## ग्राहक माहिती सुरक्षित आहे का?



महानगर गॅस निगमच्या नावाने बनावट संदेश पाठवून फसवणूक करणाऱ्यांच्या तावडीतून अभिनेते चिन्मय मांडलेकर आणि अभिनेत्री ऐश्वर्या नारकर थोडक्यात बचावले, अशी माहिती त्यांनी समाजमाध्यमांवर दिली आहे. ही घटना केवळ दोन कलावंतांपुरती मर्यादित नसून सर्वसामान्य ग्राहकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे. नामवंत व्यक्तींनाही अशा बनावट संदेशांमुळे क्षणभर संभ्रम निर्माण होत असेल, तर सामान्य नागरिकांची स्थिती काय होत असेल, याचा विचार करायला हवा. मुळात महानगर गॅस निगमच्या ग्राहकांना एकाच मोबाईल क्रमांकावरून बनावट संदेश कसे पाठवले गेले? संबंधित फसवणूक करणाऱ्यांकडे ग्राहकांची माहिती पोहोचली कशी? हा डेटा लीक झाला आहे का? असल्यास त्यासाठी जबाबदार कोण? डिजिटल युगात ग्राहकांची वैयक्तिक माहिती ही अत्यंत संवेदनशील बाब आहे. अशा प्रकारे ती चुकीच्या हातात जात असेल, तर ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. संबंधित कंपनीने या प्रकरणाची सखोल चौकशी करून ग्राहकांना स्पष्ट माहिती द्यावी आणि डेटा सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना जाहीर कराव्यात, हीच अपेक्षा. अन्यथा उद्या अनेक निष्पाप ग्राहक आर्थिक फसवणुकीचे बळी ठरू शकतात.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

दिनविशेष

# राष्ट्रीय विज्ञान दिन

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते थोर भारतीय शास्त्रज्ञ डॉ सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व विद्यालये, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था तसेच शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात. भारतासाठी पहिले नोबेल पुरस्कार मिळवून देणारे थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भौतिक शास्त्रातील अत्यंत्य महत्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकिरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोधनिबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पुरस्कार मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ ठरले. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो.

डॉ सी व्ही रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी चेन्नई (पूर्वीचे नाव - मद्रास) येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयातच रामन हे अत्यंत्य तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी वयाच्या ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते गणित आणि विज्ञान या विषयाचे पदवीधर झाले. वयाच्या १७ व्या वर्षी सी व्ही रामन यांनी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रास येथे उच्च श्रेणीत पूर्ण केले. त्यानंतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल या पदावर रुजू झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असताना त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रामार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतुहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का असते? असा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यांमधून प्रकाशाचे होणारे विकिरण यावर संशोधन केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच.

त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत्य मौलिक आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहे त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भंडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने त्यांचा भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा. विध्वसंक कार्यासाठी त्याचा उपयोग व्हायला नको असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ फेब्रुवारी
१)श्री.सुभाष गणू पाटील श्रीबाग-२ चेंढरे अलिबाग, दि.२८-०२-१९४६
२)श्री.नानासाहेब भानुदास थोरात चेंढरे-अलिबाग दि.२८-०२-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# शिलार धरण हद्दपार करणार

## • शेतकऱ्यांचा निर्धार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

चिल्हार नदीवर बांधण्यात येणाऱ्या शिलार धरणाला स्थानिक पातळीवर प्रचंड विरोध होत आहे. शेतकऱ्यांनीही धरण येथून हद्दपार केले जाईल, असा जाहीर निर्धार केला आहे. शेतकऱ्यांनी बैठकांचे सत्र सुरू केले असून खान्दन येथे झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी प्रसंगी जीव गेला तरी चालेल, पण आपली जमीन धरणासाठी देणार नाही, असा निर्धार केला.




### ‘प्रदूषणमुक्त कर्जत’ बिरुदावली संपुष्टात येणार

या धरणांमुळे पर्यावरण संपुष्टात येणार असून जंगलातील झाडेझुडपे नष्ट होणार आहेत. या धरणासाठी लाखो वृक्षतोड होणार आहे. पोशीर आणि शिलार या धरणासाठी पंधरा हजार एकर जमीन जाण्याची शक्यता आहे. कर्जतमध्ये कोंढाणा धरण व मोरवे धरण झाले आहे. अजून पोशीर धरण व शिलार धरण झाले तर कर्जत तालुक्याचे अस्तित्व संपुष्टात येईल.

शिलार धरण २५ मे २०२५ रोजी मंजूर झाला. हा धरण मंजूर झाल्यावर प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विरोध करण्यासाठी स्थानिक पातळीवर असलेल्या ग्रामपंचायतींनी ठराव मंजूर केले आहेत. कशेळे ग्रामपंचायत, मोग्रज ग्रामपंचायत, पाथरज ग्राम पंचायत, रजपे ग्रामपंचायत, जामरुक ग्रामपंचायत टेंबरे ग्रामपंचायत येथील सर्व समाज बांधवांनी एकत्र येत शिलार धरणाविरोधी ठराव मंजूर केला. मात्र तरीदेखील शासन हे धरण व्हावे यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी बैठकांचे सत्र सुरू केले आहे.त्यात खांदन येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी बैठकीसाठी मोठ्या संख्येने शेतकरी एकवटले होते. सभेचे आयोजन दिनेश रसाळ यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते आणि त्यावेळी कर्जत पंचायत समितीचे सदस्य अक्षय तिटकारे तसेच निलेश घोडविंदे, अनिल शेमटे, अशोक असवले, मनोज भोईर, प्रकाश घोडवींदे, छगन सावंत, हरेश आहीर, दशरथ पुंजारा, एकनाथ दरवडा, संतोष कदम, माधव मिणमिणे, वसंत रसाळ आदी शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

प्रस्तावित धरण परिसरात मोठ्या प्रमाणात आदिवासी भाग असल्याने आदिवासी शेतकऱ्यांनी धरण विरोधी बैठकीसाठी गर्दी केली होती.

## साळाव येथे जल अर्पण दिवस

**कोर्लई :** मुरुड तालुका पंचायत समितीच्या ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागाच्या माध्यमातून साळाव ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील साळाव येथे जल जीवन मिशन अंतर्गत ‘जल अर्पण दिवस’ साजरा करण्यात आला. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन पाण्याची टाकी येथे विधिवत कलश पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, महिला मंडळ, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याबरोबरच जनजागृतीही करण्यात आली. यावेळी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी जल संकल्प / जल शपथ घेऊन पाण्याचे संवर्धन व योग्य वापर करण्याचा निर्धार केला.

## पर्यावरणपूरक होळी साजरी करा

### • फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेतर्फे आवाहन

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या फ्रेंड्स ऑफ नेचर, सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर-उरण संस्थेच्या वतीने नागरिकांना यावर्षी होळी सण पर्यावरणपूरक व वृक्षमैत्रीने साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संस्थेने प्रसिद्ध केलेल्या जनजागृती संदेशात नमूद करण्यात आले आहे की, होळी हा आनंद, एकात्मता आणि निसर्गाशी नाते दृढ करणारा सण असला तरी सण साजरा करताना झाडांची तोड, रासायनिक रंगांचा वापर आणि पाण्याची उधळपट्टी यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे सण साजरा करताना पर्यावरण, झाडे व पक्ष्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. संस्थेने जिवंत झाडांची तोड न करण्याचे आवाहन केले आहे. होळी पेटवताना वाळलेल्या काटक्या, शेणकांड्या व नैसर्गिक वस्तूंचाच वापर करावा. तसेच ‘एक गाव, एक होळी’ या संकल्पनेतून सामूहिक होळी साजरी करून लाकडांची नासाडी टाळावी, पूर्वीचे व आताच्या प्रदूषणाची भीषणता पाहता वृक्षतोड थांबवून प्रतिकात्मक होळी त्याच उत्साहाने साजरी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रासायनिक रंग टाळून फुलांपासून तयार केलेले नैसर्गिक रंग वापरावेत, पाण्याची उधळपट्टी टाळून कोरडी होळी खेळावी, तसेच पक्षी, प्राणी व वृक्षांवर रंग टाकू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## राज्य कृषी संचालकांकडून आंबा पिकाची पाहणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात आंबा पिक घेणारे शेतकरी मोठ्या प्रमाणावर आहेत. या शेतकऱ्यांना यावर्षी चांगल्या आंबा पिकाची खात्री होती. मात्र ढगाळ वातावरणामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. दरम्यान कर्जत तालुक्यातील काही आंबा पिक शेतकऱ्यांच्या बागेत जाऊन राज्याचे कृषी संचालक अंकुश माने यांनी पाहणी केली.

यावर्षी आंबा झाडांना चांगला मोहोर आला होता आणि त्यामुळे आंबा पीक घेणारा शेतकरी प्रचंड खुश होता. मात्र मागील महिन्यापासून वातावरण ढगाळ झाल्याने मोठ्या प्रमाणावर आंबा झाडांना आलेला मोहोर गळून पडत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल असून शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांकडे सल्ला मागितला आहे. ही बाब लक्षात घेऊन कृषी अधिकारी यांनी



कर्जत तालुका दौऱ्यावर असलेले राज्याचे कृषी संचालक अंकुश माने आणि कृषी सह संचालक डॉ. शिवाजी आमले यांना आंबा पिकाची पाहणी करण्याची विनंती केली होती. त्यानंतर राज्याचे कृषी संचालक माने यांनी आपल्या व्यस्त वेळापत्रक यातून वेळ काढत नेरळ परिसरातील तीन शेतकऱ्यांच्या बागेत जाऊन आंबा पिकांची पाहणी केली. कर्जत तालुक्यातील मौजे मालेगावतर्फे वरेडी येथील कृषी रत्न शेतकरी चंद्रशेखर हरिभाऊ भडसावळे, दहिवली येथील प्रगत शेतकरी यशवंत बळीराम भवारे आणि अजित लेखराज आरेंजा यांच्या आंबा फळबागेची पाहणी करून मार्गदर्शन करण्यात आले. त्याप्रसंगी शेतकऱ्यांना वेगवेळ्या प्रकारचे सल्ले राज्याचे कृषी संचालक अंकुश माने यांनी दिले. विभागीय कृषी सह संचालक डॉ. शिवाजी आमले यांनीदेखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

## ‘महाराजस्व अभियानाचा लाभ घ्यावा’

**म्हसळा :** म्हसळा तालुक्यातील म्हसळा, खामगाव, मेंदडी मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान योजनेतर्गत शिबीर सुरू होत आहे. येत्या ७ मार्चला म्हसळा मंडळातील न्यू इंग्लिश स्कूल पाभरे, १४ मार्च रोजी कुणबी हॉल खामगाव, १० एप्रिल रोजी आगरी समाजमंदिर मेंदडी, १७ एप्रिल रोजी नॅशनल उर्दू हायस्कूल संदेरी, ८ मे रोजी ग्रुप ग्रामपंचायत कोळे आणि १५ मे रोजी तहसील कार्यालय म्हसळा येथे हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार सचिन खाडे यांनी केले आहे. या अभियांतर्गत शिबिरामध्ये महसूल विभागाकडून उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, डिजिटल सातबारा उतारा, आधार कार्ड, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख हेल्प, अकृषिक तरतुदींसंबंधी सुधारणा आणि मार्गदर्शन देण्यात येणार आहेत. तसेच या शिबिरामध्य कृषी विभाग, ग्रामविकास विभाग, आरोग्य विभाग या विभागांच्या विविध योजनांचे लाभ देण्यात येणार आहेत.

## द.ग.तटकरे महाविद्यालयाचे यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि सेंट झेवियर्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या राज्यस्तरीय उपक्रमात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ माणगावच्या द.ग.तटकरे महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.



मुंबईमधील यशवंतराव चव्हाण केंद्र येथे बुधवारी (दि.२५) पार पडलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात महाविद्यालयाला उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय प्रथम क्रमांक, उत्कृष्ट जिल्हास्तरीय संसद प्रथम पुरस्कार, सोलार एनर्जी अवेअरनेस २०२५ प्रशिक्षण अभियान द्वितीय क्रमांक अशा मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. याचबरोबर महाविद्यालयाचे मुंबई विभागीय सहसमन्वयक डॉ. बबन सिनगारे यांना उत्कृष्ट मुंबई विभागीय सहसमन्वयक हा विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मा. रवींद्र साठे तसेच करिअर कट्टा सर्वेसर्वा व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे हे मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य, करिअर कट्टा सहसमन्वयक डॉ. नमिता मोरे, महाविद्यालय समन्वयक तसेच मुंबई विभागीय सहसमन्वयक डॉ. बबन सिनगारे यांनी व्यासपीठावर जाऊन सन्मान स्वीकारला.

## नांदगाव शाळेत नेत्र तपासणी शिबीर

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा क्रमांक १ मध्ये शिक्षण विभाग समग्र शिक्षा समावेशित शिक्षण व पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्रदोष शिबीर घेण्यात आले. तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर पार पडले. या शिबिरात पनवेलच्या शंकरा आय हॉस्पिटलचे तज्ञ डॉ. मोहसीन सय्यद, डॉ. यश सावंत यांनी नांदगाव नंबर १ शाळेतील ८६ विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीअंती ५ विद्यार्थांना चष्म्यासाठी संदर्भित करण्यात आले. या विद्यार्थ्यांना शंकरा आय हॉस्पिटलमार्फत मोफत चष्मे पुढील पंधरा दिवसात मिळणार आहेत.





## भिमराज शिकारेंची उपाध्यक्षपदी निवड

**खरोशी :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात गेल्या ३३ वर्षांपासून कार्यरत असलेले भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक भिमराज शिकारे यांची नुकतीच अखिल भारतीय शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. ही देशपातळीवरील सर्व प्राध्यापक संघटनांची सर्वोच्च संघटना असून ती भारतातील सर्व प्राध्यापकांचे देशपातळीवर प्रतिनिधित्व करते. पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकाला देशपातळीवरील संघटनेमध्ये इतक्या मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे पेण शहराचा तसेच महाविद्यालयाचा गौरव वाढीस लागला आहे.

## तुर्भे स्टोर येथील डम्पिंग ग्राऊंडला आग

### धुरामुळे नागरिक हैराण

**। नवी मुंबई प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील तुर्भे परिसरातील डम्पिंग ग्राउंडला भीषण आग लागली. ही घटना शुक्रवारी (दि.२७) पहाटे ५ वाजता घडली. या आगीमुळे निर्माण झालेल्या दाट धुरामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात श्वसनाच्या समस्यांना सामोरे जावे लागले. हा संपूर्ण परिसर धुरांच्या विळख्यात सापडल्याने लहान मुले ज्येष्ठ नागरिकांनी आधार व्यक्तींना त्रास सहन करावा लागला.



वाशी अग्निशामक केंद्राला आगीची माहिती मिळताच आग विझवण्यासाठी नवी मुंबईमधील वाशी, कोपरखैरणे, नेरूळ घणसोली बेलापूर आणि एमआयडीसीमधील अग्निशामक दलाचे जवान आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न सुरु केला. मात्र डम्पिंग ग्राउंडला लागलेली आग ही बराच काळ धुमसत असल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

तुर्भे येथील स्थानिक रहिवाशांच्या मते डम्पिंग ग्राउंडमध्ये वारंवार आग लागण्याच्या घटना घडत असूनही प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. धुरामुळे डोळ्यांची जळजळ खोकला, श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे नागरिक सांगत आहेत. याचा त्रास लहान मुले आणि आजारी असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना खूप त्रास होत आहे. यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नागरिकांनी नवी मुंबई प्रशासन व संबंधित लोकप्रतिनि यांच्या निष्काळजीपणाचा जाहीर निषेध केला. तातडीने ठोस पावले उचलून ही समस्या कायमची सोडवण्याचे मागणी केली आहे.

### रायगडमध्ये २२ ठिकाणी जल स्वच्छता मोहीम | १२ लाख स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग

# संत निरंकारी मिशनचे स्वच्छता अभियान

**। महाड । प्रतिनिधी ।**

जल स्वच्छ व संरक्षित राहिले, तर केवळ पर्यावरणच नव्हे, तर मानवसमाजाचे एकूण आरोग्य आणि संतुलन अधिक सक्षम होते. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने ‘प्रोजेक्ट अमृत’ अंतर्गत ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवारी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत, सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले. या अभियानाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील नद्यांसह शहरातील विविध तलाव, विहीरी अशा एकूण २२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली.

रायगड जिल्ह्यामध्ये खोपोली, सावरोली, मार्केवाडी, तिवरे, पेण, बोर्वे, रोहा, कोंडगाव, अलिबाग, पोयनाड, सारळ, भिलजी, खरसई, भरडखोल, श्रीवर्धन, वडवली, खरवली, कडापे, चोरवली, महाड, बिरवाडी तसेच रावतळी या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महाड तालुक्यातील नडगावतर्फे बिरवाडी येथील सावित्री आणि काळ नदी संगमच्या परिसरात तसेच केतकीचा कोंड (भवानी नगर) वाळण बु. येथील विहीरीसह परिसरामध्ये आणि पारदुलेवाडी येथे तलावाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य व प्रेरणादायी आयोजन सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमित जी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १ हजार ६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीपणे पार पडले. या अभियानात सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला असल्याची माहिती संत निरंकारी मंडळाचे खरसई (रायगड) चे झोनल इंचार्ज प्रकाश म्हात्रे यांनी दिली.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या सचिवांनी अभियानाविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, या उपक्रमाची सुरुवात सेवादलाच्या प्रार्थनेने झाली. त्यामुळे संपूर्ण वातावरण आध्यात्मिक उर्जेने भारावून गेले. देशभर प्रसारित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून सुरक्षा, शिस्त आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले.

### पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान

उल्लेखनीय म्हणजे, संत निरंकारी मिशन वेळोवेळी समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान देत आले आहे. ‘वननेस वन’ अभियानांतर्गत वृक्षारोपण आणि ‘प्रोजेक्ट अमृत’च्या माध्यमातून जलसंरक्षणाचे प्रयत्न हे मानव आणि निसर्ग यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणारे प्रभावी पाऊल ठरत आहेत.

### जागरूकतेचा संकल्प

‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ हा संदेश केवळ एक अभियान नसून तो एक जीवनदृष्टी आहे. जलधारांना निर्मळ ठेवतानाच मनामध्येही जागरूकतेचा प्रकाश पसरविणारा हा संकल्प आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी संतुलित, सुरक्षित आणि शाश्वत भविष्याची पायाभरणी करणारी हीच खरी ऊर्जा ठरेल.

# निवडक

## सामूहिक गीताचे आयोजन



**आगरदांडा :** मुरुड वसंतराव नाईक महाविद्यालयात शिखांचे नववे हिंद दि चादर परमपूज्य श्री गुरुतेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहादत दिनानिमित्त सामुहिक गीताचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून सामुहिक गीत गायन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, डॉ. श्रीशैल भैरगुंडे, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. गजानन मुनेश्वर प्राध्यापक रुबी हासवारे, प्रवेश पाटील आदिंसह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुभाष म्हात्रे यांनी गुरुतेव बहादुर साहिबजी यांच्या जीवन आणि कार्याचा उजाळा देण्यात आला.



## कृषी विभागाकडून काजू कलमांचे वाटप

**नेरळ :** कर्जत तालुक्यात कृषी विभागाकडून संकरित काजू कलमे शेतकऱ्यांसाठी विकसित केली आहेत. या काजू कलम वाटप कार्यक्रमाला राज्याचे कृषी कार्यकारी संचालक अंकुश माने यांचे हस्ते शुभारंभ झाला. कर्जत तालुक्यात काजू फळपीक विकास योजनेअंतर्गत मागेल त्याला काजू कलमे घटका अंतर्गत काजू कलम विकसित केले आहेत. या कलमांची लागवड करून शेतकऱ्यांनी चांगले पीक घ्यावे, यासाठी कृषी विभाग प्रयत्न करीत आहेत. कृषी विभागाकडे मोठ्या प्रमाणात काजू पिके उपलब्ध असून शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे संपर्क करावा, असे आवाहन राज्याचे कृषी संचालक अंकुश माने यांनी केले. कर्जत तालुक्यातील मालेगावतर्फे वरेडी येथे तालुक्यातील विविध गावातील लाभार्थीना काजू कलमांचे वाटप करण्यात आले. यावेळी विभागीय कृषी सह संचालक डॉ. शिवाजी आमले, उपविभागीय कृषी अधिकारी सुनील निंबाळकर, तालुका कृषी अधिकारी दिनेशकुमार कोळी, मंडळ कृषी अधिकारी राजाराम शिंदे तसेच उप कृषी अधिकारी अनिल रुपनवर, कृषी सहायक अंजु परीट, विजय गंगावणे, गुणवंत पाटील आदी उपस्थित होते.

## मराठी भाषा गौरव दिन साजरा



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघाचे साहित्य व कला मार्गदर्शक प्रा. विवेक पूनम मधुकर वारभुवन (स्वामी विवेकानंद महाविद्यालय, चेंबूर) हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी मराठी भाषेची ताकद व महत्त्व किती आहे, हे विद्यार्थ्यांना सांगितले. मातृभाषेतून शिक्षण आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. अभिजात मराठीचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीचे संवर्धन व जतन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणाऱ्या मुलांना मराठीचे ज्ञान कमी होत आहे. त्यामुळे त्यांची चिंतनशीलता विकसित होत नाही, असे सांगितले. पाहुण्यांचा स्वागत व परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पराग कारुळकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार भूगोल विभाग प्रमुख डॉ.ए.के. गायकवाड यांनी व्यक्त केले.

## मजगाव शाळेत खाद्यमहोत्सव साजरा



**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील मजगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या आदर्श प्राथमिक शाळेत क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २०२६ या उपक्रमांतर्गत खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ तयार करून लावलेले स्टॉल्स खवय्यांचे खास आकर्षण ठरले. मजगांव ग्रामपंचायत प्रशासक प्रसाद माळी यांच्याहस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत खाद्यमहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी आपले पाककलेचे कौशल्य पणाला लावून वडापाव, भेळ,पुरणपोळी, पाणीपुरी, सँडविच, पोहे, उपमा तसेच विविध गोड रुचकर पदार्थ तयार केले होते. शाळेने राबविलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वयंपाक कलेच्या ज्ञानात भर पडली. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना आर्थिक ज्ञान, व्यावसायिक शिक्षण सहकार्य, नियोजन आणि स्वावलंबन यांचे महत्त्व समजले. पाठ्यपुस्तकासोबत दैनंदिन जीवनात व्यवहार करता यावा, यासाठी खाद्य महोत्सव व फुड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते.

## मराठी राजभाषा दिन साजरा

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून स्वातंत्रवीर वि.दा. सावरकर २६ फेब्रुवारी पुण्यतिथी, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा मराठी राजभाषा दिन, नोबेल पुरस्कार प्राप्त सी. व्ही रमण यांच्या शोधनिबंधानिमित्त २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन या तिन्ही दिनाचे एकत्रित आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी या तीनही थोर व्यक्तिमत्वाबद्दल सखोल माहिती सांगितली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या कविताचे वाचन, मराठी भाषेचा गोडवा सांगत असताना मराठी भाषेबद्दल, संस्कृतीबद्दल सविस्तर माहिती सांगितली. या कार्यक्रमानिमित्त जेष्ठ शिक्षिका शिंदे एस.ए. यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगत कवी कुसुमाग्रज यांच्या जिवन परिचय करून दिला.

# वडवलीत श्रमदानातून उभारला वनराई बंधारा

| दिघी | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वडवली येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान आणि संत निरंकारी मंडळाच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२२) ग्रामस्थांच्या श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला. शासनाच्या योजनेला सामाजिक संस्थेच्या सेवाभावाची जोड मिळाल्याने हा उपक्रम प्रभावीपणे साकार झाला असून जलसंधारणासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

सामाजिक व आध्यात्मिक सेवाभावी कार्यासाठी ओळखले जाणारे संत निरंकारी मंडळ विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जनजागृती करत असते. 'प्रकल्प अमृत' आणि 'स्वच्छ जल स्वच्छ मन' या अभियानांतर्गत जलसंवर्धन, स्वच्छता व पर्यावरण जतन यासाठी मंडळाने लोकसहभागातून उपक्रम राबविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. वडवलीतील वनराई बंधारा उभारणी हा त्याच प्रयत्नांचा एक भाग ठरला. वडवली हे गाव श्रीवर्धन तसेच म्हसळा तालुक्यांना ताजा भाजीपाला पुरविणारे महत्त्वाचे कृषी केंद्र म्हणून ओळखले जाते. परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर भाजीपाला उत्पादन करत असल्याने वर्षभर पाण्याची उपलब्धता हा त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो. या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेला वनराई बंधारा पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्यास मदत करणार आहे. त्यामुळे भूजल पातळी वाढणे, विहिरींचे पुनर्भरण होणे तसेच उन्हाळ्यातील पाणीटंचाईचा परिणाम कमी होणे अपेक्षित आहे. बंधारा उभारणीवेळी उपस्थित असलेले पंचायत समिती श्रीवर्धनचे विस्तार अधिकारी किशोर नागे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामविकास प्रक्रियेत लोकसहभाग वाढविणे हा आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील वर्णनाची जमीन मिळकत हि सामाईकांत जनार्दन बाळु अड्डे, चंद्रकांत बाळु अड्डे, दत्ताराम बाळु अड्डे यांच्या नावे दाखल असुन सदरच्या जमीन मिळकती एकुण क्षेत्रापैकी ०.१९.०० हे.आर. इतकी जमीन मिळकत चंद्रकांत बाळु अड्डे यांच्या अविभक्त हिस्सा पैकी आमचे अशिलांने कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-आमली, ता.मुरूड-जंजिरा, जि. रायगड.**

| मौजे | गट क्र. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | लागवड |
|---|---|---|---|---|
| आमली ता. मुरूड | ८१/१ | १.११.५० | १०.५५ | भात |

वर एकुण नमुद क्षेत्रापैकी चंद्रकांत बाळु अड्डे यांच्या सामाईक हिस्सा पैकी ०.१९.०० हे. आर इतका अविभक्त हिस्सा हा खरेदीखताचा विषय राहणार आहे.

वरील नमुद मिळकती निर्वेध असल्याचा निवार्ळा करून घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यात येते आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्रीकेत दान, ताबे कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणतीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणारे ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी या मुदतीमध्ये कोणाचेही हरकत न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील मागाहून येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बधनकारक राहणार नाहीत. कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
ठिकाण: मुरूड, सही/-
दिनांक २७/०२/२०२६ **ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील**

**एस.एस.निकम इंग्लिश स्कूलमध्ये**
**RTE अंतर्गत इयत्ता पहिली करिता प्रवेश प्रक्रिया सुरु**
**माणगांव एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेच्या**
**माणगांव, लोणेरे, इंदापूर व तळा**

या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये (स्वयंअर्थसहाय्यित शाळा ) सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता RTE अंतर्गत २५ टक्के आरक्षण संदर्भात इयत्ता पहिली करिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक १७/०२/२०२६ ते दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत सुरु असणार आहे.

सदरचे प्रवेश हे वंचित घटक (SC, ST, NT, OBC, SBC दिव्यांग बालके, एच.आय.व्ही.बाधित किंवा एच.आय.व्ही. प्रभावित बालके, अनाथ बालके (या वंचित गटातील बालकांच्या प्रवेशाकरीता वार्षिक कमाल उत्पन्नाची मर्यादा लागू नाही) तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा कमी असणारे) तसेच घटस्फोटित महिला, विधवा महिला यांची बालके यांच्यासाठी आरक्षित आहेत.

सदर प्रवेश प्रक्रियेकरिता रहिवासी (निवासी) पुरावा, विद्यार्थ्यांच्या वडिलांचे जातीचे घटस्फोटित प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र (असेल तर), उत्पन्नाचा दाखला, जन्माचा दाखला, महिलाकरिता न्यायालयाचा निर्णय, विधवा महिलाकरिता पतीचे मृत्युचे प्रमाणपत्र, अनाथ बालकांकरिता पालनकर्त्यांचे हमीपत्र, विद्यार्थ्यांचे छायाचित्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. (सदरची कागदपत्रे ऑनलाईन फॉर्म भरण्यापूर्वीची आवश्यक आहेत तसेच विद्यार्थ्यांचा आधारकार्ड अनिर्वाय आहे)

सदरची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. पालकांनी स्वतः ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा आहे व त्याकरिता खालील वेबसाईट वर अर्ज व सर्व माहिती उपलब्ध आहे.

वेब साईट :-
https://student.maharashtra.gov.in/adm_portal/Users/rte_index_new

तरी पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन एस. एस. निकम इंग्लिश स्कूल, माणगांव, लोणेरे, इंदापूर व तळा तर्फे करण्यात आले आहे.

सही
**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
**एस.एस.निकम इंग्लिश स्कूल,**
**माणगांव, लोणेरे, इंदापूर व तळा, जि.रायगड.**

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल),इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६
- अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- सुवर्णसंधी (WORK FROM HOME) वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घरातून मोबाईलवरून किंवा ऑफिसमधून काम करा. Income- 12000 To 15000 Age 18+ Contact Number- 7744956912

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनीचे मूळ मालक सोनू आगम कुमार निगम यांचेकडून आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्यासाठी प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४२ | १/अ | १-३८-०० पो.ख. ०-०४-०० एकूण क्षेत्र १-४२-०० पैकी ०-४२-४० | ३.५० |
| ४२ | १/ब | १-५२-५० पो.ख. ०-०३-३० एकूण क्षेत्र १-५५-८० पैकी ०-४३-२० | ८.९९ |

सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा करार, गहाण, दान, बक्षीसफरोक्त, तारण, भाडेकराराचा हक्क, पोटगी, साठेकरार, अतिक्रमण, एम.ओ.यू. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरूप लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्विघ्न व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल व सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या तक्रारी, दावे अगर हरकती यांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. २८/०२/२०२६

**वंदना अग्रवाल**
मोबाईल : +९१ ९००४९४१०५९
पत्ता: फ्लॅट नं. ३२०७, टॉवर C, ओंकार अल्टामोंटे, सिद्धेश्वर नगर, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७
**कुणाल जैन**
मोबाईल: +९१ ९३२६३९४०१४
पत्ता: फ्लॅट नं. g-३, ए वन अपार्टमेंट, २७०, वाळकेश्वर रोड, मुंबई - ४००००६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे दत्तपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी उभयतात बोलणी सुरु आहे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| दत्तपाडा | ६४/७ | ०-७६-९५ | ३.८२ | श्रीम.रीना जगदीश वालेचा |

वर नमुद मिळकतीपैकी ० हेक्टर ४३.५० आर एवढी मिळकत व त्या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता त्याच मिळकतीच्या उर्वरीत भागातून ९ मिटर रुंदीच्या कायम स्वरूपी वहीवाटीचा रस्त्याच्या हक्कासह,

सदरची संपूर्ण मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निवार्ळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २८/०२/२०२६ **ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहिर नोटीस

सर्वतमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत कायम फरोक्त खरेदी करणेकरीता मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिलीप शंकर चव्हाण व दिनेश शंकर चव्हाण रा. बेलवडे, पो. आंबेघर, ता. पेण यांजकडून नोटराईज्ड साठेकरार लिहून घेतलेला आहे व टोकन मनी ही अदा केलेली आहे.

महसुल खात्याचे ७/१२ नोंदीप्रमाणे मौजे बेलवडे बु.,ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत

**मिळकतीचे वर्णन**

| गांव | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| बेलवडे बु. | २६१ | १.३०.०० पो.ख ०.१२.०० एकुण १.४२.०० | २.३१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी ०.८०.० हे.आर. (८० गुंठे) क्षेत्र

सदरहु मिळकत ही आमचे अशिलांनी विकत घेण्याचे निश्चित केल्यामुळे सदरहु मिळकतीबाबत ७/१२ उताऱ्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही इसमाचा/त्रयस्थ पार्टीचा कोणताही वा कसल्याही प्रकारचा मिळकतीबाबत हक्क वा हितसंबंध असल्यास खालील पत्त्यावर सदरहु नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांचे मुदतीत सकृत दर्शनी लेखी पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी.

सदरहु मिळकतीबाबत अन्य कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये वा केल्यास त्यांचेवर फौजदारी अथवा दिवाणी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल.

मुदतीत कोणाचीही हरहरकत आम्हाला मिळाली नाही, तर आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यामुळे इतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत.

येणेप्रमाणे नोटीस जाहीर केली.

ठिकाण - पेण
दि. २५/०२/२०२६ **(ॲड. सुरेश ह. देशमुख)**
देशमुख व्हिला, भारत गॅस एजन्सी जवळ, पेण, ता. पेण, जि. रायगड
फोन नं. ९४२३८९१६७९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ८३/४/अ | एकूण क्षेत्र ५-१२-४० हे.आर या पैकी अनंता गणपत घोडविंदे व इतर ५ याचे खाते नं. ६०१ ज्याचे एकूण क्षेत्र १-१२-४० हे.आर या मिळकतीबाबत. | ०.७६ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-२८/०२/२०२६ **ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सुचना देण्यात येते की, आम्ही आमचे अशिलांचे सांगणेवरून खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या शेतजमिनींचे मालकी हक्कांचा तपास आणि पडताळणी करीत आहोत.

तरी खाली परिशिष्ठामध्ये सविस्तरपणे वर्णन केलेल्या शेतजमिनींसंदर्भात कोणाही इसमाचा वा संस्थेचा या कंपनी अस्थापनाचा गहान, दान, बक्षीस फरोक्तखत साठेकरार, विसार पावती, विकसन करार, एम.ओ.यू. इच्छापत्र, वाटणीपत्र अनुज्ञप्ती, धारणाधिकार, जप्ती, तारण, विभागणी, वहिवाट, देखभाल, कब्जा, विकास अधिकार, मार्गाधिकार, आरक्षण, कुटुंबव्यवस्था/ तडजोड किंवा कोणतीही अन्य व्यवस्था प्रलंबित वाद कोणत्याही न्यायालयाने संमत केलेला आदेश, हुकूमनामा किंवा कोणतेही न्यायाधिकरण, महसूल किंवा अन्य प्राधिकरण यांनी संमत केलेला निवाडा, मुखत्यारनामा, संपादन, उत्तरधिकार, आरक्षण, देय, थकबाकी, चटई क्षेत्र निर्देशांकाचा वापर, विभाजन, अदलाबदल, हमी देखभाल, वारसा हक्क, हक्क, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, कुळ, उपकुळ, धारणाधिकार वा इतर अन्य स्वरूपाचा कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी सदर शेतजमीनी संदर्भात आपली लेखी हरकत योग्य त्या पुराव्याचे कागदपत्रांसह खाली सही करणार अधिवक्ता ह्यांचे पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून १५ दिवसांचे आत नोंदणीकृत पत्राद्वारे किंवा कुरीयरद्वारे किंवा स्वहस्ते दाखल करावी. जर जाहीर नोटीसीत दिलेल्या मुदतीमध्ये नोटीस मध्ये वर्णन केलेल्या शेतजमीनींसंदर्भात कोणाचीही लेखी हरकत न आल्यास नोटीसीत वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतींचे स्वामित्व (टायटल) हे निर्वेध, स्वच्छ आणि बोजेमुक्त आहे, असे समजून नोटीस मध्ये वर्णन केलेल्या शेतजमीनींचे मालकी हक्कांसंदर्भात मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकती, सुचना वगैरे हया सदर शेतजमीनींचे मालकांवर बंधनकारक राहणार नाहीत आणि हितसंबंधी व्यक्तींनी त्यांचा हक्क सोडून दिला आहे, असे गृहित धरून नोटीस मध्ये वर्णन केलेल्या शेतजमीनींचा स्वामित्वाचा दाखला आणि शोध अहवाल दिला जाईल. त्याचबरोबर आमचे अशिल हे शेतजमीनींचे मालकाबरोबर खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, हे सर्व जनतेस कळावे.

**परिशिष्ठ**
**शेतजमीनींचे वर्णन**
**मौजे-खालापूर, तालुका-खालापूर जिल्हा रायगड येथील मिळकती**

| अ.क्र. | भूपामन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ४१/४ | ०-४५-५० पो.ख. ०-०९-४० ०-५४-९० | ४-७५ | श्रध्दा पुनीत बन्सल |
| २ | ४२/१ | ०-०६-०० पो.ख. ०-०१-०० ०-०७-०० | ०-५२ | |
| ३ | ४२/२ | ०-७७-१० पो.ख. ०-११-६० ०-८८-७० यापैकी श्रध्दा पुनीत बन्सल मालकीचे क्षेत्र ०-३३-५० पो.ख.०-११-६० ०-४५-१० | ६-३१ २-७४ | |
| एकूण | | ०१-५०-६० | | |

वर नमूद मिळकतींमध्ये श्रध्दा पुनीत बन्सल यांचे मालकीचे एकूण क्षेत्र ०१हे.-०७आर.-००पॉ.(१०७ गुंठे क्षेत्र) इतक्या मिळकतीचे

पनवेल
तारीख :- २७/०२/२०२६
कार्यालयीन पत्ता:-
ऑफीस क्रमांक २०४, कॉर्पोरेट बिझनेस सेंटर, **ॲड. सुनील मोंडे**
मुनोत वास्तू, पनवेल प्रांत कार्यालयासमोर,
ठाणे-नाका रोड, पनवेल
ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक उर्मिला लक्ष्मण पाटील व पुजा परेश धरणेकर यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७० | ००-५०-६० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी उर्मिला पाटील व पुजा धरणेकर यांचे मालकीचे ००-३४-६० हे. आर. पॉ. या क्षेत्रामधील ००-१७-३० हे.आर. पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ०.५५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- २८ फेब्रुवारी २०२६ **ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळिवण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे - कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| राजेंद्र मनोहर म्हात्रे | १४५ | - | ०-८१.०० | १२.५० |
| सुहासनी मनोहर म्हात्रे राजेंद्र मनोहर म्हात्रे मिलिन मनोहर म्हात्रे | १५१ | - | ०-३४.०० पैकी ०-१२.०० | ५.२५ १.८५ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. राजेंद्र मनोहर म्हात्रे वगैरे २ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. २८/०२/२०२६. **श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को. ऑप हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक विक्रांत विरेन्द्रकुमार अग्रवाल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ, ता.कर्जत जि.रायगड | ७/५ | ०.३५.९० | ०.७२ |
| | ११/१५ | ०.०३.०० | ०.०६ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागावून आलेल्या हरकती स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांकः २८/०२/२०२५ **ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
मो.नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे बोरीस, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक ३७/२ क्षेत्र ०-२०-०० हे. आर, आकार ० रुपये ५३ पैसे, ही वरकशी मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार प्रसाद वसंत राऊत यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदरची मिळकत मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदारांकडुन आमचे आशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे विद्यमान कबजेदार प्रसाद वसंत राऊत यांचाच आहे असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून सात दिवसांचे आत खालील सही करणार 'खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा मिळकतीचे विद्यमान कबजेदार प्रसाद वसंत राऊत यांचाच आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता २७/०२/२०२६ सही/-
**ॲड. श्रध्दा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी, मु.पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे येलवणे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही आमचे वडिल लक्ष्मीकांत विनायक म्हात्रे, रा. कोप्रोली, पो.सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे नावे ७/१२ सदरी दाखल आहे. परंतु सदर मिळकतीमध्ये मुली या नात्याने आमचा १) विशाखा वंदन इकर (पूर्वा भारती लक्ष्मीकांत म्हात्रे) रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग २) शितल शरद नाईक (पूर्वा. वसुधा लक्ष्मीकांत म्हात्रे) रा. मु. म्हात्रोळी, पो. सारळ, ता.अलिबाग यांचा कायदेशिर अविभक्त हिस्सा असून सदर मिळकत ही वडिलार्जित असून सदरहू मिळकतीमध्ये आमचा अविभक्त सामाईकांत हिस्सा असून सदरहू मिळकतीचे आम्ही सहमालक आहोत. त्यामुळे सदर मिळकत आमचे सामाईक मालकीची आहे. परंतु या मिळकतीचे ७/१२ सदरी लक्ष्मीकांत विनायक म्हात्रे यांचे एकट्याचे नांव असल्याने आम्हाला विश्वासात न घेता सदरहू मिळकत ते अन्य त्रयस्थ इसमांस विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. असे आम्हाला समजले आहे. त्याबाबत आम्ही कोर्ट कारवाई करणार आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | येलवणे ता. अलिबाग जि. रायगड | १८/३/ब | ०.०६.८० पो.ख. ०.०४.५० एकूण ०.०७.३० | १.७५ |

अशाप्रकारे आमचा हक्क डावलून सदरहू मिळकतीची विक्री करण्याचा लक्ष्मीकांत विनायक म्हात्रे यांना कोणताही अधिकार नाही. सदर मिळकत अद्याप एकत्रात असल्याने या मिळकतीत असलेला आमचा हिस्सा आमचे संमतीशिवाय विकण्याचा लक्ष्मीकांत विनायक म्हात्रे यांना कोणताही हक्क व अधिकार नाही.

तरी या जाहीर नोटीसीने सर्वांना कळिवण्यात येते आहे की. सदरहू मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा करार-मदार, खरेदी-विक्री, अथवा अन्य कोणताही व्यवहार लक्ष्मीकांत विनायक म्हात्रे यांच्याशी करु नये व अशा प्रकारे कोणीही व्यवहार केल्यास सदर व्यवहार हा आमचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर व्यवहारामुळे असा व्यवहार करणाऱ्याचे काही नुकसान झाल्यास त्यासही सर्वस्वी व्यवहार करणारी व्यक्तीच जबाबदार राहील याची सर्वस्वी नोंद घ्यावी व हे सर्वांस कळावे.

अलिबाग.
दिनांक २७/०२/२०२६ स्वाक्षरी
१) विशाखा वंदन इकर
रा.मु.पो.आवास, ता.अलिबाग, जि.रायगड
२) शितल शरद नाईक
रा. मु. म्हात्रोळी, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शशिकांत काशिनाथ भांगरे, रा. पोटलज खुर्द, ता. सुधागड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पोटलज खुर्द, ता. सुधागड, जि. रायगड.**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| ५२ | ११-९०-८० | २०.०२ |
| पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ४-००-०० हे.आर. | | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक २७/०२/२०२६ सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. याकुब इस्माईल कुरेशी यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वारे, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १२/३ एकुण १.२४.०० गुंठे पैकी ०.२०.०० जागा विकत घेणार आहेत. तसेच सर्व्हे नं १२/२/ब/१ एकुण ०.४८.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्कहित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक २८/०२/२०२६ **ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८




## राशीभविष्य

- **मेष** : अचानक अधिक खर्च होईल. महत्त्वाची कामं अकारण रखडतील. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **वृषभ** : मनाजोगी वार्ता कानी येईल. नव्या जबाबदाऱ्या विचारानं घ्याव्या. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **मिथुन** : आजचा दिवस उत्साहवर्धक राहील. प्रियजनांच्या भेटी होतील. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील.
- **कर्क** : कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. स्थावर बाबतीत सावध रहावं. कायदेशीर कटकटी संभवतात.
- **सिंह** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. विवाहाचे प्रयत्न सफल ठरतील. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **कन्या** : मन विचलित करणाऱ्या घटना संभवतात. विचारानं रहावं. यंत्र, वाहनाचा वापर जपून करावा.
- **तूळ** : नव्या विचारांना चालना मिळेल. सरकारी कामं मार्गी लागतील. प्रेम प्रकरणात मतभेद टाळावेत.
- **वृश्चिक** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. आत्मविश्वास वाढेल. नोकरीत पदोन्नतीबाबत विचार होईल.
- **धनु** : मनाविरूध्द घटना संभवतात. रागावर नियंत्रण ठेवावं. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यायला हवी.
- **मकर** : महत्त्वपूर्ण घडामोडी होतील. व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : कलाकारांना मानसन्मान प्राप्त होईल. महत्त्वाच्या भेटीने समाधान लाभेल. व्यापारवृध्दी होईल.
- **मीन** : अडचणींवर मात करू शकाल. आर्थिक स्थिती साधारण राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल.

## ब्युटी ट्रेंड्स

## पर्याय 'पील ऑफ वॅक्सिंग'चा

'वॅक्सिंग'हा महिलांच्या 'ब्युटी रूटीन'मधला महत्त्वाचा भाग. हातापायांचं वॅक्सिंग महिला नियमित करून घेतात. सर्वसाधारण वॅक्सिंग तसं त्रासदायकच. ते करताना वेदना होतात. या वेदना सहन करतच महिला वॅक्सिंग करतात. पण आता वॅक्सिंगच्या या वेदनादायी प्रक्रियेला 'पील ऑफ वॅक्सिंग' चा पर्याय उपलब्ध झाला आहे. 'पील ऑफ' प्रक्रियेने अगदी झटपट वॅक्सिंग करता येईल. वॅक्सिंगचा हा प्रकार नेमका काय आहे, त्या मुळे त्वचेला कोणते लाभ होतात, या विषयी...

'पील ऑफ' वॅक्सिंगचा वापर अगदी सुलभतेने करता येतो. यामुळे वेदना तर होत नाहीतच शिवाय त्वचेचं नुकसानही टळतं. नाजूक आणि संवेदनशील त्वचा असेल तर हे वॅक्सिंग करण्याआधी छोटीची चाचणी करून बघा.त्वचेवर पुरळ उठणं, चट्टे पडण्यासारख्या समस्या निर्माण झाल्या नाहीत तर पुढे जा 'पील ऑफ' वॅक्सिंग हातापायांवर लावल्यानंतर ते वाळू द्या. मग हे पापुद्रे हलक्या हाताने काढून टाका. यासोबत त्वचेवरची लवही निघून जाईल. **(क्रमश:)**

## दिनविशेष

## २८ फेब्रुवारी

- **१९६३** : भारताचे पहिले राष्ट्रपती बाबू राजेंद्रप्रसाद यांचे निधन.
- **२०१४** : सहारा उद्योगसमूहाचे प्रमुख सुब्रत रॉय यांना लखनौमध्ये अटक.
- **२०१६** : रोहित वेमुला आत्महत्येप्रकरणी संसदेची दिशाभूल केल्याबद्दल स्मृती इराणी यांच्याविरूद्ध हक्कभंग प्रस्ताव आणण्याचे विरोधकांचे मनसुबे सरकारने उधळून लावले.
- **२०१८** : कांची कामकोटी पीठाचे ६९ वे शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन.

## व्हॉट्स न्यू?

## भन्नाट गॅझेट्सच्या जगात

* परदेशात गेल्यावर किंवा भारतातही दोन भाषा बोलणाऱ्यांना संवाद साधताना बऱ्याच अडचणी येतात. युरोपातल्या बऱ्याच देशांमधल्या लोकांना इंग्रजी येत नाही. भारतातही हिंदी न येणारे बरेच लोक आहेत. हा प्रश्न सोडवण्यासाठी नेदरलँडच्या एका कंपनीने 'ट्रान्सलेशन इयरबड' तयार केले आहेत. 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बनवलेले हे इयर बड १०५ भाषांचा लगेच अनुवाद करू शकतात.

* तुम्ही पाळलेलं मांजर किंवा कुत्रा आजारी आहे किंवा नाही हे ओळखण्यासाठी स्पेनच्या स्टार्टअप कंपनीने 'हार्नेस' नावाचा पट्टा तयार केला आहे. आवाज, श्वासाची गती, शरीराचं तापमान या माहितीच्या माध्यमातून प्राण्यांच्या आरोग्याचा आढावा घेतला जातो.

* दक्षिण कोरियातली रोबोटिक्स कंपनी 'टोरूक'ने १.५ फूट लांब 'लिकू' नावाचा रोबो तयार केला आहे. हा रोबो त्यांनी यावेळी सादर केला. तो माणसांप्रमाणे भावना व्यक्त करू शकतो. तसंच त्याच्या चेहऱ्याचे हावभावही बदलतात. कॅमेरा जवळ नेला तर फोटोसाठी पोज देण्याची क्षमताही लिकूमध्ये आहे.

## पंचांग

**शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन शु. १२ , चंद्रराशी : कर्क, नक्षत्र : पुनर्वसु, योग : सौभाग्य, सूर्योदय ७.०१, सूर्यास्त ६.४२

## फॉरवर्ड्स

**बेशक़ हमारीं ज़ुबाँ कड़वी मग़र दिल साफ रख़ते हैं...**

**कौन कहाँ कब बदल ग़या सब हिसाब रख़तें हैं...!**

## अर्थचर्चा

## इंडिया डिजिटल होतोय

व्यक्ती अथवा संस्थांना वाढीव खर्चाची तरतूद करण्यासाठी उत्पन्नाविरहित आयस्त्रोताची गरज असतेच. ती भागवण्यासाठी बँकांनी कर्जाऊ रक्कम देणे सुरू केले आणि एका मोठ्या व्यवसायाचा जन्म झाला. आता तर या व्यवसायाने व्यापक रुप धारण केले असून जनतेला सहजतेने क्रेडिट देण्यासाठी सरकार एकापाठोपाठ एक मोठी पावले उचलत आहे. दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञानमंत्र्यांनी मध्यंतरी यासंबंधीची महत्त्वपूर्ण घोषणा केली असून त्यानुसार सरकार या वर्षी डिजिटल क्रेडिट सेवा सुरू करणार आहे. यामुळे आता रस्त्यावरील लहान विक्रेतेही मोठ्या बँकांकडून सहजतेने कर्ज घेऊ शकतील. दुसरीकडे, यूपीआयचा वापर वाढवण्यासाठी ते स्थानिक भाषेतही आणण्याची तयारी सुरू आहे. त्याचबरोबर अनिवासी भारतीयांनाही UPI सेवेचा लाभ घेता येणार असल्याची घोषणाही लक्षवेधी म्हणावी लागेल. पहिल्या टप्प्यात १० देशांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार आता यूपीआय सेवा ऑस्ट्रेलिया, कॅनडा, हाँगकाँग, ओमान, कतार, सौदी अरेबिया या देशांमधील अनिवासी भारतीयांसाठी उपलब्ध असेल. तसेच, भारताच्या UPI चे सिंगापूरच्या पे नाऊ प्रणालीसोबत एकीकरण प्रक्रियाही सुरू आहे. त्याला यश आल्यास हादेखील अर्थविश्वातला एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणावा लागेल. या सर्व सेवा 'डिजिटल इंडिया' अंतर्गत विस्तारित केल्या जाणाऱ्या पायऱ्या आहेत, असे म्हणावे लागेल.



## वेगळ्या वाटा

* वेब होस्टिंग हा प्रकारही लोकप्रिय होत आहे. होस्टिंग सेवेमुळे वेबसाईट योग्य पद्धतीने काम करते. तुम्हीही अशा सेवा देऊ शकता.

* सर्च रिझल्टमध्ये रँकिंग मिळालं तर तुमचा ब्लॉग लोकांपर्यंत पोहचू शकतो. याहू,क्रोमवर की वर्ड टाकल्यानंतर पहिल्या पाचांमध्ये येण्यासाठी हे रँकिंग गरजेचं असतं. एसईओ कंसल्टंट हे काम करतात.

* विविध ॲप्सच्या माध्यमातून मुलांना शिक्षण दिलं जातं. त्यामुळे तुम्हीही एखादा विषय शिकवून भरपूर कमाई करू शकता. यू ट्यूबवर व्हिडिओ टाकू शकता. पर्सनल ट्यूटोरिअल वेबसाईट्सना सेवा देऊ शकता.

## कारकिर्द

## खर्चाचं हवं नियोजन

आजकाल कॉलेजचं शिक्षण सुरू असताना पार्ट टाईम जॉब करणाऱ्यांची संख्याही अधिक आहे. त्याच बरोबर कॉलेजचं शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर नोकरी लागावी असाही अनेकांचा प्रयत्न असतो. मात्र, एकदा नोकरी लागली आणि हातात पैसा खेळू लागला की, बचतीपेक्षा चैनीवर बरेच पैसे उडवण्याकडे अनेकांचा कल असतो. पण असं करून चालण्यासारखं नाही. गरज नसताना ते खर्च करणं घातक ठरू शकतं. प्रयत्न केला तर खर्च कमी करु शकता. कसे वाचवायचे पैसे?



* दिवसभराच्या छोट्या खर्चांची नोंद ठेवा. चहाच्या कपापासून सुरूवात करा. दिवसभरात कशाकशावर खर्च करता हे जाणून घ्या. घरी जाण्यासाठी खाजगी टॅक्सीचा वापर किती वेळा करता हे तपासा. मनोरंजनासाठी होणाऱ्या खर्चाचा विचार करा. * पिकनिकला जाण्यासाठी किंवा छंद जोपासण्यासाठी होणाऱ्या खर्चाचा हिशेब ठेवा. * भविष्यात गाडी, घर घ्यायचं किंवा पुढच्या शिक्षणासाठी कर्ज घ्यायचं तर स्वत:चं क्रेडिट प्रोफाइल तयार करा. सुरूवातीला एखादं क्रेडिट कार्ड घ्या. वैयक्तिक कर्जही घेता येईल. कर्जाचे हप्ते तसंच क्रेडिट कार्डाचे हप्ते वेळेत फेडा. यामुळे सिबिल स्कोअर वाढेल आणि कर्ज सुलभपणे मिळू शकेल. * आर्थिक विषयांबद्दल माहिती घ्या. तुमचं ज्ञान वाढवा. गुंतवणूक कशी करायची, किती करायची याबाबत जाणून घ्या. त्याचा फायदा होईल.

## खेचाखेची

## आंब्यांनो!

**शिक्षक:** मुलांनो, 'राजू आंबे तोडायला झाडावर चढत आहे', हे वाक्य आंबे या शब्दाने सुरु करा.

.

.

.

**विद्यार्थी:** आंब्यांनो, तुम्हाला तोडायला राजू झाडावर चढत आहे.

## वेगळं काही

जपानमधलं आओमोरी हे जगातल्या सर्वाधिक बर्फवृष्टी होणाऱ्या शहरांपैकी एक. दर वर्षी शहरात आठ ते दहा फुट उंच बर्फाचा थर साचलेला असतो. विशेष म्हणजे हा बर्फ काढून टाकण्यासाठी सरकारला भरपूर पैसा खर्च करावा लागतो. गेल्या वर्षी सरकारने ३५ दशलक्ष डॉलर्स खर्चून बर्फाचे हे थर काढून टाकले होते. या शहराची लोकसंख्या ३० हजारांच्या आसपास आहे. दर वर्षी इथे बर्फाची वादळं येतात. नोव्हेंबरपासूनच या भागात कडाक्याची थंडी पडायला सुरूवात होते. जपानच्या पर्वतरांगांमधल्या उष्ण पाण्यावरून येणारी थंड हवा भरपूर आर्द्रता घेऊन येते. या आर्द्रतेचं रुपांतर बर्फात होतं. याला 'सी इफेक्ट स्नो' असं म्हटलं जातं. **(क्रमश:)**

## समुपदेशन

## ...तर बदलतील पतीचे विचार

मी पस्तीस वर्षांची विवाहिता असून एका मुलीची आई आहे. माझी मुलगी सहा वर्षांची आहे. आता माझ्या पतीला आणखी एक अपत्य हवं आहे. मलाही त्याचा हा विचार मान्य आहे. पण आणखी एका मुलाला जन्म देण्यापेक्षा एखाद्या निराधार मुलाला दत्तक घ्यावं असं मला वाटतं. त्या निमित्ताने आमचं कुटुंबही चौकोनी होईल आणि एका जीवाला हक्काचं घर मिळेल, हा विचार त्यामागे आहे. परंतु पतीला हा विचार मान्य नाहीत. त्याला कसं समजावू याची चिंता सतावत आहे.



– सखी, तुझा विचार अत्यंत स्तुत्य आहे. देशात निराधार बालकांची संख्या प्रचंड असताना प्रत्येक दांपत्याने हा विचार केला तर समस्येचं गांभीर्य कमी होण्यास मदतच होणार आहे. पण आजच्या आधुनिक युगातही पारंपरिक विचारांचा पगडा असणारे लोक हा विचार झटक्यात स्वीकारु शकत नाहीत. त्यामुळे दुराग्रह न धरता त्याला समजावून सांगितलं, काही उदाहरणं दाखवली, त्याला अनाथांच्या आश्रमात नेऊन वस्तुस्थिती दाखवली आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या माणसांची ओळख करुन दिलीस तर कदाचित त्याचे विचार बदलू शकतील. त्यामुळे आधी हा प्रयत्न करुन बघ.

## सुडोकू ७०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | | | | | ७ | ६ |
| ८ | ६ | | | | | १ | | ९ |
| ४ | | | १ | | ७ | ३ | ८ | ५ |
| | ४ | ३ | | १ | ६ | | | ७ |
| | | | | ३ | | | | |
| ७ | | | ९ | ४ | | ६ | ३ | |
| १ | ५ | ६ | ३ | | ८ | | | २ |
| ३ | | ४ | | | | | ६ | ८ |
| २ | ८ | | | | | | | ३ |


**टीप** -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७०चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | २ | ७ | ९ | ३ | ५ | ४ | १ | ६ |
| ३ | १ | ४ | ६ | ७ | २ | ९ | ५ | ८ |
| ५ | ९ | ६ | ८ | १ | ४ | २ | ३ | ७ |
| २ | ५ | ८ | ७ | ६ | ३ | १ | ४ | ९ |
| ७ | ४ | ३ | २ | ९ | १ | ६ | ८ | ५ |
| ९ | ६ | १ | ५ | ४ | ८ | ३ | ७ | २ |
| १ | ८ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ९ | ४ |
| ४ | ७ | ५ | १ | २ | ९ | ८ | ६ | ३ |
| ६ | ३ | ९ | ४ | ८ | ७ | ५ | २ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ७१



**आडवे शब्द :-**
१) नवरात्रीतील देवीचे एक नाव
४) उपकार करणारे
९) भडीमार
१२) आश्रयस्थान म्हणून स्वीकारलेला अरण्यवास
१४) प्रश्न
१६) कबूतर
१८) वर्षाच्या बोलीने नेमलेला शेतमजूर
२०) तेव्हा (ग्रा.)
२१) गवत
२२) गाणे
२४) पात्याची तीक्ष्णता
२६) तोटी
२८) माकडांना खेळविणारा
३१) वर्षानुवर्षे
३३) एक मोठे चर्मवाद्य
३५) पंख
३६) सोने
३८) *** गमत
४०) घन, घट्ट, गर्द
४१) शुष्कता, अतिशय रूक्षता
४३) बारा वर्षे
४४) संरक्षक भिंत
४५) रवाळ
४७) दारावरील खुणेचा आवाज
४९) बोलणारा पक्षी
५०) ऋण
५१) च्या बरोबर
५३) ज्वारीची वाळलेली खुंटे
५४) गुलाम, सेवक
५६) ठाणवई
५७) च्या पेक्षा वरचढ
५८) नाशाचे मंत्रतंत्र
६१) आजच्या आधीचा दिवस
६२) मार्ग
६३) अस्वला
६४) तपासणीसाठी अचानक केलेला हल्ला
६५) पडदा
६६) कळलाव्या मुनी
६८) लिहिलेले वाचण
६९) रात्र, रजनी
७०) बारा महिन्याचा काळ
७१) धोबी
७२) बट्टु, बुटका
७३) नजरेचा तीर

**उभे शब्द : –**
२) शरीर लटलटण्याचा आजार
३) पद्धत
५) फाशातील एक या संख्येचे चिन्ह
६) कर्णेंद्रिय
७) पाठवणी
८) सत्व
९) घरातील मोठी माणसे
१०) गोदाम
११) चंद्राची कड
१३) पातळ खांब
१५) सत्ता
१६) पर्ण
१७) बडबड्या
१९) दरवाजा
२३) अंधार
२५) सामान
२६) नाच, नृत्य
२७) घराचा मागचा दरवाजा
२९) धर्मार्थ देणे
३०) पराभव
३१) शर्करा
३२) समुद्रकिनारा
३४) सीतापती
३५) वेगाने, त्वरित
३६) कारस्थान
३७) गोष्ट
३९) वृक्ष
४०) नेहमी अशुभ भविष्य सांगणारा
४२) पलंग
४५) अनेकांची कर्जे असलेला
४६) पांगापांग, वाताहात
४८) तलवार
४९) छोटे कुबड
५०) बाजू, काठ
५२) बैलाच्या नाकातील दोरी
५३) सकस
५५) संतोष, आनंद
५७) मोठी उथळ वाटी
५९) रसपूर्ण
६०) विपत्तीची कहाणी
६१) जेवणातील पातळ तोंडी लावणे
६२) दिवस
६५) पडणे
६६) श्वसनेंद्रिय
६७) औषध
६९) अभिप्राय (हिं.)


**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## कालच्या शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

**अमीन सयानी हे असे एक लोकप्रिय रेडिओ निवेदक होते की, ज्यांनी 'रेडिओ सिलोन' च्या प्रसारणांवर हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोत्तम गाजलेल्या गाण्यांचा 'बिनाका गीतमाला' हा कार्यक्रम सादर करून भारतीय उपखंडात मोठी प्रसिद्धी आणि लोकप्रियता मिळवली. ज्यांचे गेले चार दशके विविध ऑर्केस्टांमधील निवेदकांनी ज्यांच्या निवेदन शैलीचे अनुकरण केले, असे एकमेव निवेदक व सूत्रसंचालक अमीन सयानी होते. कार्यक्रम सुरू करताना त्यांची स्वत:ची एक स्टाईल होती, त्यांचे ''मेरे प्यारे बहनो और भाईयो'', म्हणताच श्रोते मंत्रमुग्ध होत असत. पुढील कार्यक्रम ते त्यांच्या मधुरा आवाजाने व आरोह–अवरोहाने ऐकणाऱ्यांना भारून टाकत असत.**



## अमीन सयानी

### रेडिओ सिलोनवरील बिनाका गीतमाला निवेदक!

रंगबहार

**शरद कोरडे**

अमीन सयानी यांचा जन्म २१ डिसेंबर १९३२ साली गुजराती मुस्लिम खोजा कुटुंबांत मुंबई येथे झाला. त्यांच्या आईचे नाव कुलसूम वडील डॉक्टर मोहम्मद सयानी. यांची आई स्वातंत्र्य सैनिक होती. त्यांनी महात्मा गांधींसोबत अनेक सत्याग्रहात भाग घेतला होता. डॉक्टर मोहम्मद यांचे आजोबा रहीम तुल्ला सयानी हे पेशाने वकील होते व ते काही काळ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रेसिडेंट होते. 'बिनाका गीतमाला' हा लोकप्रिय चित्रपट गीतांचा एक साप्ताहिक काउंट डाऊन शो होता. त्यांचे लाखो श्रोते होते व देश परदेशात तो प्रिय होता. हा कार्यक्रम १९५२ साली सुरू झाला, तो सलग १९८८ पर्यंत रेडिओ सिलोन वर चालू होता. त्यानंतर १९८९ मध्ये ऑल इंडिया रेडिओ नेटवर्कच्या विविध भारती केंद्रावर तो स्थलांतरित झाला. विविध भारतीवर हे प्रसारण १९९४ सालापर्यंत चालू होते. भारतांतील तो सर्वांत लोकप्रिय कार्यक्रम होता. बिनाका टूथपेस्ट कंपनीच्या प्रायोजकात्वामुळे त्याला 'बिनाका गीतमाला' व पुढे 'सिबाका संगीतमाला' असे नाव पडले. हा कार्यक्रम तीन डिसेंबर १९५२ मध्ये सुरू झाला. बुधवार रात्री आठ ते नऊ या वेळेस तो सुरू होई. पहिल्या वर्षी १९५३ मध्ये 'अनारकली' या चित्रपटांतील सी. राम चंद्र यांनी संगीत दिलेले, राजेंद्र कृष्ण यांनी लिहिलेले व लता मंगेशकर यांनी गायलेले 'ये जिंदगी उसी की है जो किसी का हो गया' हे गीत प्रथम क्रमांकावर आले होते. १९८८ साली रेडिओ सिलोन वरील शेवटच्या कार्यक्रमात 'कयामत से कयामत तक' चित्रपटांतील आनंद मिलिंद यांनी संगीत दिलेले, मजरुह सुलतानपुरी यांनी लिहिलेले व उदित नारायण यांनी गायलेले 'पापा कहते है बडा नाम करेगा' हे गाणे प्रथम आले होते.

अमीन सयानी यांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात ऑल इंडिया रेडिओ मुंबई मधून केली. रेडिओवरील इंग्रजी कार्यक्रमात ते सहभागी होत असत. दहा वर्षे त्यांनी रेडिओवर काम केले. ऑल इंडिया रेडिओला लोकप्रियता मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. अमीन सयानी यांनी आपली आई कुलसुम सयानी प्रकाशित करीत असलेल्या 'राहबेर' या गांधी विचारांच्या पाक्षिकासाठी संकलन, प्रकाशन व प्रिंटिंग यासाठी १९४० ते १९६० पर्यंत काम केले. हे पाक्षिक हिंदी, उर्दू व गुजराती भाषांतून प्रसिद्ध होत असे. वृत्तपत्रे हिंदुस्तानी भाषेतून प्रकाशित व्हावीत असा महात्मा गांधींचा आग्रह असे. या वृत्तपत्रामुळे अमीन सयानी यांना प्रतिष्ठेचा हिंदी भवन नवी दिल्ली चा पुरस्कार २००७ मध्ये मिळाला होता. सन १९६० ते १९६२ मध्ये सायानी यांनी टाटा ऑइल मिल मध्ये मार्केटिंग डिपार्टमेंट मध्ये ब्रँड एक्झिक्युटिव्ह म्हणून काम केले. त्यावेळी ही कंपनी 'हमाम' व 'जाई' या टॉयलेट सोपची निर्मिती करत होती. अमीन सयानी यांनी १९५१ पासून ते १९७० पर्यंत ऑल इंडिया रेडिओ व एयर कम शिंयल सर्विस व इतर रेडिओ स्टेशन मधून ५४००० रेडिओ प्रोग्राम्स व १९००० जाहिराती व जिंगल्स केल्या. त्याची दखल 'लिमका बुक रेकॉर्ड'ने घेतली आहे, इतकेच नव्हे तर त्यांनी विविध व्हरायटी शोज, म्युझिकल शोज, ब्युटी कॉन्टेस्ट, फॅशन शोज, अवॉर्ड फंक्शन्स, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव व सेमिनार अशा सुमारे दोन हजार कार्यक्रमांत त्यांनी निवेदन व सूत्रसंचालन केले होते.

काही हिंदी चित्रपटातही त्यांनी कामे केली होती. त्यात मेहमूद चा 'भूत बंगला' देवानंदचा 'तीन देवीयाँ, दारासिंग चा 'बॉक्सर', संजीव कुमारचा कत्ल', संजय दत्तचा 'इंसाफ अपने लहू से' या चित्रपटांचा समावेश आहे. मात्र या चित्रपटांत त्यांनी कॉमेंटर व निवेदनाचेच काम केलेले आहे. अनेक पत्रकारांनी अमिन साहेब यांना त्यांच्या आवाजाचे रहस्य विचारले. त्यासाठी त्यांनी काही खास ट्रेनिंग घेतले होते का? असेही विचारण्यात आले. त्यावेळी सयानी यांनी ''आपण असे कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नाही, परंतु सातत्याने वर्षानुवर्ष असे निवेदन केल्यावर हा आवाज हळूहळू तयार झाला. त्यासाठी मी खूप मेहनत घेतली आहे. माझे मोठे भाऊ हमीद हे एका थिएटर ग्रुप मध्ये इंग्रजी नाटकांतून कामे करत होते. त्यावेळी त्यांचे दिग्दर्शक होते सुलतान पद्मसी जे आलेक पद्मसी यांचे मोठे बंधू होते. त्यामुळे आम्ही हा थिएटर ग्रुप जॉईन केला. या ग्रुपमध्ये अनेक वर्षे काम केल्यानंतर मला तेथे खूप शिकायला मिळाले. त्यावेळी रेडिओचा स्तर इतका उच्च होता की तेथे अनेक लेखक, प्रेझेंटर आणि इतर तांत्रिक अधिकारी उच्चशिक्षित होते. अशा लोकांमध्ये मला शिकायला मिळाले. त्यामुळे मी स्वत:ला खूप नशीबवान समजतो. बीबीसी पातळीवर ऑल इंडिया रेडिओचे काम सुरू झाले होते, रेडिओचा तो काळ अत्यंत आनंदाचा, खूप काही शिकण्याचा होता. माझी पत्नी रमा मट्टू काश्मिरी पंडित होती आणि मी मुस्लिम. आम्ही एकमेकांवर केव्हा प्रेम करू लागले हे मलाही समजले नाही. रमाचे काका ऑल इंडिया रेडिओचे म्युझिक हेड होते. त्यांच्याकडूनही मला खूप शिकायला मिळाले. क्लासिकल संगीत मी चार वर्षे शिकत होतो व त्यावेळी मी गाणेही गात होतो, पण त्यानंतर असा काळ आला की माझा आवाज फुटू लागला. मला गाणे गायला कठीण होऊ लागले. माझे मित्र मला बेसुरा म्हणू लागले. मी गाणे थांबवले व निवेदाकडे वळलो. खूप मेहनतीने मी आवाज कमावला व मला यश मिळाले.अमीन सयानी यांचे निवेदन ऐकताना वाटत असे की, त्यांच्या जीवनात कोणतेही दु:ख नाही आणि त्यांच्या जीवनाला संगीताची स्वत:ची अशी एक अखंड लय होती, परंतु उत्तरकाळात शारीरिक विकारांची झुंजताना ते हरले. २० फेब्रुवारी २०२४ ला मुंबईतील एच. एन. रिलायन्स हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला व आपल्या चाहत्यांना त्यांनी अनपेक्षित धक्का दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी म्हणाले ''श्री. अमीन सयानी यांच्या आकाशवाणी वरील सोनेरी आवाजात एक आकर्षण आणि उबदार पण होता, ज्यामुळे ते पिढ्यानपिढ्या लोकांना प्रिय होते. त्यांच्या कामाद्वारे त्यांनी भारतीय प्रसारणात क्रांती घडवून आणली व श्रोत्यांशी खास नाते निर्माण केले. असा कलावंत पुन्हा होणे नाही.'' ●●

---



## धडकी भरवणारा खलनायक डॅनी डेन्झोंप्पा

**श्रीराम शेटये**

खरं तर शोले चित्रपटातील गब्बर सिंग या भूमिकेसाठी डॅनी डॅन्झोंपा यांची निवड करण्यात आली होती. परंतु त्यांच्याकडे तारखा उपलब्ध नसल्याने अमजद खान यांना संधी मिळाली. एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व असलेला अभिनेता खलनायक व्हिलन डॅनी डेन्झोपा.

सृदृढ देहयष्टी, स्टायलिश अंदाज, बारीक पण तिक्ष्ण डोळे, ॲग्रेसिव्ह बॉडी लँग्वेज, गरजणारा आवाज आणि पावरफुल स्क्रिन प्रेझेंस, कमांडिंग पर्सनॅलिटीमुळे त्यांच्या भूमिका नेहमीच लार्जर दॅन लाइफ वाटल्या. या जोरावर अमिताभ बच्चनसारख्या सुपरस्टारलाही रुपेरी पडद्यावर तगडी टक्कर दिली. केवळ हिंदी सिनेमातला खलनायक इतकीच डॅनी यांची ओळख मर्यादित राहात नाही.

डॅनी डेन्झोपा यांना घोडेस्वारीची आवड होती. त्यांचं कुटुंब घोडे पालनाच्या व्यवसायात असल्यामुळे त्यांची घोडेस्वारीची आवड जोपासली गेली. डॅनी यांना खरंतर भारतीय सैन्यदलात सहभागी व्हायचं होतं. पश्चिम बंगालमधून बेस्ट कॅडेट म्हणून निवड होऊन त्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्येही सहभाग घेतला होता. पण त्यावेळी चीनसोबतच्या युद्धाच्या काळात अनेक जवान शहिद झाले. हे पाहून डॅनी यांची आई घाबरुन गेली. अखेर आईच्या सांगण्यावरुन डॅनींनी सैन्यात जाण्याचा निर्णय बदलला आणि पुण्यातल्या फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. सिक्किम सारख्या प्रदेशातून पुण्यातल्या एफटीआयआयमध्ये आलेल्या डॅनींसाठी हा काळ उदासीचा होता. गुरखा, चायनीज, नेपाळी किंवा चिंकी अशा अनेक कुचकट कमेंट्सना त्यांना सामोर जावं लागलं. कॅम्पसमध्ये अनेकदा त्यांची खिल्ली उडवली जायची. अशा वातावरणात टिकून राहाणं त्यांच्यासाठी खूप कठीण होतं. डॅनी डेन्झोपा यांचे मूळ नाव त्शेरींग फिन्सो डेंझाँप्पा या नावाने त्यांना पुकारणं अनेकांना जमत नसे. त्यावरुन त्यांची चेष्टाही होऊ लागली. तेव्हा एफटीआयआयमध्ये त्यांचे जिच्याशी मैत्रीचे बंध जुळले त्या जया बच्चन यांनी डॅनींना नाव बदलण्याचा सल्ला दिला. त्यानुसार बदललेलं नावच पुढे त्यांची ओळख बनून राहिलं. डॅनींना सहजासहजी काम मिळू शकत नव्हतं. त्याकाळी बनत असलेल्या फॅमिली ड्रामांमध्ये डॅनी फिट होत नव्हते. 'ना तू वडिलांसारखा दिसतोस, ना भावासारखा. त्यामुळे केवळ नोकराचे रोल मिळतील' असंही त्यांना ऐकवलं गेलं. बोलणारे खूप काही बोलायचे पण डॅनींना स्वत:वर आणि स्वत:च्या मेहनतीवर विश्वास होता. त्यामुळे कठीण परिस्थितीमध्येही ते टिकून राहिले. डॅनींना हिरोच्या रोलमध्ये रस नव्हता कारण हिरोला नाच गाणं तर करावंच लागे. त्यामुळे डॅनी ॲंटी हिरो भूमिकांकडे वळले. मेहनतीशिवाय लक मिळणार नाही हे त्यांना ठाऊक होतं. त्यामुळे एफटीआयआयमध्ये असताना डॅनी यांनी हिंदी भाषेवरही प्रभुत्व मिळवलं.१९७० मध्ये काही सिनेमात त्यांनी छोट्या भूमिका केल्या. पण 'लहू दे दो रंग'नंतर खऱ्या अर्थाने त्यांना मोठ्या भूमिका मिळू लागल्या. डॅनी यांनी बी आर इशरांच्या 'जरूरत' या बी ग्रेड सिनेमातून सुरुवात केली. त्यानंतर गुलजार यांच्या 'मेरे अपने'मधून डॅनी यांना मेजर ब्रेक मिळाला. ही फिल्म करण्याचं आणखी एक कारण म्हणजे अभिनेत्री मीनाकुमारी. मीनाकुमारी या डॅनी यांची फेवरेट नायिका होती. 'तू तो मेरा असली बच्चा है, तेरी नाक बिलकूल मेरे जैसी है'. मीनाकुमारी यांचे हे आपुलकीचे शब्द डॅनींना खूप धीर देणारे होते. मेरे अपनेनंतरची डॅनी यांच्या करिअरमधली आणखी एक महत्त्वाची फिल्म ठरली धुंद. फिल्ममधला निष्ठूर आणि निर्दयी नवरा डॅनींनी खुबीने साकारला.

रमेश सिप्पी 'शोले' बनवत होते. 'शोले'च्या गब्बरसाठी सिप्पींची पहिली पसंती डॅनींना होती. पण त्यावेळी डॅनी फिरोज खान यांची धर्मात्मा फिल्म करत होते. धर्मात्मासाठी आधीच तारखा दिल्यामुळे डॅनींना शोले करणं शक्य झालं नाही आणि त्यामुळे गब्बरची भूमिका अमजद खान यांच्या वाट्याला आली. गब्बरच्या भूमिकेबद्दल विचारताना डॅनी सांगतात की,

''मी फिरोज खान यांना आधी शब्द दिला होता. मी होकार दिला असता तर इंडस्ट्रीला अमजद खान यांच्या रुपात एक आयकॉनिक खलनायक मिळाला नसता. त्यामुळे शोलेच्या यशात माझाही वाटा आहे. त्यानंतर अमजद यांनी त्यांचं मानधन वाढवलं आणि मी सुद्धा. त्यानंतर कॅरॅक्टर आर्टिस्टचं मानधनही वाढू लागलं''. जया बच्चन डॅनींची एफटीआयआयमध्ये वर्गमैत्रिण होती. बच्चन्ससोबत त्यांचे खूप चांगले संबंध होते. पण तरीही डॅनींनी तब्बल १८ वर्षे अमिताभसोबत काम करणं टाळलं. त्याच कारण म्हणजे अमिताभ यांच्यासारख्या बड्या अभिनेत्यासमोर आपली भूमिका झाकोळली जाईल असं डॅनींना वाटलं होतं. पण जेव्हा मुकुल आनंद यांनी अग्निपथची कथा ऐकवली तेव्हा डॅनींना असा विश्वास वाटला की विजय दीनानाथ चौहानसमोर कांचा चीना दुर्लक्षित राहाणार नाही आणि झालंही अगदी तसंच.डॅनींचा कांचा चीना आजही एक अजरामर व्हिलन आहे.

'चोर मचाए शोर', 'खोटे सिक्के', 'काला सोना' अशा सिनेमात त्यांनी यादगार भूमिका साकारल्या. खलनायकाच्या भूमिकेत 'अंदर बाहर', 'आंधी तूफान', 'भगवान दादा', 'अग्निपथ', 'हम', 'घातक', 'क्रांतीवीर' अशा अनेक सिनेमांमध्ये डॅनींनी अमिताभ, धमेंद्र ते सनी देओलपर्यंतच्या नायकांना शह दिला.'अग्निपथ'मधला कांचा चीना किंवा 'घातक'मधला कातिया यांच्या क्रूरपणा आणि निर्दयतेने प्रेक्षकांचा थरकाप उडवला. हिरोइतकाच भाव खाऊन गेला डॅनींना साकारलेला व्हिलन. अग्निपथचा कांचा चीना, मेरे अपनेमधला सडकछाप संजू, धुंदमधला अपंग तरीही क्रूर पती, हममधला बख्तावर, क्रांतीवीरचा चतुर सिंग चीता किंवा मग कातियाया खलनायकाचे निर्दयी आणि बेदरकार हावभाव आणि डोळ्यातला अंगार समोरच्याचा थरकाप उडवणारा..हा तो व्हिलन आहे ज्याच्या हुकुमशाहीत 'हर गलती की सजा मौत है'

डॅनी यांनी केवळ निगेटीव्ह भूमिकाच केल्या असं नाही तर सकारात्मक आणि विनोदी भूमिकाही तितक्याच सहजतेने साकारल्या. हिंदी सोबतच अनेक नेपाळी, तेलगू आणि तमिळ भाषेतही डॅनींनी काम केलं. अनेक फिल्मसाठी त्यांना फिल्मफेअरचे नॉमिनेशन मिळाले. अभिनयासोबतच डॅनी उत्तम लिहितात. त्यांनी फिर वही रात आणि राम या दोन सिनेमांचं दिग्दर्शनही केलं. डॅनींचं फिमेल फॅन फॉलोईंग जबरदस्त होतं. इतकंच नाही तर काही मेल फॅन्सही त्यांना रक्ताने पत्र लिहायचे आणि त्यांना गुरु मानल्याचं सांगायचे. दरम्यानच्या काळात डॅनी यांच्या आयुष्यात आली परवीन बाबी. परवीन आणि डॅनी चार वर्षे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहिले. त्याकाळी ही खूप मोठी गोष्ट होती. त्यानंतर परवीन कबीर बेदींच्या प्रेमात पडली आणि हे नातं तुटलं. ब्रेकअपनंतरही परवीन त्यांच्या घरी येत राहिली. काही दिवसांतच परवीन स्किझोफेनियाची रुग्ण असल्याचंही समोर आलं. त्यावेळी डॅनी यांचं सिक्किमची प्रिन्सेस गावा डॅन्झोपासोबत लग्न झालं होतं. तर परवीनच्या आयुष्यात महेश भट आले होते. पण दिवसेंदिवस परवीनचा आजार बळावत राहिला. एकेकाळी सतत ग्लॅमरच्या वलयात राहिलेल्या परवीनने एकाकीपणे जगाचा निरोप घेतला. परवीनच्या अंत्यविधीवेळी उपस्थिती असणाऱ्या मोजक्या कलाकारांमध्ये डॅनी होते. डॅनी यांना मनमोहन देसाईंनीही अनेकदा सिनेमासाठी विचारलं होतं. पण दरवेळी डॅनी नकार देत राहिले. डॅनींना देसाईंबद्दल आदर होता पण तरीही एकदा त्यांनी स्पष्टपणे देसाईंना सांगितलं की तुमचे सिनेमे इंडस्ट्रीला आणखी २० वर्षे मागे नेतात. तुम्ही एक हिट सिनेमा देता आणि मग बाकी सारे तुम्हाला फॉलो करतात. ते ऐकून देसाईंनीही त्यांना अगदी ठेवणीतलं ऐकवलं. पण डॅनी स्पष्टवक्ता होते. त्यांच्या करिअरमध्ये त्यांनी भारंभार सिनेमे अजिबात केले नाही. पण जे सिनेमे केले त्यातून आपले फॅन्स नाराज होणार नाहीत याची काळजी घेतली. डॅनींनी नेहमी स्वत:च्या अटींवर काम केलं. डॅनी उत्तम अभिनेताच नाही तर उत्तम पेंटर आणि गायकही आहेत. ते उत्तम बासरी वाजवतात. डॅनींनी लतादीदी, आशाताई, रफी, किशोर कुमार अशा अनेक दिग्गज गायक गायिकांसोबत गाणी गायली आहेत. काही नेपाळी सिनेमांसाठीही त्यांनी पार्श्वगायन केलं आहे. बदलत्या काळातही नव्या पिढीसोबत डॅनी काम करत राहिले. चित्रपट सृष्टीत आपली अभूतपूर्व छाप उमटवणारे डैनी हे खरंच अप्रतिम अभिनेते आहेत. ●●

---

**इतिहासाच्या पानात ज्यांनी कोरले स्वराज्याचे नाव अन्यायाला दिला सडेतोड घाव. रयतेच्या सुखासाठी ज्यांनी झिजविले आपले आयुष्य, अशा शिवबामुळेच घडले महाराष्ट्राचे उज्वल भविष्य!**



## प्रजाहित जपणारे राजे

**कु.क्रांती मोहन गुंड**

जगात अनेक राजे होऊन गेले पण जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज या भूमीत एकच राजा झाला ज्यांनी प्रजेच्या डोळ्यातील अश्रू पुसले आणि गोरगरिबांच्या झोपडीत ही न्यायाचा प्रकाश पोहोचला तो म्हणजे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज तलवारीच्या जोरावर साम्राज्याची निर्माण करणारा योद्धा नव्हे तर प्रजेच्या हिताचा विचार करणारा एक आदर्श राज्यकर्ता म्हणजे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज, राजा कसा असावा?याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. महाराजांना जाणता राजा का म्हटले असावे? कारण रयतेचे दुःख जाणणारा व दूर करणारा राजा महाराजांनी जमिनी जिंकल्या नाही तर रयतेची मने जिंकली. रयतेच्या सुखासाठी कष्टकरणारा राजा, छत्रपती शिवाजी महाराज शूरवीर, पराक्रमी, भूमिपुत्र, श्रीमंतयोगी, प्रेमळ, निस्वार्थी, बुद्धिमान, चारित्र्य संपन्न, जिद्दी, स्वच्छ राजकारणी, संयमी, न्यायप्रिय, विज्ञाननिष्ठ, असे अनेक गुण त्यांच्या अंगी होते.

प्रत्येक लढाईत स्वतंत्र अशी युद्धनीती, लढाईचे स्वातंत्र्य नियोजन, गनिमी कावा असे वेगवेगळ्या पद्धती होते. महाराजांनी एक चाल एक माणूस असे दुसऱ्यांदा कधी ही वापरले नाही. हंबीरराव मोहिते, जीवा महाले, शिवा काशीद, कान्होजी जेधे, तानाजी मानुसरे, असे अनेक निष्ठावंत सहकारी त्यांना लाभले. अनेक शिलेदारांच्या बलिदानातून त्यांच्या कर्तव्य निष्ठेतून स्वराज्य मोठा होत गेलं. थोडं बारकाईने पाहिल्यास महाराजांचे नाव उलट लिहिल्यास जीवाशी हा शब्द तयार होतो म्हणजे, महाराजांनी जीवाशी पर्वा न करता स्वराज्य स्थापन केलं. शिवरायांनी मायभूमीचे जतन करण्याचा आया बहिणींच्या अब्रूचे आणि तमाम रक्षण करण्याचा दृष्टिकोन सर्व मावळ्यांना पटवून दिला. छत्रपती शिवरायांच्या दरबारात स्त्री कधी नाचली नाही, महाराजांची शिकवण होती बहिणींचे रक्षण करा, जर तिचा अपमान होत असेल तर हे स्वराज्य काय कामाचे? शिवरायांनी स्त्रीला नेहमी उच्च मानले. हा जगाला आदर्श दिला कोणत्याही स्त्रीचा ते साडी चोळी देऊन सन्मान करत असत. कल्याणच्या सुभेदाराची सून का होईना. त्यांनी जिथे जिथे छापे टाकले तेथे केवळ धन हस्तगत केले. स्त्री धनाला त्यांनी कधी हात लागू दिला नाही, आणि लावला ही नाही, वाईट कृत्य करणाऱ्यावर त्यांनी कधी दया दाखवली नाही.

शिवरायांनी कुठल्याही धर्मावरून कधी ही भेदभाव केला नाही, स्वराज्य हे सर्व धर्मांच्या लोकांसाठी होते, महाराजांची लढाई मुस्लिम धर्माशी विरोधी नव्हती, तर ती अत्याचारी प्रवृत्तीवर होती, लढाई करताना कुराणाची कागदाची एखादी प्रत हाती लागल्यास ती मुस्लिम व्यक्तीकडे आदरपूर्वक देत. महाराजांच्या सैन्यात आणि प्रशासनात अनेक मुस्लिम अधिकारी उच्च पदावर होते. त्यांचे अंगरक्षक मदारी मेहतार, आरमार प्रमुख कान्होजी जेथे त्यांच्या सोबतचे असलेले, दौलत खान, आणि तोफखान्याचा प्रमुख इब्राहिम खान हे महाराजांच्या अत्यंत विश्वासू सैनिक होते.

जातीपातीच्या भिंती तोडून माणुसकीचा धर्म ज्यांनी जपला मुस्लिम असो या हिंदू प्रत्येकासाठी त्यांनी न्याय सारखाच ठरला. त्यांच्या स्वराज्यात स्त्री शेतकरी सुखात नांदत होते, महाराज खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष आणि प्रजाहितक्षतेचे लोकनेते होते. त्यांनी अष्टप्रधान मंडळ तयार करून लोकशाहीची पहिले पाऊल महाराजांनी त्या काळात टाकल होत. त्यांनी सह्याद्रीच्या डोंगरावर किल्ले उभारले केले. त्यांनी अफजलखानाचा वध, पन्हाळ्याचा वेढा, शाहिस्तेखानाची फजिती, आग्र्याहून सुटका, सुरतेवरची मोहीम असे अनेक पराक्रम केले. दादाजी कोंडदेव यांच्याकडून त्यांनी युद्ध कला शिकली. राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांनी त्यांना चांगले संस्कार दिले. छत्रपती शिवाजी महाराज मावळ्यांचे राजा होते परंतु ते खऱ्या अर्थाने ते शेतकऱ्यांचे राजे होते. शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने बळीराजाचे कैवारी होते. शिवराय हे शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे गोरगरिबांचे कैवारी होते. पोटाची खळगी भरली तरच पाठीचा कणा ताठ राहतो आणि म्हणूनच शिवाजी महाराजांनी आधी सर्वांच्या हाताला काम दिलं आणि म्हणूनच रयत स्वराज्यासाठी उभी राहिली. स्वराज्याचा प्रमुख शेतकरी हा कणा होता. शिवरायांनी सैनिकांना सक्त मनाई केली होती की शेतकऱ्यांच्या परवानगी शिवाय त्यांच्या भाजीचा देठाला ही हात लावू नये. दुष्काळ पडला तर ते शेतसारा माफ करत आणि त्यांना बी बियाणे बैल जोडी घेण्यासाठी बिनव्याजी कर्ज देत असत, त्यांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले आणि गुलामगिरीत अडकलेल्या रयतेमध्ये स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली. ध्येयाकडे वाटचाल कशी करावी हे त्यांच्या आयुष्यातून शिकायला मिळते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी संपुर्ण आयुष्य वेचले. ज्यांनी मुघल आणि आदिलशाहाला आव्हान देऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले.परकीय सत्तांच्या जुलमी राजवटीला विरोध करून रयतेचे राज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आजही संपुर्ण देशात साजरी केली जाते. त्यांचा हा दिवस प्रत्येक शिवभक्तांसाठी एक आनंदाचा आणि गौरवाचा मानला जातो. महाराजांचे विचार आज घराघरात पोहचविण्याचे काम वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या माध्यमातून होत आहे.या युगपुरुषाचे विचार घेऊन आजच्या पिढीने डोक्यात घेऊन चालणे हेच खरे महाराजांना अभिवादन ठरेल..

**अंधार फार झाला,**
**आता दिवा पाहिजे.!**
**पुन्हा एकदा या**
**राष्ट्राला जिजाऊंचा**
**शिवबा पाहिजे!**
**चला महाराजांचे**
**विचार आपण**
**अंगीकार करूया**
**पुढच्या पिढीला**
**बहुजानात पेरू**
**या !**



●●

# बालांगण

## ह्वांग हो- चीनचे अश्रू


ओळख नद्यांची



ह्वांग हो नदीला पिवळी नदी असेही म्हणतात. चीनच्या संस्कृतीचा आणि इतिहासाचा उगम या नदीच्या काठावर झाला असल्यामुळे तिला चीनच्या दृष्टीने खास महत्त्व आहे.
ह्वांग हो नदीचा उगम चीनमधील तिबेट पठारावरील बायन–हार पर्वतरांगांमध्ये होतो. तिथून ही नदी पूर्वेकडे वाहत जाते आणि शेवटी पिवळ्या समुद्राला मिळते. या समुद्राचे नावही या नदीमुळेच पिवळा समुद्र असे पडले आहे. ह्वांग हो नदीची एकूण लांबी सुमारे ५४६० किलोमीटर एवढी आहे. ही नदी चीनमधील अनेक प्रांतांतून वाहते. ती मोठ्या प्रमाणात गाळ आणि माती वाहून आणते त्यामुळे या नदीच्या पाण्याला पिवळसर रंग आला आहे. याच गाळामुळे नदीला पिवळी नदी असे नाव मिळाले. या नदीच्या काठावर सुपीक शेती होते. गहू, तांदूळ, कापूस अशी पिके येथे मोठ्या प्रमाणात घेतली जातात. त्यामुळे ही नदी शेतकऱ्यांसाठी फार महत्त्वाची आहे.
ह्वांग हो नदीला अनेक उप–नद्या मिळतात. वेई नदी ही तिची एक महत्त्वाची उपनदी आहे. या नदीवर अनेक धरणे आणि कालवे बांधलेले आहेत. त्यामुळे पाणी साठवणे, शेतीसाठी वापर आणि वीजनिर्मिती करणे शक्य झाले आहे.
या नदीला अनेक वेळा पूर येतात. पूर्वी वारंवार पूर येत असल्यामुळे तिला चीनचे अश्रू असे म्हटले जात असे. आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे पूर नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ह्वांग हो नदीचा उपयोगशेती, पाणीपुरवठा, उद्योग, वीज निर्मिती आणि वाहतूक यासाठी केला जातो. चीनच्या इतिहासात, संस्कृतीत आणि अर्थव्यवस्थेत या नदीचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे.

## क्षेत्र बायोमेडिकल इंजिनिअरींगचं


कोण होणार?



आता वैद्यकीय क्षेत्र आधुनिक झालं आहे. या क्षेत्रात अत्याधुनिक उपकरणांचा वापर होत आहे. पण ही उपकरणं वापरण्याआधी माणसाच्या शरीरावर या उपकरणांचे काय परिणाम होणार याचा अभ्यास करावा लागतो. हे काम सोपं नाही. बायोमेडिकल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून हे केलं जातं. वैद्यकीय क्षेत्रात रस असेल तर तुम्ही या क्षेत्राची निवड करू शकता.
बायोमेडिकल इंजिनिअरींग काय आहे?
ही इंजिनिअरींगची एक शाखा आहे. यात वैद्यकीय उपकरणं, उपचार तसंच निदानासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध पद्धतींचा विकास आणि संशोधनासाठी इंजिनिअरींगमधल्या सिद्धांतांचा वापर केला जातो. वैद्यकीय उपकरणांची देखरेख आणि तपासणी करणं हे बायोमेडिकल इंजिनिअरचं मुख्य काम असतं. यात इंजिनिअरींग तसंच जैवविज्ञानाच्या सिद्धांताचा वापर केला जातो.
कसं चालतं काम?
वैद्यकीय उपकरणांवर संशोधन करणं, तपासणी तसंच मूल्यांकन करणं ही कामं बायोमेडिकल इंजिनिअरला करावी लागतात. रूग्णालयं तसंच वैद्यकीय केंद्रांसाठी नव्या उपकरणांची खरेदी करावी लागते.
पात्रता : विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी या क्षेत्रात करीअर करू शकतो. बायोमेडिकल इंजिनिअरींगची पदवी घेऊन या क्षेत्रात करीअर करता येईल. पीएचडी करून या क्षेत्रात संशोधन करण्याची संधी मिळू शकते.

## रोबो कसे काम करतो?





रोबो म्हणजे माणसाने बनवलेली, आपोआप काम करू शकणारी यंत्रे. रोबोमध्ये सेन्सर्स, संगणक आणि मोटर्स असतात. सेन्सर्स प्रकाश, आवाज किंवा अडथळे यासारखी आजू–बाजूची माहिती गोळा करतात. ही माहिती रोबोच्या संगणकात जाते. संगणक आधी दिलेल्या सूचनांनुसार निर्णय घेतो आणि मोटर्सना आदेश देतो. त्यामुळे रोबो चालतो, वस्तू उचलतो किंवा एखादे काम करतो. काही रोबो माणसांसारखे दिसतात, तर काही कारखान्यात काम करतात. आजकाल कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोबो अधिक हुशार होत आहेत आणि अवघड कामेसुद्धा करत आहेत.

## शांत झोप हवीये?


हेल्थ वेल्थ



शांत झोप ही आरोग्याची गुरूकिल्ली असते. पण काही मुलांना झोप न येण्याची समस्या असते. याला इन्सोमनिया असं म्हटलं जातं. तुम्हालाही ही समस्या जाणवत असेल तर काय करायला हवं, याविषयी...
झोपताना भीती वाटणं किंवा कशाची तरी काळजी वाटणं यामुळे झोप येत नाही. काही मुलांना अंधाराची भिती वाटते तर काहींना एकटं झोपायची भीती वाटते. रात्री येणाऱ्या कुठल्याशा आवाजामुळे तुम्ही दचकू शकता. मोठी झाली की ही भीती पळून जाते. पण झोपताना भिती वाटत असेल तर खोलीत आरामदायी वाटेल, असं काहीतरी करा. तुमचे लहानपणीचे फोटो लावा. कुटुंबासोबतचे फोटो लावा. खोलीत आवडीच्या वस्तू ठेवा. यामुळे तुमची भिती कमी होईल.
रात्रीच्या वेळी पडणाऱ्या वाईट स्वप्नांमुळे तुम्ही दचकून उठू शकता. रात्री अशी स्वप्नं पडल्यामुळे तुम्हाला झोप येत नसेल तर आई–बाबांशी बोला. अशा स्वप्नांविषयी बोलल्याने किंवा स्वप्नांची चित्रं काढल्याने ही समस्या दूर होऊ शकते. झोपण्याआधी मारामारीचे चित्रपट,भीतीदायक मालिका बघितल्याने, पुस्तक वाचल्याने अशी स्वप्नं पडू शकतात. हे टाळण्यासाठी मनात चांगले आणि सकारात्मक विचार आणा. चांगली पुस्तकं वाचा. तुमची काळजी करणाऱ्या लोकांचा विचार करा. आवडीच्या ठिकाणांचा विचार करा. आवडती गाणी ऐका. गोष्टीचं पुस्तक वाचा.
काळजी आणि ताणतणाव यामुळेही झोप येत नाही. विविध विषयांमधील ताण तणावांबाबत विचार करत राहिल्याने रात्री झोप येत नाही. तुम्हाला खूप ताण येत असेल तर कुटुंबियांशी बोला. एखादा विषय कळत नसेल तर त्याबाबत स्पष्टपणे बोला. ताण कमी करण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला शांत झोप येईल.

## हेडफोन विकत घेण्याआधी...

स्मार्ट शॉपिंग



आपण हेडफोनचा वापर करतो. स्मार्टफोनसोबत हेडफोनही दिले जातात. हेडफोन्स चांगल्या दर्जाचे असणं गरजेचं असतं. कमी दर्जाच्या हेडफोनमुळे कानांच्या पडद्यांना त्रास होण्याची शक्यता असते. हेडफोन खराब झाल्यावर तुम्ही नवे विकत घेता. पण हेडफोन खरेदी करताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्या, याविषयी...
✻ कानांसाठी ८५ डेसिबलपर्यंतचा आ–वाज योग्य मानला जातो. त्यापेक्षा जास्त आवजामुळे कानांचे पडदे फाटू शकतात. त्यामुळे हेडफोन विकत घेताना आवाजाची तीव्रता तपासून घ्या. ८५ डेसिबलपेक्षा जास्त फ्रिक्वेंसी असणारे हेडफोन घेऊ नका.
✻ हेडफोन विकत घेण्याआधी त्यातील नॉइज कॅन्सलेशन या फीचरकडे लक्ष द्या. नॉइज कॅन्सलेशन या फीचरमुळे हेडफोन लावल्यानंतर बाहेरचा आवाज कानांपर्यंत पोहोचत नाही. हे तपासून पाहण्यासाठी हेडफोन कानात घाला. यानंतर बाहेरचा आवाज कानांपर्यंत पोहोचत नसेल तर ते चांगल्या दर्जाचे आणि तुमच्या कानांसाठी योग्य आहेत असं समजा.
✻ हेडफोनसोबत ड्रायव्हरही येतात. या ड्रायव्हरमुळे हेडफोनपर्यंत पोहोचणाऱ्या लहरींचं आवाजात रूपांतर होतं. वेगवेगळे ड्रायव्हर असणारे हेडफोन्स बाजारात उपलब्ध आहेत.
✻ गाणी ऐकण्याच्या उद्देशाने ही ॲक्सेसरी विकत घेत असाल तर हेडफोन हा सर्वोत्तम पर्याय आहे. ईयरफोन थेट कानात जातात तर हेडफोन कानांच्या वरच्या भागावर राहतात. त्यामुळे मोठ्या आवाजाचा त्रास कमी प्रमाणात होतो.

## जपा नखांचं आरोग्य


स्टे फिट



हातापायांच्या नखांची स्वच्छता किती महत्त्वाची आहे हे तुम्ही जाणताच. नखांमध्ये घाण अडकलेली असेल तर अन्नाद्वारे ती पोटात जाते आणि विविध आजार उद्भवतात. म्हणूनच सगळे आपल्याला वारंवार नखं स्वच्छ ठेवण्याचा, वेळोवेळी कापण्याचा सल्ला देत असतात.
आहारात पौष्टिक घटक असतील तर शरीरातील अन्य अवयवांप्रमाणे नखंही निरोगी राहतात. आहारातील लोहाची पर्याप्त मात्रा नखांच्या आरोग्यासाठी आवश्यक असते. म्हणूनच लोहयुक्त आहार घ्यावा. यासाठी तुम्ही आहारात बीन्स, सोया, मासे, लाल मांस, अंडी, सालासह धान्य, बेदाणे, खजूर आदींचा वापर वाढवू शकता. बीटामध्येही नखांना उपकारक ठरेल अशी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीची पर्याप्त मात्रा असते. म्हणूनच दिवसातून एकदा बीटाचं सेवन करावं.
नखं स्वच्छ, बळकट आणि आरोग्यसंपन्न रहावी यासाठी त्यांची निगा राखायला हवी. यासाठी काही उपाय करता येतील. एका बाऊलमध्ये कोमट पाणी घ्या. त्यात लिंबाचा रस मिसळा. एका कॉटन बॉलनं हे पाणी नखांवर पसरवून हलक्या हातानं मॉलिश करा. आठवड्यातून एकदा हा उपाय केला तरी, नखांवर डाग राहणार नाहीत त्याचप्रमाणे नखांमध्ये घाण राहणार नाही. नखं बळकट करण्यासाठी गरम पाण्यामध्ये ऑलिव्ह ऑईलचे काही थेंब टाकून काही काळ त्यात बोटं बुडवून बसणं हा देखील एक चांगला उपाय आहे.
विशेषत: वारंवार नखं तुटण्याचा अथवा दुभंगण्याचा त्रास असेल त्यांनी हा उपाय अवश्य करावा. नखं गोलाकार आकारात कापावी. नखांना वेगवेगळे शेप देण्याच्या भानगडीत पडू नये.

## सायबर गुन्हे म्हणजे काय ?

सायबर गुन्हे म्हणजे संगणक, मोबाईल किंवा इंटरनेट वापरून केलेले गुन्हे. यात लोकांची वैयक्तिक माहिती चोरणे, खोटे संदेश पाठवून फसवणूक करणे किंवा कोणाचे खाते हॅक करणे, यांचा समावेश होतो. काही लोक बनावट वेबसाइट किंवा लिंक वापरून पैसे चोरण्याचा प्रयत्न करतात. सोशल मीडियावर त्रास देणे हासुद्धा सायबर गुन्हा आहे. अशा गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी मजबूत पासवर्ड वापरणे, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे आणि वैयक्तिक माहिती कोणालाही न देणे, महत्त्वाचे आहे. त्यामुळे इंटरनेट वापरताना नेहमी सावध राहणे गरजेचे आहे.



## जग व्हिडिओ गेम्सचे


व्हिडिओ गेम तयार करण्यासाठी अनेक लोक एकत्र काम करतात. आधी गेमची कल्पना आणि कथा ठरवली जाते. नंतर डिझायनर गेममधील पात्रे, जग आणि नियम तयार करतात. प्रोग्रामर संगणकाची भाषा वापरून गेम चालेल असा कोड लिहितात. कलाकार चित्रे, रंग आणि ॲनिमेशन तयार करतात, तर ध्वनीतज्ज्ञ संगीत आणि आवाज रेकॉर्ड करतात. शेवटी गेमची चाचणी करून चुका दुरुस्त केल्या जातात. सगळं तयार झाल्यावर गेम मोबाईल, संगणक किंवा गेम कन्सोलवर खेळण्यासाठी उपलब्ध केला जातो. त्यामुळे आपण मजेदार आणि जिवंत वाटणारा गेम खेळू शकतो.



## मऊ धातू: शिसे

खनिजांची माहिती

शिसे हा एक महत्त्वाचा खनिज धातू आहे. तो दिसायला राखाडी रंगाचा, मऊ आणि जड असतो. शिसे सहज वाकवता येते. हा धातू पटकन तुटत नाही. प्राचीन काळापासून माणसाला शिसे माहीत आहे आणि वेगवेगळ्या कामांसाठी शिसे वापरले गेले आहे.
शिसे बहुतेक वेळा पृथ्वीच्या पोटात खडकांमध्ये सापडते. ते सहसा इतर धातूंमध्ये मिसळलेले असते. जगात शिसे मोठ्या प्रमाणात ऑस्ट्रेलिया, चीन, अमेरिका, पेरू आणि मेक्सिको या देशांमध्ये मिळते. भारतात राजस्थान, झारखंड आणि छत्तीसगड या भागांत शिसे सापडते. शिसे मिळवण्यासाठी खाणीतील खडक बाहेर काढले जातात. हे खडक फोडून त्यावर विशेष प्रक्रिया केल्या जातात आणि शिसे वेगळे केले जाते. त्यानंतर ते शुद्ध स्वरूपात मिळवले जाते. ही प्रक्रिया काळजीपूर्वक करावी लागते. कारण शिसे चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास अपायकारक ठरू शकते.



गाड्यांच्या बॅटऱ्यांमध्ये शिसे मोठ्या प्रमाणात वापरले जाते. घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या इनव्हर्टर बॅटऱ्यांमध्येही शिसे असते. पूर्वी पाण्याच्या नळ्या आणि रंग तयार करण्यासाठी शिसे वापरले जाई. पण ते आरोग्यासाठी हानिकारक असल्यामुळे आता त्याचा वापर कमी झाला आहे. शिसे या धातूचा उपयोग किरणोत्सर्गापासून संरक्षणासाठीही होतो. रुग्णालयांमध्ये एक्स–रे काढताना वापरल्या जाणाऱ्या खोलींच्या भिंतींमध्ये शिशाचा थर असतो. त्यामुळे हानिकारक किरणे बाहेर जात नाहीत. तसेच काही प्रकारच्या काचांमध्ये आणि वजनदार वस्तूंमध्येही शिसे वापरले जाते. शिसे शरीरासाठी अपायकारक असू शकतो. शिसे शरीरात गेल्यास आजार होऊ शकतात. विशेषतः लहान मुलांसाठी शिसे धोकादायक ठरते. योग्य काळजी आणि मर्यादित वापर केल्यास शिसे उपयोगी धातू आहे.

## रोपटी सूर्यप्रकाशाच्या दिशेने का वळतात?

नॉलेज अपडेट

कुंडीतली रोपटी सूर्यप्रकाशाच्या दिशेला वळतात. घरात ठेवलेल्या रोपट्याची वाढही खिडकीच्या दिशेने होत असल्याचा अनुभव तुम्ही घेतला असेल. असं का बरं होत असावं?
घनदाट जंगलामध्ये झाडांच्या गर्दीमुळे सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहचू शकत नाही. यामुळे जमिनीलगत उगवणारी फार थोडी झाडं जगू शकतात. सूर्यप्रकाश न मिळाल्याने बरीच रोपटी मरून जातात. अन्न बनवण्यासाठी सूर्यप्रकाशाची गरज नसणारी रोपटी जगू शकतात. पूर्वीच्या काळी रोपटी सूर्यप्रकाशाच्या दिशेने का वळतात, असा प्रश्न लोकांना पडत असे. याचं उत्तर चार्ल्स डार्विनने शोधून काढलं. गवताचं पातं सूर्यप्रकाशाच्या दिशेने वळत असल्याचं त्याने प्रयोगाअंती सिद्ध करून दाखवलं. याला फोटोट्रॉपीझम असं म्हणतात.
हिरव्या वनस्पतींच्या अन्ननिर्मितीच्या प्रक्रियेला फोटोसिंथेसिस असं म्हणतात. हिरव्या झाडांच्या पानांमध्ये हरितद्रव्य असतं. त्याला क्लोरोफिल असं म्हणतात. जमिनीतून शोषून घेतलेल्या पाण्याचं रूपांतर साखरेत आणि हवेतल्या कार्बन डाय ऑक्साइडचं रूपांतर ऑक्सिजनमध्ये करण्याचं काम हे हरितद्रव्य करतं.




ऑक्सिजन वातावरणात सोडला जातो तर साखरेचा वापर अन्न म्हणून केला जातो. ही सगळी प्रक्रिया सूर्यप्रकाशामुळे शक्य होते. अन्न निर्मितीच्या प्रक्रियेसाठी पानं सूर्यप्रकाशाच्या दिशेला वळतात. सूर्यप्रकाशाशिवाय हिरव्या वनस्पती जगू शकत नाहीत. पानाच्या एका बाजूला सूर्यप्रकाश पडला तरी अन्ननिर्मितीची प्रक्रिया सुरू राहते आणि झाड जगू शकतं. हा प्रयोग तुम्ही घरी करून बघू शकता. दोन रोपटी आणा. एक रोपटं सूर्यप्रकाशात तर एक अंधाऱ्या खोलीत ठेवा. सूर्यप्रकाशात ठेवलेल्या रोपट्याची वाढ वेगाने होईल तर अंधारातल्या रोपट्याची वाढ खुंटेल.


## गेम्सचे व्यसन का लागते ?

रंजक विज्ञान

आजकाल मोबाईल, संगणक किंवा टीव्हीवर खेळ खेळायला मुलांना खूप आवडते. काही खेळ तर इतके गुंतवून ठेवतात की एकदा खेळायला सुरुवात केली की थांबावेसे वाटतच नाही. मग प्रश्न पडतो. खेळांचे इतके व्यसन का लागू शकते? याचे कारण म्हणजे आपल्या मेंदूची काम करण्याची पद्धत. आपण एखादा खेळ जिंकतो, एखादी पातळी पूर्ण करतो किंवा बक्षीस मिळवतो, तेव्हा मेंदूला आनंदाची जाणीव होते. ही जाणीव इतकी सुखद असते की मेंदू पुन्हा पुन्हा तोच आनंद मिळवायला आपल्याला प्रवृत्त करतो. त्यामुळे अजून एकदा खेळूया, असे वाटू लागते.



खेळ बनवणाऱ्या लोकांनी हे सगळे मुद्दाम आखलेले असते. खेळात छोट्या छोट्या पातळ्या असतात. एक पातळी पूर्ण झाली की लगेच पुढची समोर येते. मध्येच गुण, स्टार्स, बक्षिसे, नवीन शक्ती असे काही काही मिळत राहते. त्यामुळे खेळ सोडून उठावेसे वाटत नाही. एखादी गोष्ट ऐकताना पुढे काय झाले असेल, असे वाटते. तसेच खेळातही होते. खेळांमधले रंग, आवाज आणि हालचाली खूप आकर्षक असतात. चमकणारे रंग, जलद हालचाली आणि मजे–शीर आवाज यामुळे डोळे आणि मेंदू सतत खेळाकडे ओढले जातात. खऱ्या आयुष्यात कंटाळवाणे वाटणारे काम खेळात मजेशीर करून दाखवले जाते.
गंमत म्हणजे खेळात चूक झाली तरी फार नुकसान होत नाही. हरलो तरी पुन्हा संधी मिळते. त्यामुळे भीती न वाटता खेळात रमून जाता येते. खऱ्या आयुष्यात मात्र चुका लगेच दिसून येतात. म्हणून तिथे तितकी मजा वाटत नाही. पण खूप वेळ असे खेळ खेळल्याने अभ्यास, ग्राऊंडवरील खेळ, झोप आणि माणसांशी बोलणे कमी होते. सतत मोबाईल वापरल्याने डोळ्यांना त्रास होतो. मेंदू दुसरा विचार करणे बंद करतो. एका जागी वाकून बसल्यामुळे पाठदुखी आणि मानदुखी होऊ शकते. खेळ वाईट नाहीत, पण त्याचा नाद निर्माण झाली तर ती अडचण ठरू शकते. वेळ ठरवून खेळणे,



अधून मधून बाहेर खेळणे आणि वाचन करणे यामुळे मन शांत आणि संतुलित होऊ शकते. खेळ मजेसाठी आहेत हे लक्षात ठेवले तर खेळाचा आनंद मिळतो आणि त्रासही होत नाही.

विनायक दळवी

## विश्वचषक स्पर्धेची गाडी रुळावर आली

प्रत्येक विश्वचषक स्पर्धेत आयसीसीने नियमांमध्ये आणि स्पर्धेच्या 'ढाच्या' मध्ये अनेक बदल करून पाहिले आहेत. सध्या सुरू असलेली भारत आणि श्रीलंका या दोन देशांमधील २०-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा मात्र या सर्व प्रयोगांपेक्षा वेगळी आणि विचित्र होती. त्याचा प्रमुख कारण म्हणजे बांगलादेशने स्पर्धेवर टाकलेला बहिष्कार आणि त्यामुळे नवोदित उदयनमुख क्रिकेट संघांपैकी स्कॉटलंड या संघाची या स्पर्धेत पडलेली भर. त्यामुळे नवोदितांच्या संख्येमध्ये मुख्य प्रवाहात असलेल्या संघांपेक्षा अधिक वाढ झाली. ही स्पर्धा काहीशी कंटाळवाणी होईल अशी भीती वाटली होती, ती फोल्ड ठरली. सर्वच नवोदित संघांनी या विश्वचषकावर आपली छाप पाडली. त्यामध्ये नेपाळचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. आशिया खंडातील एक छोटासा देश. क्रीडा सुविधा फारच तोटपुंज्या आणि अपुऱ्या. अशा परिस्थितीत नेपाळने आपल्या चिवट आणि झुंजार वृत्तीचे दर्शन घडवत या विश्वचषकात आपली छाप पाडली. त्यांच क्षेत्ररक्षण अप्रतिम होतं. त्यांच्याकडे फिरकी गोलंदाज दर्जेदार होते. फलंदाजीत तळाला देखील चांगल्या धावा फटकावणारे खेळाडू होते. त्यामुळे त्यांना या स्पर्धेत नवालौकिक निर्माण करता आला.

दुसरीकडे हॉलंड सारख्या संघाने देखील भारताला आणि अन्य संघांना कडवी झुंज दिली. झिम्बाब्वे हा संघ जरी कसोटी संघांपैकी एक असला, तरीही अलीकडच्या काळात तेथील राजकीय परिस्थिती आणि अन्य संकट आणि समस्या यामुळे दुबळा वाटत होता. त्यांनी सलामीलाच ऑस्ट्रेलियाला हरवून मोठा धक्का दिला. त्यानंतर चक्क यजमान श्रीलंकेला ही हरवल. यामुळे त्यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधलं गेलं. त्यांनी योजनाबद्ध फलंदाजी आणि गोलंदाजी केली. त्याप्रमाणे क्षेत्ररक्षण देखील अप्रतिम केल.

मात्र या संघाचा श्रीलंकेत असलेला जोश भारतामध्ये काही दिसला नाही. त्यांनी भारतातील वेस्टइंडीज आणि यजमान भारत या दोन्ही संघांविरुद्ध सामने सहज गमावले. याचा मुख्य कारण म्हणजे त्यांना भारतीय खेळपट्ट्यांवर जुळवून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नसावा. तसंच श्रीलंकेतील मैदान त्यांचा आकारमान आणि भारतातील मैदान आणि त्यांचे आकारमान याचा गणित देखील त्यांना अचूक सोडवता आलं नाही. त्यामुळे त्यांचे गोलंदाज आणि प्रामुख्याने फिरकी गोलंदाज फारसे प्रभावी ठरले नाहीत.

दुसरीकडे इटलीच्या संघाने देखील आपली छाप पाडली. अमेरिकेच्या क्रिकेट संघाने तर भारतातील प्रेक्षकांना सर्वाधिक खुश केले. त्यांनी हॉलंड या दोन संघांवर मात केली आणि भारत आणि पाकिस्तान या दोन प्रबळ संघांना कडवी झुंज दिली. त्यांचा भारताविरुद्ध सलामीचा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झाला. त्यावेळी गोलंदाज शुभम रांगणे याने स्वतःच्याच गोलंदाजीवर सूर्यकुमार यादव चा सोडलेला झेल निर्णायक ठरला. कारण फक्त सूर्यकुमार यादवच्या धावसंख्येमुळे भारताने जेमतेम १६० धावसंख्येवर मजल मारली. अमेरिकेच्या संघाने गोलंदाजी विशेष प्रभावी कामगिरी केली असं वाटतं. त्यांच्याकडे मुंबईच रांजणे आणि हरमित सिंग हे दोन अनुभवी फिरकी गोलंदाज होते. नेत्रावळकर याचा या सामन्यात प्रभाव पडला नसला तरीही त्याने उर्वरित सामन्यात आपल्या गोलंदाजीची झलक दाखवून दिली. भारत आणि पाकिस्तान या संघाने फारसा अनुभव नसलेल्या अमेरिकन संघाला जेमतेम पराभूत केलं भारताने २९ धावांनी आणि पाकिस्तानने ३२ धावांनी. हे अगदी छोटे विजय होते. ओमानचा संघ अजूनही बाल्यावस्थेत असल्यासारखं वाटला. त्यांना मोठ्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध आणि मोठ्या स्पर्धेत खेळण्याचा आणखी अनुभव मिळवावा लागेल. सर्व नवोदित संघ २० षटकांच्या क्रिकेटमध्ये प्रभावी कामगिरी करू शकले. या संघांपैकी बहुतेक संघ व्हाईट बॉल क्रिकेटच जास्त खेळतात. यापैकी बऱ्याच देशांमध्ये रेड बॉल क्रिकेट नाही. म्हणजे प्रथम दर्जाचे क्रिकेट फारसे खेळले जात नाही. त्यामुळे त्यांना या रेड बॉल क्रिकेट कडे वळावेच लागेल. नाहीतर त्यांना भविष्यात मोठ्या संघांची जागा घेण्याच जागा घेण्याचे स्वप्न बाळगता येणार नाही. किंवा मोठ्या संघांना पराभूत करणं हे त्यांच्यासाठी प्रत्येक वेळी एक मोठे आव्हानच असेल.

पाकिस्तानची या स्पर्धेत भारताविरुद्ध खेळण्याची भूमिका शेवटपर्यंत संदिग्ध अशीच होती. अगदी शेवटच्या क्षणी पाकिस्तान संघ भारताविरुद्ध खेळण्यासाठी राजी झाला. आयसीसीला स्पर्धेचे वेळापत्रक त्यामुळे पुन्हा एकदा बदलावे लागले. पाकिस्तान आणि श्रीलंका हे दोन संघ जर उपांत्य फेरीत आले, तर त्यांचे सामने श्रीलंकेतच होतील असं आयसीसीला ठरवावं लागलं. अंतिम फेरीसाठी देखील असाच निर्णय घेण्यात आला. मात्र त्या दोन्ही शक्यता पाकिस्तान आणि श्रीलंका संघ पराभूत झाल्यामुळे २०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारा दक्षिण आफ्रिका हा इंग्लंडनंतर दुसरा संघ ठरला आहे. गुरुवारी रात्री चेन्नईमध्ये भारताने झिम्बाब्वेला हरवून स्पर्धेतून बाहेर पडल्याने त्यांचे स्थान पक्के झाले.

गुरुवारी दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजला हरवून चार गुण मिळवले होते; रविवारी दुपारी दिल्लीत त्यांचा शेवटचा सुपर एट सामना झिम्बाब्वेशी होईल. रविवारी नंतर, सुपर एट टप्प्यात गट १ मधील दुसरा उपांत्य फेरीचा संघ निश्चित करण्यासाठी भारत आणि वेस्ट इंडिज-प्रत्येकी दोन गुणांसह कोलकाता येथे नॉकआउट सामन्यात एकमेकांसमोर येतील. वेस्ट इंडिजचा नेट रन रेट भारताच्या ०.१०० पेक्षा १.७९१ असा उत्तम आहे. परंतु ईडन गार्डन्समध्ये पावसाने सामना वाया घालवला तर काही फरक पडणार नाही.

गट २ मध्ये, इंग्लंडने पाकिस्तान आणि श्रीलंकेला हरवले आणि चार गुणांसह टेबलच्या शीर्षस्थानी पोहोचून उपांत्य फेरीत स्थान मिळवले. बुधवारी कोलंबोमध्ये श्रीलंकेला हरवून न्यूझीलंडने सहयजमान संघाला स्पर्धेतून बाहेर काढले. शुक्रवारी त्याच ठिकाणी इंग्लंडला हरवल्यास न्यूझीलंड सर्व पात्रता फेरी संपवेल. ते पात्रता फेरीत प्रवेश करतीलच, शिवाय पाच गुणांसह गटात अव्वल स्थानावर राहतील आणि उपांत्य फेरीत गट १ मधील दुसऱ्या स्थानावर असलेल्या संघाशी खेळतील. जर इंग्लंडने तो सामना जिंकला तर ते सहा गुणांसह गटात अव्वल स्थानावर राहतील.

आणि पाकिस्तानलाही शर्यतीत ठेवेल, जरी एनआरआरच्या लक्षणीय अडचणीवर मात करण्यासाठी आणि न्यूझीलंडपेक्षा पुढे जाण्यासाठी पाकिस्तानला शनिवारी श्रीलंकेला मोठ्या फरकाने पराभूत करावे लागेल. जर पाकिस्तान बाहेर पडला तर दोन्ही उपांत्य फेरीचे सामने ४ आणि ५ मार्च रोजी भारतात, कोलकाता आणि मुंबईत खेळवले जातील.

# भारताची उपांत्य फेरीच्या दिशेने कूच

| मुंबई | प्रतिनिधी |

आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यांमध्ये अजिंक्य राहिल्यानंतर भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील पहिल्याच सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे भारतीय संघाचा सेमीफायनलमध्ये प्रवेश करण्याचा मार्ग खडतर झाला होता. पण दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजला पराभूत केल्यानंतर भारतीय संघाचा सेमीफायनलमध्ये जाण्याचा मार्ग सोपा झाला. आता झिम्बाब्वेला पराभूत करून भारतीय संघाने सेमीफायनलच्या दिशेने मजबूत पाऊल टाकलं आहे. चेन्नईत झालेल्या सामन्यात भारतीय संघाने झिम्बाब्वेसमोर विजयासाठी २५७ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला १८४ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह भारतीय संघाने हा सामना ७२ धावांनी आपल्या नावावर केला.




आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा

झिम्बाब्वेला हा सामना जिंकण्यासाठी २५७ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ब्रायन बेनेटने ९७ धावांची दमदार खेळी केली. मरूमानीने २० धावांचे योगदान दिले. डियॉन मयर्स अवघ्या ६ धावा करून माघारी परतला. कर्णधार सिकंदर रझाने जोर लावला. पण तो अवघ्या ३१ धावा करून माघारी परतला. रायन बर्ल शून्यावर माघारी परतला.

या सामन्यात झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. या सामन्यासाठी भारतीय संघाच्या बॅटिंग ऑर्डरमध्ये मोठा बदल करण्यात आला होता. अभिषेकसोबत संजूने डावाची सुरूवात केली. तर इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. या जोडीने मिळून पहिल्या विकेटसाठी ४८ धावा जोडल्या. संजू सॅमसनने २४ धावा केल्या. तर अभिषेक शर्माने ५५ धावांची खेळी केली. इशान किशनने ३८ धावांचे योगदान दिले. कर्णधार सूर्यकुमार यादवने ३३ धावा केल्या. तर शेवटी हार्दिक पांड्या आणि तिलक वर्माने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून संघाची धावसंख्या २५० पार पोहोचवली. हार्दिक पांड्या ५० धावांवर नाबाद राहिला. तर तिलक वर्माने नाबाद ४४ धावांची खेळी केली.

### वेस्ट इंडिजविरूद्ध निर्णायक लढत

**दक्षिण आफ्रिकेविरूद्धचा सामना गमावल्यानंतर भारतीय संघाने झिम्बाब्वेविरूद्ध मोठ्या विजयाची नोंद केली आहे. त्यामुळे भारतीय संघाकडे सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी कायम आहे. भारतीय संघाचा साखळी फेरीतील पुढील सामना वेस्ट इंडिजविरूद्ध होणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी नॉकआऊट सामना असणार आहे. जो संघ हा सामना जिंकेल, तो सेमीफायनलमध्ये प्रवेश करणार आहे. हा सामना रविवारी १ मार्चला खेळवला जाणार आहे. या सामन्यात नेट रनरेट महत्वाचा नसेल, केवळ सामना जिंकून भारतीय संघ सेमीफायनलमध्ये आपलं स्थान निश्चित करू शकतो.**

## रिंकू सिंहच्या वडिलांचे निधन

अलिगढ : क्रिकेटर रिंकू सिंह यांचे वडील खानचंद सिंह (६०) यांचे शुक्रवारी सकाळी सुमारे ४.३६ वाजता निधन झाले आहे. त्यांना चौथ्या स्टेजचा लिव्हर कॅन्सर होता. काही दिवसांपूर्वी त्यांची तब्येत खूप बिघडली होती, त्यानंतर त्यांना ग्रेटर नोएडा येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. वडिलांची तब्येत बिघडल्याची बातमी मिळताच रिंकू सिंह मंगळवारी टीम इंडिया सोडून घरी परतले होते. त्यावेळी रिंकू संघासोबत चेन्नईमध्ये होता. त्यांना विश्वचषकादरम्यान संघाचे सराव सत्र सोडावे लागले होते. २५ फेब्रुवारी रोजी रिंकू चेन्नईला परतला होता आणि संघासोबत सामील झाला होता. चेन्नईमध्ये झिम्बाब्वेविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात तो बदली खेळाडू म्हणून क्षेत्ररक्षण करत होता.

## किंग कोहलीचा वर्ल्ड रेकॉर्ड धोक्यात

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

टी-२० विश्वचषकात पाकिस्तानचा सलामीवीर फलंदाज साहिबजादा फरहान आपल्या बॅटने आग ओकत आहे. सुपर ८ टप्प्यातील चुरस वाढली असतानाच, फरहानकडे आता भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीचा एक ऐतिहासिक विक्रम मोडीत काढण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे.

साहिबजादा फरहानने चालू विश्वचषकात आतापर्यंत ५ डावांमध्ये २८३ धावा कुटल्या आहेत. २०१४ च्या टी-२० विश्वचषकात विराट कोहलीने ३१९ धावा करून एकाच हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम प्रस्थापित केला. हा विक्रम मोडण्यासाठी फरहानला आता केवळ ३७ धावांची गरज आहे. २८ फेब्रुवारी रोजी श्रीलंकेविरुद्ध होणाऱ्या सामन्यात जर फरहानने या धावा केल्या, तर तो टी-२० विश्वचषकाच्या एकाच आवृत्तीत सर्वाधिक धावा करणारा जगातील



पहिला फलंदाज ठरेल.

नुकत्याच पल्लेकेले येथे झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात फरहानने ६३ धावांची दमदार खेळी केली. त्याच्या या अर्धशतकामुळे पाकिस्तानने १६४ धावांचे आव्हान उभे केले. मात्र, इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने अवघ्या ५१ चेंडूत शतक झळकावून पाकिस्तानच्या हातातून विजय हिसकावून घेतला. या विजयासह इंग्लंडने उपांत्य फेरीत धडक मारली असून, असा पराक्रम करणारा तो चालू स्पर्धेतील पहिला संघ ठरला आहे. इंग्लंडकडून झालेल्या पराभवामुळे पाकिस्तानचा उपांत्य फेरीचा मार्ग आता खडतर झाला आहे. श्रीलंकेविरुद्धचा सामना पाकिस्तानसाठी प्रतिष्ठेचा असून, सर्वांच्या नजरा साहिबजादा फरहानच्या फलंदाजीवर खिळल्या आहेत.

# अर्शदीपने बोल्टचा रेकॉर्ड मोडला

| मुंबई | प्रतिनिधी |

भारतीय संघाचा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने टी-२० विश्वचषकात आपल्या धारदार गोलंदाजीने इतिहास रचला आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात तीन विकेट्स घेत अर्शदीपने केवळ भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले नाही, तर जागतिक क्रिकेटमधील अनेक दिग्गजांना मागे टाकत नव्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात अर्शदीप सिंगने आपल्या ४ षटकांच्या केवळ २४ धावा देऊन ३ महत्त्वाचे विकेट्स घेतले. त्याने झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा, रायन बर्ल आणि टोनी मुनयोंगा यांना बाद करून प्रतिस्पर्धी संघाचे कंबरडे मोडले. या कामगिरीसह अर्शदीपच्या खात्यात चालू विश्वचषकात आतापर्यंत एकूण ८ विकेट्स जमा झाल्या आहेत. या कामगिरीसह त्याने ट्रेन्ट बोल्टचा रेकॉर्ड मोडला.



टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक विकेट्स घेण्याचा मान आता अर्शदीपला मिळाला आहे. त्याने न्यूझीलंडच्या ट्रेंट बोल्टचा (३४ विकेट्स) विक्रम मोडीत काढला. टी-२० विश्वचषकात सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत बांगलादेशचा शकिब अल हसन ५० विकेट्ससह (४३ सामने) पहिल्या स्थानी कायम आहे. ऑस्ट्रेलियाचा ॲडम झांपा ४४ विकेट्ससह दुसऱ्या, तर अफगाणिस्तानचा रशीद खान ४३ विकेट्ससह तिसऱ्या क्रमांकावर आहे. दरम्यान, उपांत्य फेरीच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी भारताला हा सामना जिंकणे आवश्यक होता. भारताने झिम्बाब्वेचा ७६ धावांनी धुव्वा उडवला. या विजयाचा थेट फायदा दक्षिण आफ्रिकेला झाला असून ते पुढील फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

# मास्टर्स कपवर करण क्रिकेट अकॅडमीचे नाव

| कल्याण | प्रतिनिधी |

पोलीस हवालदार स्वर्गीय यशवंतराव ओंबासे यांच्या स्मरणार्थ आयोजित मास्टर्स कप चॅम्प्स टी-२० स्मृती चषक राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत पनवेलच्या करण क्रिकेट अकॅडमीने अटीतटीच्या सामन्यात बाजी मारत विजेतेपद पटकावले. ११ वर्षांखालील खेळाडूंसाठी आयोजित या स्पर्धेत चिमुरड्या क्रिकेटपटूंनी आपल्या बॅट आणि बॉलची कमाल दाखवली.

कल्याणच्या संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर पार पडलेल्या अंतिम सामन्यात पनवेल करण अकॅडमी आणि श्री माँ गुरुकुल स्कूल, ठाणे हे दोन संघ आमनेसामने होते.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना करण अकॅडमीने निर्धारित २० षटकांत ११८ धावा उभारल्या आणि ठाणे संघासमोर ११९ धावांचे लक्ष्य ठेवले. लक्ष्याचा पाठलाग करताना ठाणे संघाला करण अकॅडमीच्या भेदक गोलंदाजीसमोर टिकाव धरता आला नाही. शिस्तबद्ध क्षेत्ररक्षण आणि प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर करण अकॅडमीने हा सामना जिंकून चषकावर आपले नाव कोरले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पियुष दांडेकर याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या सोहळ्याला संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमीचे सचिव संतोष पाठक, केअर फाउंडेशनचे अध्यक्ष अविनाश ओंबासे, प्रशिक्षक करण सर, दर्शन भोईर, अजय, परेश हिंदुराव आणि मंगेश ब्रीद यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्यातील १८ नामांकित संघांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला होता. संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी, कल्याण व स्पोर्ट्स केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पार पडली.

## रणजी फायनलमध्ये जम्मू-काश्मीरचे वर्चस्व

**हुबली :** जम्मू-काश्मीर संघाने रणजी क्रिकेट करंडकाच्या अंतिम फेरीतील पहिल्या तीनही दिवशी वर्चस्व गाजवले. जम्मू-काश्मीर संघाचा पहिला डाव ५८४ धावांवर आटोपल्यानंतर कर्नाटकची पहिल्या डावात तिसऱ्या दिवसअखेरीस पाच बाद २२० धावा अशी अवस्था झाली आहे. कर्नाटकचा संघ अद्याप ३६४ धावांनी पिछाडीवर आहे. मयांक अगरवाल १३० धावांवर खेळत आहे. जम्मू-काश्मीर संघाने सहा बाद ५२७ या धावसंख्येवरून गुरुवारी पुढे आपल्या खेळाला सुरुवात केली. साहील लोटरा ७२ धावांवर बाद झाला. अबीद मुश्ताकने २८ धावा केल्या. युधवीर सिंगने दहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ३० धावांची खेळी केली. जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात ५८४ धावा फटकावल्या. प्रसिध कृष्णा याने ९८ धावा देत निम्मा संघ गारद केला.

# अर्जुनचे प्री-वेडिंग फंक्शन



| जामनगर | वृत्तसंस्था |

सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक यांच्या प्री-वेडिंग फंक्शन्सना सुरुवात झाली आहे. याची सुरुवात गुजरातमधील जाम नगर येथील अंबानी कुटुंबाच्या घरी झाली, जिथे तेंडुलकर आणि अंबानी कुटुंबातील सदस्य पारंपरिक वेशात दिसले.

सचिनने या प्रसंगी मुलाबद्दल एक भावनिक गोष्ट सांगितली. तो म्हणाला की, जेव्हा मुलगा एखाद्या मुलीला घरी आणून तिची ओळख करून देतो, तेव्हा कळते की मुलगा मोठा झाला आहे. अर्जुन आणि सानियाचे लग्न ५ मार्च रोजी मुंबईत होणार आहे. दोघांनी ऑगस्ट २०२५ मध्ये साखरपुडा केला होता. सानिया चंडोक ग्रॅव्हिस ग्रुपचे अध्यक्ष रवी घई यांची नात आहे. ती अर्जुनची बहीण साराची जवळची मैत्रीण देखील आहे. अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक. सारा एका पेट स्पा सेंटरची डायरेक्टर आहे. जामनगरमधील अंबानी हाऊसमध्ये अर्जुन आणि सानियाच्या लग्नाचे कार्यक्रम सुरू आहेत. यात मुकेश आणि नीता अंबानीही सहभागी झाले होते.

माणगाव सेल्स प्रीमियर लीग

## आपला बाजार माणगाव विजेता

**माणगाव :** माणगाव सेल्स प्रीमियर लीग आयोजित क्रिकेट स्पर्धा धनसे ग्राउंड येथे उत्साहात पार पडल्या. वर्षभराच्या धावपळीतून एक दिवस तरी मार्केटिंग क्षेत्रातील युवकांनी खेळाचा आनंद घ्यावा या उद्देशाने गेल्या पाच वर्षांपासून या स्पर्धेचे सातत्याने आयोजन केले जाते. यंदाच्या स्पर्धेत आठ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात विक्रम यांच्या नेतृत्वाखालील आपला बाजार माणगाव संघाने शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेसाठी माणगाव, महाड, श्रीवर्धन, नागोठणे व खेड येथील डिस्ट्रीब्युटर आणि व्यापारी वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धेचे नियोजन सुनील म्हशेळकर, शैलेश बामणे, विजय भादावकर, निलेश शिंदे, सचिन लोणारकर, सुरज भोनकर, अखिल बक्कम, तुषार म्हसकर, ऋतिक तळेकर तसेच सल्लागार मंडळाने केले.

विंडीज बरोबरचा सामना फरकाने जिंकणे गरजेचे | भारतासमोर 'करो या मरो' ची स्थिती

# विजयानंतरही चिंता कायम

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

टीम इंडिया आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेतील सुपर ८ मोहिमेत विजयी सुरुवात करण्यात अपयशी ठरली. दक्षिण आफ्रिकेने भारताला ७६ धावांच्या मोठ्या फरकाने पराभूत केलं. भारताला या पराभवामुळे मोठा फटका बसला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवाचा भारताच्या नेट रनरेटवर परिणाम झाला. त्यामुळे सेमी फायनलच्या हिशोबाने भारताचं टेन्शन वाढलं. त्यामुळे भारतासाठी झिंबाब्वे विरुद्धचा सामना करो या मरो असा होता. भारताने गुरुवारी झिंबाब्वेवर मोठ्या फरकाने विजय मिळवला. भारताने या विजयासह सेमी फायनलच्या शर्यतीतील आपलं आव्हान कायम ठेवलं. मात्र या विजयांनतर भारताची धाकधूक कायम आहे.




झिंबाब्वेला रोखण्यात अपयशी

टीम इंडियाने झिंबाब्वेसमोर २५७ धावांचं तगडं आव्हान ठेवलं होतं. त्यामुळे टीम इंडियाला हा सामना मोठ्या फरकाने जिंकून नेट रनरेटमध्ये सुधारणा करण्याची नामी संधी होती. मात्र भारतीय गोलंदाज झिंबाब्वेला ऑलआऊट करण्यात आणि मोठी धावसंख्या करण्यापासून रोखण्यात अपयशी ठरले.

झिंबाब्वेने फटकेबाजी करत २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून १८४ धावा केल्या. त्यामुळे भारताला फक्त ७२ धावांनीच विजय मिळवता आला. त्यामुळे भारताला नेट रनरेटमध्ये काही खास फायदा झाला नाही. झिंबाब्वेचं या पराभवानंतर आव्हान संपुष्टात आलं. तर भारताच्या विजयामुळे दक्षिण आफ्रिकेने सेमी फायनलमध्ये प्रवेश केला.

### टीम इंडिया तिसऱ्या स्थानी

टीम इंडिया या विजयानंतरही ए ग्रुपमधून पॉइंट्स टेबलमध्ये तिसऱ्या स्थानी विराजमान आहे. तर विंडीज २ सामन्यांमधील एका विजयानंतरही दुसऱ्या स्थानी कायम आहे. ए ग्रुपमधून उपांत्य फेरीतील एका जागेसाठी भारत आणि विंडीजमध्ये टफ फाईट आहे. आता भारत आणि विंडीज दोन्ही संघ सुपर ८ फेरीतील आपला शेवटचा सामना एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत. हा सामना जिंकणारा संघ उपांत्य फेरीत पोहचणार आहे.

### दक्षिण आफ्रिका पहिल्या स्थानी

दक्षिण आफ्रिका या स्पर्धेतील दहाव्या पर्वात अजिंक्य आहे. दक्षिण आफ्रिकेने साखळीनंतर सुपर ८ फेरीत खेळलेले २ सामने जिंकले आहेत. दक्षिण आफ्रिकेने टीम इंडिया आणि विंडीजला पराभूत केलंय. दक्षिण आफ्रिका २ सामन्यानंतर ४ गुणांसह पहिल्या स्थानी विराजमान आहे. विंडीज टीम इंडियाप्रमाणे २ गुण असूनही फक्त नेट रनरेट चांगला असल्याने दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतीय संघ तिसऱ्या तर झिंबाब्वे चौथ्या स्थानी आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)